
कहाणी हैदराबाद-लढ्याची

नरेन्द्र चपळगावकर



कहाणी हैदराबाद लढ्याची

लेखक

नरेन्द्र चपळगावकर

देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.

संस्थापक :

पहिली आवृत्ती : १९९९

रा. ज. देशमुख

सुलोचना राम देशमुख

प्रकाशक :

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.
४७३, सदाशिव पेठ, पुणे : ४११ ०३०.

लेखक :

नरेन्द्र चपळगावकर
१३, जयनगर, औरंगाबाद

मुखपृष्ठ :

विनायक गोखले

अक्षर रचना :

वरुण आर्टस्
११०, म. फुले (गंज) पेठ,
पुणे : ४२.

मुद्रक :

योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि.
नांदेड फाटा, सिंहगड रोड,
पुणे : ४११ ०४१.

माझी आई

सौ. रमा पुरुषोत्तम चपळगावकर

हिला

प्रस्तावना

हैदराबाद संस्थानची जनता निजामी सत्तेच्या जोखडातून मुक्त झाली त्याला गतवर्षी पन्नास वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने संस्थानी राजवट आणि जनतेचा लढा यातील काही महत्त्वाच्या घटनांबाबत मी एक लेखमाला लिहावी असे 'सकाळ'चे संपादक व माझे स्नेही श्री. विजय कुवळेकर यांनी सुचवले. त्याप्रमाणे १९९८ सालात दर पंधरवड्यास एक असे माझे लेख सकाळ दैनिकात प्रसिद्ध झाले. त्यामुळे प्रथम त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे. ही लेखमाला सकाळमध्ये प्रसिद्ध होत असताना अनेक वाचकांनी पत्र लिहून तर काहींनी समक्ष भेटून आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. विशेषतः मराठवाड्याबाहेरच्या वाचकांनी या लेखनात रस घेतला याचा मला विशेष आनंद झाला.

हे लेखन म्हणजे हैदराबाद स्वातंत्र्यलढ्याचा संपूर्ण इतिहास नाही. हे केवळ काही प्रसंगांचे, व्यक्तींचे, प्रवृत्तींचे धावते चित्रण आहे. याच दृष्टीने त्याकडे पाहिले जावे. हैदराबाद स्वातंत्र्यलढ्याचे नेते पू. स्वामी रामानंद तीर्थ यांचे चरित्र लिहीत असताना संस्थानचा इतिहास व त्यातील सामाजिक व राजकीय चळवळी यासंबंधीची बरीचशी सामुग्री मला अभ्यासावी लागली. इतिहासाच्या वाचनात, अध्ययनात आपल्याला खिळवून टाकण्याचे सामर्थ्य मुळातच असते. स्वातंत्र्यलढ्यातील माझ्या वडीलांच्या सहभागामुळे चळवळी विषयीचे कुतूहल मनात जागे होतेच. चरित्र लेखनाच्या निमित्ताने वाचण्यात आलेली पुस्तके, पुराभिलेख कार्यालयात धुंडाळलेल्या फाईली, नेत्यांचे पत्रव्यवहार या सगळ्यांनी माझ्या मनाला वेढून टाकले. चार - पाच वर्षांचा काळ फार मजेत गेला. स्वामीजींचे चरित्र स्वतंत्रपणे प्रसिद्ध होईल. आज ही शब्दचित्रे प्रसिद्ध होत आहेत. या वेगवेगळ्या स्फूट लेखांतूनही हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्याचे एक चित्र उभे राहील असे मला वाटते.

हैदराबाद संस्थान निजामी सत्तेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी जनतेने निर्णायक लढा दिला तो १९३८ ते १९४८ अशा दहा वर्षांत. स्वातंत्र्याच्या लढ्याचा हा कालखंड

लहान असला तरी या लढ्याला जनतेला तयार करण्याची प्रक्रिया मात्र बऱ्याच पूर्वीपासून चालू होती. संस्थानी राजवटीविरुद्ध जनता उभी राहिली, याची कारणे लक्षात घेतली पाहिजेत. संस्थानातील आसफिया राजवट ज्या आधारावर उभी होती त्यातला पहिला आधार सरंजामदारी व्यवस्था हा होता. संस्थानच्या जवळजवळ ८३ हजार चौरस मैल क्षेत्रफळापैकी सुमारे ४२ टक्के भाग हा जहागिरी अमलाखाली होता. त्यातील मोठा म्हणजे संस्थानच्या क्षेत्रफळापैकी सुमारे दहावा हिस्सा हा स्वतः निजामाचीच खाजगी जहागीर होती. कार्यक्षम दिवाणी व्यवस्था व न्यायव्यवस्था यांचा मागमूसही जहागिरीत नव्हता. काही जहागिरदारांना स्वतःचे तहसीलदार, तालुकादार व न्यायाधीश नेमण्याचाही अधिकार होता. मात्र अशा पदावर होणाऱ्या नेमणुका हा जहागिरदाराच्या मर्जीचा भाग असे. जहागिरीत खालसा मुलुखापेक्षा शेतसारा अधिक होता. शिवाय शिक्षण आणि आरोग्य तसेच दळणवळण यासारख्या मूलभूत सोयी अभावानेच होत्या. तरीही जहागीर व्यवस्था निजामाला आधार देणारी होती. सरंजामदारी व्यवस्थेतील दुसरा खांब म्हणजे रुसुम, यौमिया, माश व वजिफा या विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या नगदी रकमा दरवर्षी सरकारकडून मिळणारी किंवा सरकारने दिलेल्या जमिनी उपभोगणारी इनामदार व वतनदार मंडळी. यांचे सरकारकडून मिळणारे उत्पन्न किरकोळ असले तरी सरकार दरबारी आणि समाजात त्यांना मान होता. हा वर्गही सामान्यतः निजामी सत्तेचा शुभचिंतक असे.

राज्यात जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात नव्हती. निजामाने नेमलेला दिवाण हा हैदराबादेत बसून कारभार करी. सामान्य जनतेची छोटीमोठी गाऱ्हाणी हैदराबादपर्यंत जाणे जवळपास अशक्य असे. राज्यकारभारात लोकांचे म्हणणे ऐकून घेण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. लोकांचे प्रतिनिधी असलेले मंत्रिमंडळ नव्हते. १९२० ला सर अली इमाम दिवाण म्हणून येईपर्यंत राज्याला मंत्रिमंडळच नव्हते. नंतरही ते निजामाच्या मर्जीतील माणसांनी भरलेले होते. लोकांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडणारी दुसरी साधने म्हणजे लोकांच्या संघटना आणि वृत्तपत्रे. संस्थानात संघटना स्वातंत्र्य नव्हते. राजकीय संघटना तर स्थापन करता येत नव्हतीच परंतु सामाजिक किंवा शैक्षणिक संस्था सरकारच्या परवानगीशिवाय स्थापन करता येत नव्हती व अशी परवानगी सहसा मिळूच शकत नव्हती. वृत्तपत्र काढावयाचे तर मंत्रिमंडळाच्या परवानगीने. मुद्रणालय काढावयाचे तर तेही मंत्रिमंडळाच्या परवानगीने. अशा परिस्थितीत संस्थानामध्ये लोकभाषेत सरकारवर परखड टीका करणारी व लोकांच्या तक्रारींना वाव देणारी वृत्तपत्रे निघूच शकली नाहीत. 'निजामविजय'सारखे एखादे मराठी साप्ताहिक तग धरुन होते. त्याला अतिशय सौम्य भाषेमध्ये सर्व प्रकारची बंधने सांभाळून आपली लेखणी चालवावी लागे. त्यालाही एकदा सहा महिने आपले प्रकाशन सरकारी अवकृपेमुळे स्थगित ठेवावे लागले होते.

जनतेची मुख्य तक्रार नागरिक स्वातंत्र्याच्या गळचेपीबद्दलची होती. संघटना आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य तर सर्वच नागरिकांना नाकारण्यात आले होते. परंतु राज्यातील फार मोठी बहुसंख्या असलेल्या हिंदू जनतेला त्यांचे सांस्कृतिक व धार्मिक हक्कही नाकारण्यात आले होते. राज्याच्या एकूण एक कोटी त्रेसष्ठ लाख लोकांपैकी हिंदूंची संख्या सुमारे पंच्याऐंशी टक्के अशी होती. मात्र या हिंदू जनतेला त्यांचे सण आणि उत्सव, त्यांची मंदिरे व त्यातील उपासना यांच्याबाबत जुलमी निर्बंधांना तोंड द्यावे लागत असे. देवळांच्या बांधकामावर निर्बंध, मशिदीसमोर वाद्ये वाजवण्यास प्रतिबंध, मोहरमच्या काळात हिंदूंचा सण आल्यास तो सार्वजनिक रीतीने साजरा करण्यावर प्रतिबंध, इतर धर्मांतून मुस्लिम धर्मात येण्याला उत्तेजन अशा प्रकारच्या अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागे. हे राज्य मुसलमानांचे आहे असे जाहीरपणे निजाम सांगत. गुंडगिरी करण्यास मुस्लिमांना उत्तेजन व सरकारची डोळेझाक यामुळे असहाय्य झालेली जनता स्वातंत्र्याची व संरक्षणाची मागणी करु लागली होती.

संस्थानात फारसे उद्योगधंदेच नव्हते. एक-दोन छोट्या कापड गिरण्या, एक-दोन साखर कारखाने व कापूस पिकवणाऱ्या जिल्ह्यात जीनिंग व प्रेसिंग फॅक्टऱ्या एवढेच काय ते उद्योगधंदे. हैदराबादला काही किरकोळ कारखाने निघाले होते. परंतु संस्थानच्या आकाराच्या मानाने हे सर्व नगण्य होते. त्यात लोकांना रोजगार देण्याची फारशी क्षमता नव्हती. सरकारी नोकऱ्या हाच एकमेव महत्त्वाचा रोजगार. त्यात सरकारी धोरण असे होते की शक्यतो हिंदूंची नेमणूकच होऊ नये. शासकीय नोकऱ्यांत पंच्याहत्तर टक्क्यांहून अधिक मुसलमान होते. अकरा टक्के मुस्लिमांना हा फारच मोठा वाटा होता. गावपातळीवरील पाटील, पटवारी हेच काय ते मोठ्या प्रमाणात हिंदू होते. उच्च शासकीय पदे तर जवळपास मुसलमानांसाठी राखीवच होती. तेलंगणचा काही भाग वगळला तर इतर भागांत कोरडवाहू शेतीच मुख्यतः चरितार्थाचे साधन होती. याचा परिणाम असा की बहुसंख्य जनता आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत कधीच नव्हती.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी संस्थानात शिक्षणसंस्था आणि कांही सामाजिक संस्था यांच्या रुपाने लोकजागृतीला प्रारंभ झाला. या शतकाच्या पहिल्या दशकात चार-पाच खाजगी शाळा, तीन-चार वाचनालये महत्प्रयासाने सुरु झाली. 'ह्युमॅनिटेरियन लीग' आणि 'हिंदू लीग' अशा काही संस्था निर्माण झाल्या. लोकमान्यांच्या प्रेरणेने सुरु झालेला सार्वजनिक गणेशोत्सव हैदराबाद संस्थानातही सुरु झाला. १९२०-२१ मध्ये राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ आणि खिलाफत चळवळ यांचेही पडसाद संस्थानामध्ये उमटले. १९२० मध्येच 'निजाम विजय' सुरु झाले. १९०१ पासून १९२० पर्यंत दोन दशकांत हे जे जागृतीचे अंकुर निर्माण झाले त्याचीही गंभीर दखल सरकारने घेतली व १९२१ मध्येच 'गश्ती निशान ५२' हा

सभास्वातंत्र्यावरील बंधने कडक करणारा हुकूम जारी करण्यात आला.१९१८ पासून सामाजिक परिषदेची अधिवेशने भरु लागली होती. परंतु हैदराबाद राजकीय परिषद या नावाने राजकीय प्रश्नांची चर्चा करणारा पहिला मेळावा भरण्यास १९२३ साल उजाडावे लागले व तो आणि नंतरच्या तीनही राजकीय परिषदा संस्थानाबाहेरच घ्याव्या लागल्या. 'हैदराबाद पीपल्स कन्व्हेन्शन' किंवा 'निजाम सबजेक्टस लीग 'अशा हिंदू-मुस्लिमांच्या एकत्र संस्था स्थापन करण्याचा प्रयत्नही झाला. परंतु त्यांना फारसे यश मिळू शकले नाही.

१८८४ साली हैदराबाद संस्थानची राजभाषा म्हणून उर्दूला मान्यता मिळाली. तत्पूर्वी संस्थानात फारशी ही राजभाषा होती. संस्थानातील प्राथमिक शाळेतील पहिले चार वर्ग वगळता सर्व शिक्षणाचे माध्यमही उर्दू करण्यात आले. १९१७ साली स्थापन झालेल्या उस्मानिया विद्यापीठातील माध्यमाची भाषा म्हणून उर्दूच स्वीकारण्यात आली. प्राथमिक शिक्षणानंतर लोकभाषातून शिकण्याची कोणतीही सोय संस्थानात उपलब्ध नव्हती. परिणाम असा की शाळेत जाणाऱ्या मुलांपैकी सत्त्याहत्तर टक्के मुस्लिम आणि सतरा टक्के हिंदू असत. विद्यापीठातसुध्दा मुस्लिमांची बहुसंख्या होती.

मुस्लिमांना नोकरीत प्राधान्य, त्यांनाच मातृभाषेत शिक्षण घेण्याची सोय, हिंदूंना त्यांचे धार्मिक व सामाजिक हक्क नाकारणे याचा परिणाम स्वाभाविकपणे संस्थानातील हिंदू व मुस्लिम जनतेत दरी निर्माण होण्यात झाला. मात्र अगदी प्रारंभीच्या काळात लोकजागृतीच्या अभावी हिंदूंची महत्त्वाकांक्षाही मर्यादित होती व संघर्षाची मानसिकता तयार झाली नव्हती. त्यामुळे सकृतदर्शनी तरी हिंदू-मुस्लिमांत चांगले संबंध दिसत. आपल्याला समान संधी मिळणारच नाही हे हिंदूंनी गृहित धरले होते. सरंजामदारी व्यवस्था त्यांच्यातल्या बहुसंख्येने स्वीकारली होती. परंतु हे चित्र हळूहळू बदलत गेले. खाजगी शिक्षणसंस्था, वाचनालये, निरनिराळे धार्मिक उत्सव संघटितरित्या करणे असे उपक्रम सुरु झाले.

साहजिकच खाजगी शिक्षणसंस्था आणि वाचनालये यांच्या माध्यमातून सांस्कृतिक आक्रमणाच्या विरोधात जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न सुरु झाला. पुढे ज्या कार्यकर्त्यांनी राजकीय चळवळीत भाग घेतला व तुरुंगवासही भोगला असे अनेक कार्यकर्ते आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभ काळात खाजगी शिक्षणसंस्था, वाचनालये, गणेशोत्सवासारखे सार्वजनिक उत्सव यांच्या माध्यमातूनच तयार झाले होते. लोकजागृतीच्या या पहिल्या पर्वात म्हणजे १९०१ पासून १९३० पर्यंत वामन रामचंद्र नाईक, न्यायमूर्ती केशवराव कोरटकर अशा प्रवृत्तीने मवाळ परंतु आपल्या ध्येयाबद्दल स्पष्ट असणाऱ्या जाणत्यांचे नेतृत्व संस्थानला लाभले होते. जे काम रानडे आणि गोखले यांनी पश्चिम भारतामध्ये केले तेच काम हैदराबाद संस्थानात या दोघांनी केले आहे असे म्हणणे संयुक्तिक होईल.

सांस्कृतिक आक्रमणाविरुद्ध या जागृतीमुळे अन्याय सहन न करण्याची व त्याविरुद्ध लढण्याची हिंदूंची मानसिक तयारी झाली. १९३५ नंतर जेव्हा राज्यपद्धतीची मागणी होऊ लागली व संस्थानातील मुस्लिमांनाच राजकीय सत्तेचा अधिकार आहे असे सांगितले जाऊ लागले तेव्हा हिंदू-मुस्लिम संबंध तणावाचे होऊ लागले.

भारताला टप्याटप्याने स्वायत्तता देण्याचे बऱ्याच काळापासून ब्रिटिशांनी दिलेले आश्वासन १९३५ च्या कायद्याने अगदी अल्पांशाने का असेना पूर्ण होण्याची चिन्हे दिसू लागली. १९३५ च्या कायद्यात मिळालेल्या प्रांतिक स्वायत्ततेमुळे मर्यादित अधिकार असलेली राज्य सरकारे अस्तित्वात आली. लोकांच्या प्रतिनिधीची सरकारे म्हणजे काय, त्यांचे महत्त्व काय हे भारतातील इतर जनतेबरोबरच हैदराबादच्या जनतेलाही दिसू लागले. संस्थांनाच्या सरहद्दीच्या लगत असलेल्या प्रांतातून लोकांचे प्रतिनिधी असलेली मंत्रिमंडळे अस्तित्वात आली. या घटनेचा फार मोठा परिणाम हैदराबाद संस्थानातही झाला. संस्थानातील बहुसंख्य जनतेला आपल्याहीकडे जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात यावी व लोकप्रतिनिधींनी कारभार चालवावा असे वाटू लागले. तर संस्थानात आजपर्यंत विशेषाधिकार भोगणाऱ्या अल्पसंख्य मुस्लिमांच्या नेतृत्वाला जबाबदार राज्यपद्धतीने लोकप्रतिनिधींची सरकारे अस्तित्वात आल्यास आपल्या स्थानाला सुरुंग लागेल याची साधार भीती वाटू लागली. असे मुस्लिम नेतृत्व आणि निजाम यांच्या हातमिळवणीतून संस्थानामध्ये एक धोकादायक राजकीय तत्त्वज्ञान जन्माला आले. मुस्लिम हीच राज्यकर्ती जमात आहे व तिलाच राज्य करण्याचा अधिकार आहे असे भ्रामक तत्त्वज्ञान मुस्लिमांच्या गळी बहादुरयारजंगासारख्या कडव्या नेत्याच्या माध्यमातून उतरवण्यात आले. दलितांच्या धर्मांतराला उत्तेजन देण्यात आले व त्यातून जनतेच्या स्वातंत्र्याकांक्षेच्या लाटा थोपवण्यासाठी भिंत बांधण्याचा प्रयत्न करण्यात आला. याचा परिणाम लोकांच्या मनातील चीड अधिक तीव्र होण्यात झाला व स्वातंत्र्याच्या लढ्याला बळच मिळाले.

१९३७ पूर्वी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे धोरण संस्थानातील चळवळीत हस्तक्षेप न करण्याचे होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानातील जनतेचा प्रश्न आपोआप सुटू शकेल अशी समजूत याच्या मुळाशी असावी किंवा एकाच वेळी ब्रिटिश शासन आणि संस्थानिक यांचे शत्रुत्व घेण्याची काँग्रेसची इच्छा नसावी. काँग्रेसने संस्थानात ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला तर संस्थानी प्रजेच्या हितसंबंधांसच बाधा येईल असे गांधीजीसुद्धा मानत होते. मात्र संस्थानात चाललेली नागरिक स्वातंत्र्याची गळचेपी व बदललेली राजकीय परिस्थिती यांच्या दडपणामुळे काँग्रेसने आपले धोरण बदलले. १९३७ मध्ये सर्व संस्थानांसह भारताला स्वातंत्र्य हे आपले धोरण असल्याचे काँग्रेसने जाहीर केले. मात्र संस्थानातले लढे अखिल

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने चालवण्याऐवजी संस्थानी प्रजेच्या वेगळ्या संघटनांनी चालवावेत असे ठरले. मात्र १९३८ सालापासून काँग्रेसचे वेगवेगळे नेते वेगवेगळ्या संस्थानातील चळवळींचे मार्गदर्शन करु लागले. हैदराबादच्या सुदैवाने हैदराबाद संस्थानातील चळवळीचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी गांधीजीवर पडली.

राजकीय चळवळीची पूर्वतयारी म्हणून संस्थानातील तेलगू, मराठी व कन्नड भाषिक विभागासाठी वेगवेगळ्या तीन प्रादेशिक परिषदांची स्थापना झाली. या परिषदा बिगर राजकीय प्रश्नांचा विचार करण्यासाठी भरत आहेत असे भासविण्यात येत होते. राजकीय संस्थांच्या स्थापनेला बंदी असल्यामुळे हा मार्ग अवलंबिण्यात आला होता. अशा परिषदांचा आश्रय घेतल्यामुळे अधिक व्यापक प्रमाणात लोकांना त्यात सहभाग घेता आला. तेलंगण भागात आंध्र महासभा व कानडी प्रदेशात कर्नाटक परिषद पूर्वीच काम करु लागल्या होत्या. जून १९३७ मध्ये परतूड या परभणी जिल्ह्यातील एका जहागिरीच्या गावी महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन झाले व मराठवाड्यात राजकीय कार्य करु इच्छिणारे कार्यकर्ते एकत्र येण्याचा मार्ग मोकळा झाला. महाराष्ट्र परिषदेतील नेतृत्वाचे स्वरुप व आंध्र महासभेच्या नेतृत्वाचे स्वरुप यांच्यात फरक होता. तेलंगणमधील नेतृत्व बहुतांशी प्रवृत्तीने मवाळ व फारशा संघर्षाला तयार नसणारे होते. मराठवाड्यातील नेतृत्व कनिष्ठ मध्यम वर्गातून आलेले,राजकीय विचार पक्के असलेले आणि कोणत्याही त्यागाला तयार असलेले असे होते. राजकीय लढ्याला हे नेतृत्व अधिक उपकारक होते. म्हणूनच पुढे हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्यात मराठवाड्यातील कार्यकर्त्यांचा सहभाग जास्त प्रमाणात राहिला. हे नेतृत्व जरी कनिष्ठ मध्यम वर्गातून आले असले तरी त्यांचे पक्के मूळ शेती व्यवसायातच होते. जरी बहुजन समाजातील कार्यकर्ते लढ्याच्या प्रारंभ काळात फार कमी संख्येने चळवळीत आले तरी महाराष्ट्र परिषदेने आपल्या व्यासपीठावरुन आणि चळवळीद्वारा शेतीचे, शेतकऱ्यांचे व ग्रामीण भागाचे प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर मांडले. अगदी गोविंदराव नानलांच्या परतूडच्या पहिल्या महाराष्ट्र परिषदेच्या अध्यक्षपदावरुन केलेल्या भाषणापासून महाराष्ट्र परिषदेच्या शेवटच्या लातूर अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरुन केलेल्या आ. कृ. वाघमारेंच्या भाषणांपर्यंत सर्वांनी प्रामुख्याने शेतकऱ्यांचेच प्रश्न मांडले आहेत. परिषदेच्या सर्व अधिवेशनात झालेले ठराव शेतकऱ्यांची दुःखे वेशीवर टांगणारे आहेत. महाराष्ट्र परिषदेनेच १९४५ ते ४७ या काळात लेव्ही धान्य वसुलीच्या संदर्भात झालेल्या जुलमांविरुद्ध शेतकऱ्यांना संघटित केले आणि परिणामतः १९४७-४८ च्या शेवटच्या लढ्यात फार मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील जनता आणि बहुजन समाजातील कार्यकर्ते स्टेट काँग्रेसच्या लढ्यात सहभागी झाले.

हैदराबाद स्टेट काँग्रेसमधील स्वामी रामानंद तीर्थांचे नेतृत्व मानणारे बहुसंख्येने

मराठवाड्यातील असलेले कार्यकर्ते विचाराने पुरोगामी होते. याची मुख्यतः तीन कारणे सांगता येतील. एक तर यातील अनेकांचा पिंड महात्मा गांधींच्या विचारांनी प्रभावीत झालेला होता. दुसरे म्हणजे गोविंददास श्रॉफ, आ. कृ. वाघमारे, स. कृ. वैशंपायन यांच्यासारख्या काहींवर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव होता. बाबासाहेब परांजपे सारखे काही नेते जगातील महत्त्वाच्या राजकीय विचारवंतांच्या अभ्यासानंतर पुरोगामी दृष्टी बनलेले असे होते. मात्र यापैकी कुणीही कम्युनिस्टांच्यासारखे पोथीनिष्ठ तत्त्वज्ञान स्वीकारले नव्हते. ज्या जनतेच्या स्वातंत्र्याचा हा लढा होता ती जनता दरिद्रीच होती. तिचे स्वातंत्र्य नुसते राजकीय असून भागणार नव्हते तर राजकीय स्वातंत्र्याला आर्थिक समतेची जोड द्यावी लागणार होती. शिवाय राजकीय दडपशाही आणि आर्थिक शोषण हे एकमेकांत ऐवढे गुंतलेले होते की आर्थिक प्रश्नांचा विचार न करता केवळ राजकीय स्वातंत्र्याचा विचार अशक्य होता. म्हणून अपरिहार्यपणे स्वामीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जनतेच्या आर्थिक प्रश्नावरही लढे उभारले. स्वातंत्र्योत्तर काळात या नेतृत्वाकडे फार थोडा काळ राजकीय सत्ता आली. पण त्याही काळात जहागिरदारी नष्ट करण्याची, वतने खालसा करणे, कुळांना जमिनीचे मालकी हक्क देणे आणि कुळहक्काला संरक्षण देणे यासाठी कायदे करण्याचा आग्रह त्यांनी धरला. स्वातंत्र्य मिळेपर्यंत लढ्यामध्ये इतर सर्व मतछटांच्या लोकांप्रमाणेच कम्युनिस्टांनाही राह् द्यावे असा आग्रह या नेतृत्वाने धरला. याच्यामागचे कारण लढ्याची शक्ति कमी होऊ नये हे जसे होते तसेचं पुरोगामी शक्ति विभागली जाऊ नये हाही विचार त्यामागे होता. मात्र जेव्हा कम्युनिस्टांनी राष्ट्रविरोधी किंवा हिंसक आंदोलने करण्याची भूमिका घेतली तेव्हा या नेतृत्वाने त्यांना जोरदार विरोध केला.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या लढ्यात गांधीजींचे मार्गदर्शन मिळाले ही गोष्ट लढ्याचे स्वरुप आणि महत्त्व दोन्हीही ठरवणारी होती. निजामाच्या दडपशाहीच्या शक्तीच्या तुलनेत स्टेट काँग्रेसची शक्ति निदान प्रारंभी तरी फार लहान होती. मात्र या लढ्याचे मार्गदर्शन गांधीजी करीत आहेत ही गोष्ट लढ्याचा मोठा आधार होती. सर अकबर हैदरी यांच्यासारख्या निजामाच्या पंतप्रधानांनाही जपूनच वागावे लागत होते. गांधीजींच्या प्रतिक्रियेला देशभर किंमत होती ही गोष्ट त्यांनाही माहीत होती. निजाम आणि दडपशाही करणारे त्याचे साथीदार हे बहुतेक मुसलमान आणि भरडली जाणारी जनता हिंदू. यामुळे या चळवळीला हिंदू-मुस्लिम संघर्षाचे स्वरुप येण्याचा धोका होता. १९३८ सालीच हिंदू सिव्हिल लिबर्टीज युनियनने हिंदूच्या नागरी हक्कासाठी तर त्याचवेळी आर्य समाजाने हिंदुच्या धार्मिक हक्कासाठी संस्थानात सत्याग्रह केले. स्टेट काँग्रेसची चळवळ या दोन्ही चळवळीपासून अलिप्त ठेवावयाची आणि तिचे स्वरुप धर्मातीत ठेवावयाचे ही अत्यंत अवघड गोष्ट गांधीजींच्या योग्य मार्गदर्शनाने घड़

शकली. गांधीजींचे विचार ज्यांना जवळचे वाटले असे राष्ट्रीय शिक्षणाचे संस्कार झालेले नेतृत्वही सुदैवाने स्टेट काँग्रेसला लाभले होते. त्याचाही उपयोग झाला. म्हणूनच परिस्थिती जातीय विचारांना अनुकूल असली तरीही हैदराबादमधील चळवळीत भाग घेणारे कार्यकर्ते विचाराने धर्मनिरपेक्ष राहिले.

गांधीजींच्या मार्गदर्शनाने आणि स्टेट काँग्रेसमधील स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्याच्या नेतृत्त्वाने आणखी एक गोष्ट साध्य केली. तलवारीच्या व हिंसेच्या आधारेच बोलू इच्छिणारे सरकारचे समर्थक आणि त्याच्याकडे कानाडोळा करणारेच नाही तर त्यांना उत्तेजन देणारे निजामाचे सरकार यांच्याशी अहिंसेच्या शस्त्राने लढणे सोपे नव्हते. निजामी राजवटीतील अनेक अधिकाऱ्यांना सत्याग्रही निःशस्त्र प्रतिकार कसा असतो हेच माहीत नव्हते. सर्व प्रकारच्या भडकवणाऱ्या गोष्टी घडत असताना हे आंदोलन शेवटच्या पर्वावरील सरहद्दीवरील सशत्र प्रतिकार वगळता पूर्णांशाने अहिंसक राहिले. सरहद्दीवरील शिबिरातसुद्धा शक्यतो मनुष्यहानी करावयाची नाही हा दंडक पाळण्यात आला. आपल्यापेक्षा किती तरी पटीने बलवान असलेल्या शत्रूंशी लढण्यात हिंसेचा उपयोग नव्हता मात्र स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणूनही हिंसेकडे कार्यकर्ते वळले नाहीत. याचे श्रेय गांधीजींच्या वैचारिक मार्गदर्शनाला आहे.

काँग्रेसने भारतातील सर्व संस्थानी जनतेच्या लढ्यात सुसूत्रता आणण्यासाठी अ. भा. संस्थानी प्रजा परिषद स्थापन केली. १९४५ पासून या परिषदेनेही संस्थानी जनतेचे मार्गदर्शन केले. पं. जवाहरलाल नेहरु या परिषदेचे अध्यक्ष होते. यानिमित्ताने पं. नेहरुही हैदराबाद स्टेट काँग्रेसचे मार्गदर्शन करु लागले. काँग्रेसचे गांधीजी, नेहरु व पटेल यांच्यासारखे अखिल भारतीय नेतृत्त्वच हैदराबाद व इतर संस्थानातील जनतेचे मार्गदर्शक असल्यामुळे संस्थानी जनता व भारत यांच्या अभिन्नत्वाला मजबुती आली. हंगामी सरकारच्या स्थापनेनंतर संस्थानांच्या विलीनीकरणाच्या प्रश्नाला एक सरकारी बाजू निर्माण झाली. साहजिकच नेहरु आणि पटेल यांच्यावर संस्थानचे नेते अधिक विसंबू लागले.

हैदराबादच्या कार्यकर्त्यांना काही काँग्रेस नेते सांगत की तुम्हाला चळवळ करण्याची गरजच नाही. भारत स्वतंत्र झाला की हैदराबादमध्ये आपोआप लोकशाही येईल. मात्र हा विचार खरा नव्हता. भविष्यात काय वाढून ठेवले आहे हे कुणालाच माहीत नव्हते. माऊंटबॅटन यांच्या दडपणाखाली निजामाला जवळजवळ स्वातंत्र्य देणारा समझोता वल्लभभाईंनाही मान्य करावा लागला होता. सुदैव असे की तो निजामानेच नंतर फेटाळून लावला. हैदराबाद हे भारताच्या उदरामध्ये दुसरे पाकिस्तान झाले नाही याचे श्रेय हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या लढ्याला आहे. पारतंत्र्य भोगणाऱ्या जनतेला तुम्हाला आपोआप स्वातंत्र्य मिळणार आहे असे कोणी

तर्कशास्त्राच्या आधारे सांगू लागला तर त्याने त्या जनतेचे समाधान होणे अशक्य असते. स्वातंत्र्याकांक्षा ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. परिणामाची तमा न करता देशभक्त स्वातंत्र्यासाठी प्राण पणाला लावतातच. हैदराबादेत तेच घडले. गांधीजी म्हणाले होते की, भारताची स्वातंत्र्याची लढाई हैदराबादच्या भूमीवर लढली जाईल, तेच खरे ठरले. केवळ काही बाबींपुरते भारत सरकारशी संबंध ठेवून हैदराबाद स्वतंत्र राहिले असते तर काश्मीरसारखी आणखी एक चिघळणारी जखम भारताला वागवावी लागली असती. हैदराबादच्याच नव्हे तर भारताच्या जनतेचे सुदैव असे की असे घडले नाही.

'देशमुख आणि कंपनी' या प्रकाशन संस्थेचे चालक श्री. रा. द. उर्फ आप्पासाहेब तुळपुळे यांनी हे पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरवले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या प्रकाशन संस्थेचे संस्थापक रा. ज. देशमुख हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय असणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी एक होते. त्यामुळे या संस्थेने हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात एक औचित्यही आहे. देशमुख पती-पत्नींनी ज्यांच्यावर लोभ केला त्यांच्यापैकी मीही एक होतो. आज हे पुस्तक प्रकाशित होताना ती दोघेही हयात नाहीत याची खंत आहे.

अनेक ग्रंथालयांच्या ग्रंथपालांनी, शासकीय पुराभिलेखागाराच्या अधिकाऱ्यांनी, संशोधन संस्थांनी व स्वातंत्र्य चळवळींतील कार्यकर्त्यांनी या लेखासाठी उपयोग झालेली सामुग्री मला उपलब्ध करुन दिली त्या सर्वांचा मी ऋणी आहे. 'सकाळ'च्या औरंगाबाद, पुणे, सोलापूर कार्यालयातील मित्रांनी या लेखासाठी बराच त्रास सहन केला. त्यांचाही मी आभारी आहे.

हे पुस्तक मी माझ्या आईला अर्पण केले आहे. रुढ अर्थाने ती स्वातंत्र्य सैनिक वगैरे नाही. लहानपणी गांधीजींचे भाषण चंद्रपूरला ऐकल्यावर त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ती आणि तिच्या मैत्रिणी दारुच्या दुकानावर पिकेटिंग करावयाला प्रवृत्त झाल्या, एवढेच प्रत्यक्ष सार्वजनिक राजकीय काम. मात्र चळवळीत भाग घेणाऱ्यापेक्षाही त्याचा संसार करणाऱ्या गृहिणीला काकणभर जास्तच भोगावे लागते. वडिलांचा तुरुंगवास, सतत दौरे आणि अधूनमधून केलेल्या वकिलीत होणारे तुटपुंजे उत्पन्न या साऱ्यांचीच तिला उमेदीच्या काळात सोबत होती. चळवळीच्या यशस्वितेसाठी अशा अनेकांचा मूक सहभाग लागतो. त्या साऱ्यांची प्रतिनिधी म्हणूनही हे पुस्तक आईला अर्पण केले आहे.

नरेन्द्र चपळगावकर



स्वामी रामानंद तीर्थ



बाबासाहेब परांजपे



गोविंदभाई श्रॉफ

१

अनपेक्षित लाभलेले राजपद

राजसत्ता उदयाला येतात आणि लयाला जातात. उरतात त्या त्यांच्या आठवणी. त्यांचा इतिहास. ऐतिहासिक सत्य कित्येक वेळा कल्पिताहूनही अद्‌भूत असते. काही वेळा ते भावी पिढ्यांना मार्गदर्शकही असते. पन्नास वर्षांपूर्वी १७ सप्टेंबर १९४८ रोजी अशीच एक राजवट दोनशे चोवीस वर्षे नांदून संपुष्टात आली.

मोगलांचा औरंगाबादचा सुभेदार असलेल्या मीर कमरुद्दीनने दुबळ्या दिल्लीविरुद्ध बंड करुन ३० सप्टेंबर १७२४ रोजी साखरखेडल्याच्या लढाईत मोगल सरदार मुबॉरिजखानाचा पराभव केला व स्वतंत्र कारभाराला सुरवात केली. निजामुल्मुल्क पदवी धारण करुन, नवी राजवट प्रारंभ करणारा हा आसफजाही घराण्याचा संस्थापक. असे म्हणतात, की वऱ्हाडात एलिचपूरला त्याचा मुक्काम असताना, एका साधूने त्याला फडक्यात बांधलेल्या सात कुलच्यांची (गव्हाच्या भाकरींची) भेट दिली. आसफजाही राजवटीने ते पिवळे फडके व कुलचे यांची आठवण म्हणून आपला ध्वज पिवळा ठरवला व त्यावर कुलच्याची आकृती अंकित केली. योगायोग म्हणजे सात कुलच्यांची भेट स्वीकारलेल्या या राजवटीत सातच राजे झाले. भारतातील ब्रिटिश राजवटीत जी मांडलिक संस्थाने होती, त्यात आसफजाहांचे हैदराबाद आकाराने दुसरे, तर लोकसंख्येच्या मानाने सर्वात मोठे होते.

संस्थानाचे क्षेत्रफळ ८२,३१३ चौरस मैल तर लोकसंख्या १९४१ च्या शिरगणती प्रमाणे १ कोटी ६३ लक्ष ३८ हजार ५३४ होती. मीर कमरुद्दीन, निजामअलीखान, सिकंदरजाह, नासिरुद्दोला, अफजलुद्दोला, महबूबअली या सहा आसफजाही राजानंतर मीर उस्मानअलीखान हा सातवा निजाम म्हणून राज्यावर आला.शेवटचा निजाम मीर उस्मान अलीखान हा या भल्या मोठ्या आणि श्रीमंत संस्थानचा राजा होता. मात्र हे राजपद त्याला फारच अनपेक्षितरीत्या मिळाले होते. प्रमाणाबाहेरचे मद्यपान व अतिरिक्त विषयासक्ती यामुळे आजारी पडलेले सहावे निजाम महबूबपाशा बेशुद्धीत गेले व आठवडाभरानंतर २९ ऑगस्ट १९११ रोजी त्यांचा मृत्यू झाला. ते वारले त्यावेळी त्यांचा एकच औरस मुलगा हयात होता. त्याचे नाव सलाबतजाह. त्याचे वय त्या वेळी बारा वर्षांचे होते. खरे म्हणजे त्याला राज्यावर बसवले जायचे; परंतु अज्ञान मुलाला राज्यावर बसवण्याने अनेक प्रश्न निर्माण झाले असते व ब्रिटिशांना कारभारात हस्तक्षेपाची संधी मिळाली असती. संस्थानातील कारभारी मंडळींनी म्हणून एक शक्कल लढवली. महबूबअलीच्या जनानखान्यात लग्नाविना दाखल झालेल्या अमतुज जोहरा बेगम नावाच्या शिया असलेल्या स्त्रीचा उस्मानअली हा मुलगा. महबूब

अली व जेहराचा निकाह झालेला नव्हता. मुस्लिम कायद्यानुसार अनौरस मुलाला वारसा हक्क मिळत नाही; पण राजाला सगळेच क्षम्य असते. १८८६ मध्ये जन्मलेला उस्मान हा सलाबतजाहपेक्षा तेरा वर्षांनी वडील होता. लॉर्ड कर्झन हैदराबादेत १९०२ मध्ये आले, त्या वेळी सोळा वर्षांच्या उस्मानला गादीचा वारस म्हणून मान्यता देण्यात आली. त्या वेळी कायदेशीर वारस सलाबत हा केवळ तीन वर्षांचा होता. उस्मानला राज्याचा वारस करण्याची शक्कल त्या वेळचे दिवाण महाराजा किशनप्रसाद, पोलिस खात्याचे मंत्री नबाब शहाबजंग आणि कोतवाल सुलतान यावरजंग या तिघांची होती.

महबूब अलीचा मृत्यू होताच, शहाबजंगाने घोड्यावर शहरात फिरुन उस्मानअली राजा झाल्याचे जाहीर केले व लोकांना महबूबपाशांच्या मृत्यूचे वृत्त कळाले. एक सप्टेंबर १९११ रोजी रेसिडेंट सर अलेक्झांडर पिन्हे याने औपचारिकरीत्या उस्मानअलीला गादीवर बसवून मान्यता दिली, तर मसनदनशीनी म्हणजे सिंहासनारुढ होण्याचा समारंभ आणखी सात दिवसांनी ८ सप्टेंबर रोजी खिलवतमहल या राजप्रासादात झाला. अंगात शेरवानी, डोक्यावर दस्तार (पगडी), शेरवानीवर तिरप्या पट्यावर झळकणारी राजचिन्हे आणि हिरेमाणके अशा वेशात मिरवणुकीने येऊन उस्मानअली गादीवर बसला, तेव्हा आनंदाप्रीत्यर्थ १८ कैद्यांना सोडण्यात आले. १८ मोहरा, ५२५ चांदीचे रुपये व दहा बकरे यांचा दानधर्म करण्यात आला. त्याच्या राजवटीला दृष्ट लागू नये, म्हणून त्याच्यावरुन एक कोंबडे उतरुन टाकण्यात आले. परंतु विधिलिखित काही टळले नाही. उस्मानअलीच्याच काळात आसफजाही राज्य संपुष्टात आले.

राज्यावर येताच काही दिवसांतच आपल्याला राजपद मिळवून देणाऱ्या तिघांनाही त्याने कामावरुन दूर केले. निजामाची इंग्रजांकडे कागाळी करणाऱ्या एका अर्जावर कोणी तरी दिवाण महाराजा किशनप्रसादांची खोटी सही केली होती. त्याचा आधार घेऊन त्यांने किशनप्रसादांना राजीनामा देण्यास भाग पाडले. हैदराबादचे कोतवाल यावरजंग यांच्या जागी लालखान या आपल्या पाठीराख्या पण अकार्यक्षम व्यक्तीची नेमणूक केली. या लालखानानेच महाराजा किशनप्रसादांच्या खोट्या सह्यांचे अर्ज तयार करविले होते. तरूण वयातच मद्यपानाची सवय उस्मानअलींना लागली होती. ती प्रमाणाबाहेर वाढल्याने त्यावर उतारा म्हणून काही मंडळींच्या सल्ल्याने त्यांनी अफूची सवय लावून घेतली. रोज अफू घेण्यामुळे उस्मानअलींचा संतापी स्वभाव निवळेल, असा अंदाज होता.

उस्मानअलींना कायदेशीर लग्नाच्या चार बायका होत्या. त्या व्यतिरिक्त १९५५ मधील आकडेवारीप्रमाणे त्यांच्या जनानखान्यात ४२ स्त्रिया होत्या. त्यांना झालेल्या एकूण पन्नास मुलांपैकी तेव्हा तेहतीस हयात होती. त्यांना सेहेचाळीस नातवंडेही होती. त्यांची पहिली

कायदेशीर पत्नी अझिमुन्निसाबेगम उर्फ दुल्हन पाशा बेगम हिला दोन मुले व एक मुलगी झाली. मोठा मुलगा हिमायत अलीखान हा प्रिन्स ऑफ बेरार म्हणून ओळखला गेला. दुसरा शुजातअली. मुलगी शहजादी पाशा.

जावयाचे तोंड पाहिले तर निजामावर संकट येते, या दंतकथेमुळे असेल अगर इतर कुठल्या कारणाने असेल; परंतु ही शहजादी पाशा अखेरपर्यंत अविवाहितच राहिली.

निजामाच्या चौथ्या कायदेशीर लग्नाची हकीकतही सांगण्यासारखी आहे. १९२३ च्या जानेवारीमध्ये व्हाईसरॉयना एक तार आली. हैदराबादेहून नवाब सिकंदर नवाजजंग यांनी पाठवलेल्या या तारेत नवाबसाहेबांनी तक्रार केली होती, की त्यांची बहीण व त्यांची आई काही करमणुकीचा कार्यक्रम पाहण्यासाठी निमंत्रणावरुन राजवाड्यात गेल्या. त्यांना तेथेच अडकवून ठेवण्यात आले आहे. आपल्या बहिणीशी जबरदस्तीने लग्न करण्याचा निजाम प्रयत्न करीत आहे, असे सिकंदर नवाजजंगांचे म्हणणे होते. त्या वेळी चोवीस वर्षांची असलेली मजहरुन्नीसा नात्याने उस्मानअलीची चुलत चुलत बहीण लागत होती. रेसिडेंटने चौकशी केली, तेव्हा निजामाने कळविले, की नऊ वर्षांपूर्वीच आपला मजहरुन्निसेशी वाङ्‌निश्चय झालेला आहे. काही कारणाने निकाह होऊ शकला नव्हता. तो आता झाला असून, तिला आपल्या पत्नींमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे स्थानही देण्यात आले आहे. या प्रकरणी हस्तक्षेप करु नये, असे आपले मत रेसिडेंट चार्ल्स रसेलने भारत सरकारला कळवले.

प्रचंड संपत्ती, मोठा जनानखाना, शेकडो अधिकारी व नोकर-चाकर यांच्या गराड्यातही निजामाला भावनिकदृष्ट्या जवळचे असे कोणी नव्हते. स्वतःच्या मुलांशीही तो प्रथेप्रमाणे सरळ बोलत नव्हता. मध्यस्थांमार्फत बोलणे चाले. विलक्षण कोरड्या स्वभावाच्या एकलकोंड्या निजामाच्या अवतीभवती असे ती फक्त त्याची अविवाहित मुलगी शहजादी पाशा.

◆ ◆ ◆

२
श्रीमंत तरी लोभी आणि कंजूष

'जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती' म्हणून गणल्या गेलेल्या शेवटच्या निजामाची व्यक्तिगत संपत्ती किती असावी याबाबत वेगवेगळे अंदाज करण्यात आले आहेत. एक ब्रिटीश पत्रकार अर्न्स्ट हॉसर याने केलेल्या अंदाजानुसार ती पन्नास कोटी पौंडापेक्षा जास्त होती. मोत्यांना ऊन देण्यासाठी एकदा ते महालाच्या गच्चीवर अंथरण्यात आले, तर गच्ची अपुरी पडली असे जडजवाहर, हिरे-मोती शिवाय सोन्याची भांडी त्याच्याजवळ होती. संस्थानच्या उत्पन्नातून तो दर वर्षी पंचाहत्तर लाख रुपये स्वतःच्या खासगी खर्चासाठी घेत असे. शिवाय सर्फखास या नावाने ओळखली जाणारी त्याची व्यक्तिगत जहागीर होती. तिचे वार्षिक उत्पन्न एक कोटी रुपयांहून अधिक येत असे.

कायदेशीर मार्गाने दर वर्षी अशा रीतीने पावणेदोन कोटी रुपयांपेक्षा अधिक मिळकत होत असतानाही निजामाचा लोभ कमी झालेला नव्हता. प्रजेची लूट करण्याचा एक मार्ग त्याने शोधला होता तो म्हणजे अप्रत्यक्ष सक्ती असलेले नजराणे. राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी, त्याच्या वाढदिवसासारख्या विशेष प्रसंगी, अगर त्याने राजधानी बाहेर एखाद्या ठिकाणाला भेट दिली असताना नाममात्र म्हणून एक तरी सोन्याचे नाणे नजर करण्याचा रिवाज होता. आता उस्मान अलीने त्याला सक्तीचे रुप दिले. मार्च १९२३ मध्ये संस्थानच्या शिक्षण खात्याने एक परिपत्रक काढले, की निजामसाहेबांनी विद्यार्थ्यांना शहरातील बागेआम या उद्यानात निमंत्रित केले आहे. या भेटीच्या वेळी निजाम या विद्यार्थ्यांना खाऊ वाटणार नव्हता. उलट या परिपत्रकाला एक अर्जाचा नमुना जोडला होता. त्यात विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न व तो या भेटीच्या वेळी निजामाला देणार असलेल्या नजराण्याची रक्कम शिक्षकाने भरुन घ्यावयाची होती. रेसिडेंट रसेलला हे कळताच १२ मार्च रोजी त्याने निजामाची भेट मागितली. निजामाने ही भेट दिलीच नाही. १७ मार्च रोजी रेसिडेंटने निजामाला पत्र लिहून हे नजराणे घेणे थांबवण्याची सूचना केली आणि परखडपणे आठवण करुन दिली, की नजराणे घेण्याची पद्धत इंग्लंडमध्येही होती; परंतु चार्ल्स राजाने त्याचा दुरुपयोग करताच त्याला आपले डोके गमवावे लागले. निजामाने आपल्या उत्तरात लिहिले, की इंग्लंड व हैदराबाद यांच्या वातावरणात फरक आहे. तेथे लोकशाही आहे, येथे ती नाही. येथे लोकच स्वेच्छेने नजराणे देऊ इच्छितात, ते बंद करणे त्यांना आवडणार नाही. १८ मार्च १९२३ रोजी निजामाने नजराणे जिल्ह्याच्या शासकीय तिजोरीत जमा करावेत, असा हुकूम काढला; परंतु त्यामुळे प्रश्न सुटणे शक्य नव्हते. सर्व शासकीय विभागांना प्रत्येक जिल्ह्यातून पाच

हजारांपासून ६० हजारांपर्यंत नजराणे गोळा करण्याचे इष्टांक ठरवून देण्यात आले होते. गोळा झालेली रक्कम ही हिशेबात दाखवली जात नाही, अशाही तक्रारी होत्या. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकांनी तर असा अर्जच पाठवला, की त्यांच्याकडून दीड लाख रुपये गोळा करण्यात आले व त्यापैकी फक्त ६० हजारच निजामाकडे पाठवण्यात आले आहेत, याची चौकशी करावी.

याशिवाय पैसा गोळा करण्याचा अवलंबिण्यात आलेला मार्ग म्हणजे जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करताना त्यांच्याकडून पैसे घेणे. २५ ते ३० हजार रुपये अशा नेमणुकीसाठी स्वीकारले जातात, अशी बोलवा होती. याबद्दल रेसिडेंटने तक्रार केली तेव्हा निजाम म्हणाला, की मी कोणाचीच नेमणूक करीत नाही, नेमणुका मंत्रिमंडळामार्फत होतात. नेमणुकीचे हुकूम मंत्रिमंडळाचे कार्यालय काढत होते, हे खरेच होते. मात्र जेव्हा या प्रकरणातील तीन भ्रष्ट अधिकाऱ्यांना - नबाब सरदार अली खान, रहीमयारजंग व फसील अली खान यांना - काढून टाकण्याची सूचना करण्यात आली तेव्हा निजामाने त्याला नकार दिला.

स्वतःच इंग्रजांचे मांडलिक असलेल्या निजामाचे मांडलिक असलेले काही हिंदू संस्थानिक होते. गढवाल, अनागोंदी, गोपाळपेठ वगैरे दहा संस्थाने होती. या संस्थानांना निजामाच्या स्वारीने कधी समक्ष भेट द्यावयाचे ठरवल्यास संस्थानिकांची पाचावर धारण बसे. कारण निजाम आला म्हणजे त्याला दोन लाख रुपये 'नजर' द्यावे लागत. काही संस्थानांचे वार्षिक उत्पन्नही तेवढे नव्हते. शेवटी या सगळ्या 'नजर' प्रकरणाची दखल दिल्लीतील ब्रिटीश सत्तेला घ्यावी लागली व लॉर्ड रिडिंग यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे (जो पुढे इरविन यांच्या काळात अमलात आला) महसूल व पोलिस खात्याचे प्रमुख म्हणून ब्रिटिश अधिकारी संस्थानात पाठवण्यात आले. सर रिचर्ड ट्रेंच यांची निजामाच्या मंत्रिमंडळाचे महसूलमंत्री म्हणून व एक आयसीएस अधिकारी थिओडोर टास्कर यांची महसूल खात्याचे महासंचालक म्हणून नेमणूक झाली. पोलिस महासंचालक पदावरही याच वेळी एक ब्रिटिश अधिकारी माल्कम आर्मस्ट्राँग नेमले गेले. ही पद्धत पुढे चालू राहिली.

शेवटच्या निजामाच्या कंजूषपणाच्या खूपच हकीकती प्रसिद्ध आहेत. तो एकच शेरवानी सतरा वर्षे वापरत होता, असे एकाने लिहिले आहे. त्यात अतिशयोक्ती असणार. मात्र एवढे खरे, की संपत्तीचा विलक्षण लोभी असलेला हा राजा अतिशय साधेपणाने राही. इतर संस्थानांप्रमाणे हैदराबादेत प्रचंड व सुंदर राजवाडे उभे राहिले नाहीत. निजामाचे कपडे साधे, गबाळे व काही वेळा अस्वच्छ असत. ज्या किंग कोठीमध्ये तो राही तेथे फारसे चांगले फर्निचरही नव्हते. खाण्यापिण्यातही त्याने कधी विशेष पदार्थांची आवड दर्शवली

नाही. निजामाला भेटलेल्या बऱ्याच जणांनी प्रथम भेटीत एवढा साधा व कळाहीन गृहस्थ हैदराबादचा निजाम आहे यावर आपला विश्वासच बसला नाही, असे नमूद केले आहे. मिर्जा इस्माईल यांनी एक आठवण सांगितली आहे. आगा जमालुद्दीन काझरानी हे इराणचे पाहुणे हैदराबादेत आले असताना मिर्जासाहेब त्यांना निजामाच्या भेटीस घेऊन गेले. अजाखाना जेहरा या महालात १९४६ मध्ये झालेली ही भेट आहे. मिर्झा इस्माईलनी निजामाकडे निर्देश करुन म्हटले 'ये शाहे दकन अस्त' (हे आहेत दक्षिणचे राजे). आश्चर्यचकित पाहुणा फक्त एवढेच म्हणाला, 'पनाह बा खुदा !' (परमेश्वर आपले रक्षण करो !)

◆◆◆

३

कदीम आणि जदीद गणपती

हैदराबादमधील आसफिया राजवटीची शेवटची पाच-सात वर्षे सोडली, तर पूर्वी या संस्थानात हिंदू-मुस्लिमांचे संबंध फार सौहार्दाचे होते, बहुसंख्य असलेल्या हिंदू प्रजेला मुस्लिम राजा व त्याच्या भोवती गोळा झालेला मुस्लिम अधिकारी वर्ग फार उदारपणे वागवी, असा अनेकांचा समज आहे ; परंतु तो खरा नाही. शेवटचा निजाम मीर उस्मानअली खान हा कवीही होता. त्याने एका पद्यात आपली भूमिका स्वच्छपणे सांगितली आहे -

''सलातीने सलफ सब हो गये नजरे अजल उस्माँ
मुसलमानों का तेरी सलतनतसे है निशाँ बाकी''
(अनेक राज्ये आगीच्या, काळाच्या भक्षस्थानी पडून नष्ट झाली.
आता उस्मान, तुझ्या राज्याच्या रुपानेच मुस्लिमांचे नाव शिल्लक आहे.)

जे राज्य मुस्लिमांचे प्रतीक म्हणून शिल्लक आहे, असे उस्मानअली सांगत होते, त्यात मुस्लिम केवळ बारा-तेरा टक्के होते. पंच्याऐंशी टक्के जनता हिंदू होती.

१९११ मध्ये उस्मानअली राज्यावर आले. त्यांच्या पूर्वी काही फार वेगळी परिस्थिती नव्हती. १८९९ मध्ये म्हणजे सहावे निजाम मीर महबूबअली खान राज्यावर असताना एक हुकूम जारी करुन देवळांच्या डागडुजीला बंदी करण्यात आली. हा हुकूम खालीलप्रमाणे होता :

''दिवाणसाहेबांच्या आज्ञेवरुन या जाहीरनाम्याद्वारे सर्वांना कळवण्यात येत आहे, की हैदराबाद शहरात व शहराबाहेर जेथे मुस्लिमांची संख्या जास्त आहे, तेथे जी देवळे पूर्वीपासून आहेत त्यांच्या सद्यःस्थितीत कोणतीही वाढ करण्यात येऊ नये. ती दुरुस्त करण्यात येऊ नयेत व आहेत त्या स्थितीतच राहू द्यावीत.''

या हुकमाचा उद्देश स्पष्ट आहे. देवळांची दुरुस्ती न केली म्हणजे कालांतराने ती पडून जातील व नष्ट होतील. २१ ऑगस्ट १९०२ रोजी आणखी एक हुकूम जारी करण्यात आला व कोणतेही देऊळ किंवा मशीद सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय बांधण्यास मनाई करण्यात आली. देऊळ व मशीद दोन्हीसाठी हुकूम असला तरी अंमलबजावणी मात्र वेगवेगळ्या प्रकारे होई. देऊळ बांधण्याची परवानगी मागणाऱ्या अर्जाचे उत्तरच वर्षानुवर्षे येत नसे मशिदीबाबत मात्र तत्परतेने कारवाई होई.

मुस्लिमांच्या मोहरमच्या काळात कित्येक वेळा हिंदूंचे गणेशोत्सव किंवा दसऱ्यासारखे सण येत. १७ आबान १३२६ फसली (१९१७) व १२ आबान १३२८ फसली (१९१९)

रोजी काढण्यात आलेल्या दोन हुकूमांन्वये खालील निर्बंध घालण्यात आले होते.

मोहरमच्या काळात दसरा येत असल्यामुळे निजामसाहेबांच्या संमतीने खालील हुकूम देण्यात येत आहे.

१) राज्यातील सर्व हिंदूंनी आपापल्या घरात कसलीही वाद्ये न वाजवता पूजा व इतर धार्मिक विधी उरकून घ्यावेत.

२) ज्यांना सीमोल्लंघनास जायचे आहे, ते कसलीही वाद्ये न वाजवता व आनंददायक वस्तूंचा उपयोग न करता जाऊ शकतात.

३) मोठमोठ्या देवळांत अगदी मामुली वाद्ये वाजवून पूजा करावी व देवळाच्या बाहेर निघू नये. मुस्लिमांनी देवळात जाऊ नये.

४) दसऱ्याच्या दिवशी जे झेंडे, गुढ्या वगैरे उभारावयाचे असतील ते दसऱ्याच्या दिवशी न उभारता मोहरम संपल्यावर उभे करावेत व त्या दिवशी पूजा वगैरे विधी करावेत.

५) जानेवारी १९१० रोजी पोलिस महासंचालकांनी दिवाणांच्या आज्ञेवरुन एक आदेश काढला. त्यात म्हटले होते :

'पूर्वी शाळेतील मुले गणपतीची मिरवणूक काढत असत. पुढे पुढे इंग्रजी हद्दीतील प्रजेचे, विशेषतः पुण्यातील ब्राह्मणांच्या अनुकरणाने हा उत्सव निजाम इलाख्यातही थाटात होऊ लागला. एवढेच नव्हे, तर औरंगाबाद येथे या उत्सवाची येथवर मजल पोचली, की हिंदू-मुस्लिमांत तंटे उत्पन्न झाले. कसबे आळंद (जि. गुलबर्गा) येथे गणपतीसंबंधी झगडा होता. मुसलमानांचे म्हणणे असे होते, की मशिदीसमोरुन मिरवणूक जाऊ देणार नाही व ही (गणपती मिरवणुकीची) चाल नवीन आहे. कसबे टेकमाल येथेही बालाजीच्या रथाची मिरवणूक मशिदीवरुन नेण्यास मुस्लिमांचा आक्षेप होता. असे नव्याने करणे म्हणजे इस्लामची तोहीन (अपमान) असल्यामुळे मुस्लिमांनी मिरवणुकीस मनाई केली व दंगा झाला. अनेक ठिकाणी असे तंटे उत्पन्न होतात. सबब खालील हुकूम काढण्यात येत आहे :

हुकूम : पुष्कळ काळापासून सोडून दिलेला एखादा धार्मिक उत्सव पुन्हा सुरु करुन साजरा करायचा असेल किंवा एखादा उत्सव नव्याने सुरु करायची कोणाची इच्छा असेल व त्यामुळे इतर कोणतीही जात नाराज असेल अथवा शांतता आणि आरोग्याच्या दृष्टीने तो उत्सव अपायकारक असेल, तर असल्या नवीन उत्सवास धर्मखात्याचे अधिकारी प्रतिबंध करु शकतात.

हा हुकूम म्हणजे धर्मवेड्यांच्या हातात एक कोलीतच होते. त्यामुळे कोणता गणपती जुना आहे व कोणता गणपती नव्यानेच बसवला आहे, असे वाद उत्पन्न होऊ लागले. नव्याने गणपती उत्सव करणे म्हणजे इस्लामचा अवमान आहे, अशी भूमिका शासनानेच मान्य केली.

संस्थानातील एक विनोदी लेखक वा. दा. गाडगीळ (फिरस्ता) यांनी उपरोधिकपणे लिहिलेल्या लेखात या हुकमाची हजेरी घेतली. मुद्रणाचे फारसे स्वातंत्र्य नसतानाही फाटकांच्या 'निजाम विजय' मध्ये हा लेख प्रसिद्ध झाला. कदीम (जुना) गणपती व जदीद (नवा) गणपती, असे लेखाचे शिर्षक होते. त्या वेळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर विनोदाच्या आश्रयाने केलेले ते परिणामकारक भाष्य होते. मे १९३४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'खुसखुशीत मेवा' या पुस्तकात हा लेख समाविष्ट झाला आहे. भरत खंडातील एका भागात लोक आपल्या नावामागे 'जदीद' व 'कदीम' ही म्लेंच्छ विशेषणे लावीत आहेत याबद्दल गणपती नारदाकडे तक्रार करतो आहे, आणि याचे कारण शोधण्यास सांगतो आहे. मी जर एकच आहे, तर मी जदीद व कदीम असा दोन्ही कसा असू शकेन, असा प्रश्न गणपती विचारतो आहे. आपले कदीमत्व (जुनेपणा) अथवा जदीदत्व (नवेपणा) ठरविण्याचा अधिकार या भागात नाशवंत जगातील अशाश्वत मनुष्यजन्म घेतलेल्या व स्वतःच हंगामी असणाऱ्या तहसीलदारास देण्यात आला आहे, याचे गणपतीला आश्चर्य वाटले आहे. नारद पोक्त सल्ला देतात, की कलियुग संपेपर्यंत देवांच्या कचेरीने सुटी घेतली आहे. हे युग संपेपर्यंत तू कोणालाच शिक्षा करु शकत नाहीस. तेव्हा तू सध्या या गोष्टीचा विचार सोडून दे. गजाननाने हट्ट सोडला नाही. तेव्हा नारद त्याला महादेव, ब्रह्मदेव, विष्णू, चित्रगुप्त इत्यादींकडे घेऊन जातात. तेथे प्रवेश करण्यापूर्वी द्वारपालाला चिरिमिरी म्हणून मोदक द्यावे लागतात. अनेक 'कॉन्फिडेन्शियल' व 'पॉलिटिकल' फायली धुंडाळूनही ही दोन विशेषणे कशी चिकटली याचा उलगडा होत नाही वगैरे कथाभाग त्यात आला आहे.

हैदराबाद संस्थानात जातीय दंगली १९३० नंतर सुरू झाल्या. याचा अर्थ त्यापूर्वी जातीय सामंजस्य होते, असा नाही. मुकाट्याने अन्याय लोक सहन करीत. त्यामुळे दंगल होण्याचा प्रश्न नसे. बीड शहरातील कनकालेश्वराच्या प्राचीन मंदिरात दर्शनासही आत जाण्यास गुंडगिरीने मनाई करण्यात आली होती. पोलिस कारवाईनंतरच त्या मंदिरात निर्वेधपणे सर्वांना जाता येऊ लागले. असे अनेक प्रकार अनेक ठिकाणी घडत होते.

आपले धार्मिक व नागरी अधिकार बजावण्याचा आग्रह हिंदू धरु लागले, तेव्हापासून दंगली होऊ लागल्या. दहशतीच्या मार्गाने त्यांना गप्प करता येईल, असा विचार झाला तेव्हा संस्थानातील जातीय वातावरण अधिक बिघडले.

◆ ◆ ◆

४

उस्मानिया विद्यापीठ - सांस्कृतिक आक्रमणाचे हत्यार

भारतीय भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारणारे देशातील पहिले विद्यापीठ अशी उस्मानिया विद्यापीठाची भलावण करण्यात येते. मात्र, ही प्रशंसा गैरसमज निर्माण करणारी आहे. दक्षिणेकडे उस्मानिया विद्यापीठाने उर्दू माध्यम स्वीकारले; परंतु ज्या राज्यात हे विद्यापीठ सुरु झाले, त्या राज्याच्या लोकभाषेचा माध्यम म्हणून विद्यापीठाने स्वीकार केलेला नव्हता. कारण त्या राज्याच्या लोकांना उच्चशिक्षित करण्याच्या उद्देशाने ते विद्यापीठ स्थापन झालेच नव्हते.

हैदराबाद संस्थानात 'मुन्शी फाजिल' या पंजाब विद्यापीठ घेत असलेल्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी 'दारुल उलूम' या नावाची एक शिक्षण संस्था होती. माध्यम फारसी होते. दुसरे सालारजंग यांच्या पंतप्रधानकीच्या काळात १८८४ मध्ये फारसीऐवजी राज्यकारभाराची भाषा उर्दू झाली. तेव्हा उर्दू प्रशिक्षित नोकरवर्ग आवश्यक झाला. उर्दूतून मुन्शी परीक्षेचे शिक्षण देणारी संस्था असावी व तिच्या परीक्षा हैदराबादेत घेता याव्यात, असाही विचार पुढे येऊ लागला. राज्यावर येताना अज्ञान असलेला सहावा निजाम मीर महबूब अलीखान सज्ञान झाल्यानंतर त्याला अधिकार प्रदान करण्याचा कार्यक्रम हैदराबादेत झाला. या कार्यक्रमासाठी व्हाइसरॉय लॉर्ड रिपन आले होते. त्यांच्याबरोबर विल्फ्रेड स्कॅवन ब्लंट हे इस्लामी संस्कृतीचे अभ्यासकही आले होते. त्यांनी हैदराबादेत इस्लामी संस्कृतीचे केंद्र ठरेल, असे मुस्लिम विद्यापीठ असावे व देशातील मुस्लिमांना त्यात परंपरागत; तसेच आधुनिक शास्त्रांचे शिक्षण मिळावे, अशी कल्पना मांडली. अशीच सूचना त्याच सुमारास हैदराबादेत आलेल्या इराणच्या हमदानीच्या बृहत इस्लामिक चळवळीचे एक पुरस्कर्ते जमालुद्दीन अफगाणी यांनी केली. विद्यापीठाचे माध्यम मुस्लिमांची स्थानिक भाषा असावी, अशी अफगाणींची सूचना होती, तर सर सय्यद अहमद खानांचे म्हणणे विद्यापीठाचे माध्यम-इंग्रजी असावे, असे होते. संस्थानच्या अधिकाऱ्यांबरोबरच्या चर्चेत सय्यद अहमदांनी सध्या स्थानिक भाषेचा प्रयोग करुन पाहण्यास हरकत नाही, असे सांगितले. १९०६ मध्ये 'दारूल उलूम' शिक्षण संस्थेची मान्यता पंजाब विद्यापीठाने काढून घेतली. ती संस्था संस्थानच्या शिक्षण खात्याच्या कक्षेत आणण्यात आली. 'हैदराबाद शिक्षण परिषद' नावाची एक संस्था सरकारी आशीर्वादाने सुरु झाली होती. १९१३ मध्ये या परिषदेच्या अधिवेशनात अकबर

हैदरींनी संस्थानात विज्ञान, तंत्रज्ञान व कलाविषय उर्दू माध्यमातून शिकवणारे विद्यापीठ स्थापन व्हावे अशी मागणी केली. अकबर हैदरींनी शिक्षण खात्याकडे विद्यापीठाच्या कल्पनेचा पाठपुरावा करताना उर्दू ही देशातील सर्वत्र बोलली जाणार भाषा असल्यामुळे या विद्यापीठाचे माध्यम उर्दू असावे, असे समर्थन केले होते. या वेळी हैदरी शिक्षण खात्याचे चिटणीस होते. संस्थानच्या लोकभाषा तेलगू, मराठी व कानडी आहेत व संस्थानातील बहुसंख्य लोक उर्दू बोलत नाहीत, हे हैदरींना माहीत होते. हेच हैदरी पुढे (१९३७-१९४१) हैदराबादचे पंतप्रधान झाले.

निजामाला विद्यापीठाच्या स्थापनेची विनंती करणारी एक 'अर्जदास्त' २४ एप्रिल १९१७ रोजी सादर करण्यात आली व दोनच दिवसांनी विद्यापीठाची स्थापना करणारे शाही फर्मान प्रसिद्ध झाले. विद्यापीठाचे नाव सातव्या निजामाने स्वतःच्या नावावरुन 'जामिया उस्मानिया' म्हणजे 'उस्मानिया विद्यापीठ' असे ठेवले होते. एकदा उर्दू माध्यमाचे विद्यापीठ करावयाचे हा निर्णय झाला की उर्दूत पुस्तके नाहीत, पारिभाषिक शब्द नाहीत, वगैरे आपण जसा मराठीबद्दलचा घोळ घातला व घालतो तसा घातला गेला नाही. जबरदस्त राजकीय इच्छाशक्तीचे पाठबळ विद्यापीठाला लाभले होते. मूळ उत्तर प्रदेशातून संस्थानच्या सेवेत आलेले मोहमद अब्दुल हक यांच्या नेतृत्वाखाली १४ ऑगस्ट १९१७ रोजी एक भाषांतर विभाग स्थापन करण्यात आला व सर्व आवश्यक ते पारिभाषिक शब्द तयार करण्याचे काम धडाक्याने सुरु झाले. नव्या शब्दांची टवाळी करण्यात कोणी गुंतून पडले नाहीत.

उस्मानिया विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी अनेक वेळा बाहेरचे विद्वान व राजकीय नेते पाहुणे म्हणून येत. आलेले पाहुणे विद्यापीठाचे माध्यम म्हणून उर्दूचा, एका भारतीय भाषेचा, स्वीकार करण्यात आला आहे याबद्दल गहिवरुन बोलत. त्यांना संस्थानातील वस्तुस्थितीची कल्पना नसे, किंवा तिकडे लक्ष देण्याची त्यांना गरज वाटत नसे. नुसत्या भाषेचीच नव्हे, तर गणवेशातही इस्लामी संस्कृतीची सक्ती करण्यात आली होती. शेरवानी व पायजमा असा गणवेश होता.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत उस्मानिया विद्यापीठाच्या स्थापनेचे उद्दिष्ट कायम राहिले. हैदराबाद संस्थानच्या कारभारी मंडळीत बाहेरुन आलेले मुस्लिम सुशिक्षित व या विद्यापीठात शिकलेले असे दोघेही होते. या दोघांनी हे विद्यापीठच नव्हे, तर हे संस्थानच इस्लामी संस्कृतीशी बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला. उर्दू माध्यमाचा एक परिणाम असा झाला की विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयांत मुस्लिमांची संख्या लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणाच्या कितीतरी पट राहिली. अनेक देशातील विद्यापीठे नव्या विचारांची, परिवर्तनाची केंद्रे बनली. त्या देशातील क्रांतीमध्ये, बदलामध्ये विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची ठरली. उस्मानिया विद्यापीठ हे

मध्ययुगीन कल्पनांना कवटाळून बसणारे व नव्या विचारांचा, जगातील वास्तवाचा स्पर्शही होऊ न देणारे तथाकथित सुशिक्षित निर्माण करणारे विद्यापीठ बनले. १९३९ मध्ये हिंदू विद्यार्थ्यांना वंदे मातरम म्हणण्यास या विद्यापीठाने बंदी केली. निजामी राज्याच्या शेवटच्या काळात जातीय भावनांबरोबर या विद्यापीठातील अनेक सुशिक्षित वाहवत गेले.

पोलिस कारवाई (१९४८) झाली व हैदराबाद भारतीय संघराज्यात विलीन झाले. स्वाभाविकपणे या विद्यापीठाचे स्वरुप बदलण्याची मागणी झाली. मात्र प्रतिगामी शक्तींनी हे विद्यापीठ 'दक्षिणी' (म्हणजे इस्लामी) संस्कृतीचे केंद्र म्हणून टिकले पाहिजे, असा प्रयत्न केला. विद्यापीठाचे माध्यम हिंदी करावे, असाही एक प्रस्ताव होता; परंतु शेवटी ते इंग्रजी झाले. निजामाच्या कारांकर्दीत जे संस्थानात गृह व घटनाविषयक बाबींच्या खात्याचे प्रमुख होते ते अली यावरजंग विद्यापीठाचे कुलगुरु झाले. लोकभाषांना त्यात योग्य स्थान मिळण्यास बरीच वर्षे जाऊ द्यावी लागली. राज्यपुनर्रचना होईपर्यंत ते झाले नाही. त्यामुळे या विद्यापीठासाठी ज्या मराठी व कानडी जनतेचाही पैसा खर्च झाला होता, त्या भाषांना दुय्यम स्थानच शेवटपर्यंत मिळाले. आज हे विद्यापीठ आंध्र प्रदेशाच्या अनेक विद्यापीठांपैकी एक झाले आहे. पोलिस कारवाईनंतर कोणी द्रष्टा कारभारी या विद्यापीठाला मिळाला असता, तर बहुसंख्य जनतेपासून मुद्दाम ज्यांचे वेगळेपण टिकवण्यात आले त्यांना त्यांचे धार्मिक व सांस्कृतिक वेगळेपण टिकवूनही लोकजीवनाशी समरस होण्यास मदत करता आली असती व त्यामुळे त्यांचे जीवन अधिक चांगले करण्याचा प्रयत्न या विद्यापीठाला करता आला असता. मात्र ही गोष्ट राजकारणालाच मंजूर नव्हती.

◆ ◆ ◆

५
खिलाफत आणि लग्ने

पहिल्या महायुद्धात तुर्कस्तान दोस्तराष्ट्रांच्या विरुद्ध युद्धात उतरले आणि ब्रिटिशांना भारतातील मुस्लिम लोकमत आपल्याविरुद्ध जाईल, अशी चिंता वाटू लागली. तुर्कस्तानचा सम्राट हाच खलिफा हे सर्वोच्च धर्मपद धारण करी. पैगंबराचे वंशपरंपरेने आलेले अधिकार असलेले हे पद सर्व मुस्लिमांच्या आदराचा विषय होते.

युद्धाच्या प्रारंभी इंग्लंडचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज यांनी तुर्कस्तानच्या ताब्यातून तुर्क वंशाचे प्राबल्य असलेले आशिया मायनरसारखे प्रांत काढून घेण्यासाठी आम्ही लढत नाही व तुर्कस्तानचे धार्मिक महत्त्व कायम राखू, अशी आश्वासने दिली होती. परंतु युद्धसमाप्तीनंतर या आश्वासनांना हरताळ फासण्यात आला. तुर्की साम्राज्याचे लचके तोडण्यात आले. सौदी अरेबिया, इजिप्त, लेबनॉन या नावाने आज ओळखला जाणारा मोठा भूप्रदेश तुर्कस्तानच्या ताब्यातून काढून स्वतंत्र करण्यात आला. मक्केच्या शेरीफाला पुढे राजपद देण्यात आले. परिणामी खलिफा म्हणून असलेले तुर्कस्तानच्या राजाचे संपूर्ण महत्त्वच संपुष्टात आले. कमाल अतातुर्काच्या राजवटीने तर १९२४ मध्ये खलिफाचे पदच नष्ट केले.

दोस्तांच्या फौजा तुर्कस्तानाच्या विरुद्ध लढू लागताच भारतातील मुस्लिमांच्या दृष्टीने युद्धाचे संदर्भ बदलले. ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नांना मदत म्हणजे तुर्कस्तानच्या विरुद्ध, खिलाफतीच्या विरुद्ध मदत असा अर्थ प्राप्त झाला. खिलाफतच धोक्यात आल्याचे दिसू लागले.

खिलाफतीच्या रक्षणाची मागणी करण्यासाठी १९२० मध्ये गांधीजी व अलीबंधूंनी मोठी चळवळ उभारली. या चळवळीचे पडसाद स्वाभाविकपणेच हैदराबाद संस्थानातही उमटले. संस्थानातील चळवळ वाढू नये, असा प्रयत्न पंतप्रधान सर अली इमाम व स्वतः निजाम करीत होता. परंतु ही गोष्ट अवघड होती. १९२० च्या मार्च व एप्रिल महिन्यांत हैदराबाद, औरंगाबाद, गुलबर्गा, रायचूर, करीमनगर, मेदक व जनगाव येथे 'योमे खिलाफत' (खिलाफत दिन) साजरा करण्यात आला. १६ मार्च व २३ एप्रिल १९२० रोजी हैदराबाद शहरातील विवेक वर्धिनी शाळेच्या पटांगणावर दोन प्रचंड जाहीर सभा भरल्या. दहा - दहा हजार लोक या वेळी हजर होते. त्यात बॅ. असगर, मौलवी फसीयुद्दीन यांसारख्या मुस्लिम नेत्यांबरोबरच केशवराव कोरटकर वगैरे हिंदू नेत्यांचीही भाषणे झाली. या काळात मशिदीत होणाऱ्या नमाजोत्तर सभांत हिंदू पुढाऱ्यांचीही भाषणे होऊ लागली. रायचूरला जुम्मा मशिदीत झालेल्या सभेत प्रेमायतन नावाचा शैक्षणिक आश्रम चालवणाऱ्या व लोकजागृती करणाऱ्या

तारानाथ या नेत्याचे स्वदेशीचे महत्त्व सांगणारे व परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करणारे भाषण झाले. एप्रिल १९२० मध्ये संस्थानातील गुलबर्गा व रायचूर रेल्वे स्टेशनांवरुन शौकत अली जाणार होते. या दोन्ही ठिकाणी रेल्वे फलाटांवर त्यांचे भव्य स्वागत झाले व त्यांना खिलाफत चळवळीसाठी पैसे देण्यात आले. गांधीजींसारख्या हिंदू नेत्याने खिलाफत प्रश्नाबद्दल आंदोलन उभारणे व मुस्लिम लीगने गोहत्या प्रतिबंधास पाठिंबा देणे वगैरे सकृत् दर्शनी आश्चर्यकारक प्रकार भारतात घडले. तसेच हिंदू-मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन हैदराबादेतही काही काळ दिसले.

निजाम हा भारतातील सर्वात मोठा मुस्लिम संस्थानिक. तो या युद्धासंबंधी काय भूमिका घेतो याकडे सर्वांचे लक्ष होते. खिलाफत चळवळीच्या पुरस्कर्त्यांची अपेक्षा निजामाने या चळवळीस उघड पाठिंबा द्यावा अशी होती. उलट ब्रिटिश सरकार या प्रयत्नात होते की निजामाने तुर्कस्तानचा उघड निषेध करावा. निजाम आपल्या राज्यात कितीही कडवे ईस्लामी धोरण अमलात आणत असला तरी त्याचे ईस्लामप्रेम ब्रिटिशांना जेवढे पचेल, रुचेल तेवढेच होते. तीच त्याची मर्यादा होती. ब्रिटिश रेसिडेंटने निजामाला तुर्कस्तानच्या युद्धातील भूमिकेबद्दल खेद व्यक्त करणारे पत्र व्हाइसरॉयला लिहावयास लावले. या पत्रात, युद्धात तुर्कस्तान अक्षराष्ट्रांच्या बाजूने व ब्रिटिशांविरुद्ध युद्धात उतरले ही दुर्दैवी घटना आहे व भारतातील मुस्लिमांचा पाठिंबा ब्रिटिशांनाच राहील, असे म्हटले होते. या पत्राला बरीच प्रसिद्धी देण्यात आली. पुढे १६ मार्च १९२० रोजी निजामाने व्हाइसरॉयला लिहिलेल्या पत्रात 'माझ्या पत्रकामुळे भारतातील मुस्लिमांवर मोठा परिणाम झाला', असा अभिमान व्यक्त केला.

१९२४ मध्ये खलिफाचे पद निकामे झाले. महत्त्वाकांक्षी निजामाला कोणी तरी खुषमस्कऱ्याने सल्ला दिला की ब्रिटिश सत्ता आता कोणाला तरी खलिफाची वस्त्रे देण्याला उत्सुक आहे, तेव्हा तुम्हीच प्रयत्न करुन पाहण्यास हरकत नाही. निजामाने मंत्रिमंडळाकडे व धर्म खात्याकडे ही सूचना पाठवली. जे तुम्हाला खलिफा बनवतील तेच तुमच्या धार्मिक अधिकारांना वेळ आली की आव्हान देतील, तेव्हा या भानगडीत पडू नका, असे निजामाला सांगण्यात आल्यावर त्याने हा नाद सोडला. पुढे ५ मार्च १९२४ रोजी राजे हुसेन यांनी स्वतःला खलिफा घोषित केले. अर्थात ही नवी खिलाफत फारशी कोणाला मान्य झालीच नाही.

ज्या खिलाफतीच्या रक्षणार्थ चाललेल्या आंदोलनाला भारतातील मुस्लिमांचा नेता म्हणून निजामाने पाठिंबा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, त्या खिलाफतीसाठी निजामाने दोनच गोष्टी केल्या. तुर्कस्तानचा निर्वासित झालेला पदच्युत सम्राट अब्दुल

मजीदखान याला त्याने दर वर्षी तीनशे पौंडाचा तनखा देण्याचे जाहीर केले. दुसरी गोष्ट तर उभयपक्षी फायद्याची होती. १२ नोव्हेंबर १९३१ रोजी अब्दुल मजीदखानाची मुलगी राजकुमारी दुर्रे शहवार हिचे हिमायत अलीखान आजमजाह बहादूर या आपल्या मुलाशी व मजीदची पुतणी राजकुमारी निलोफर हिचे मीर शुजाअत अलीखान मोआज्जमजाह बहादूर या आपल्या दुसऱ्या मुलाशी निजामाने लग्न लावून दिले. राज्य गमावलेल्या तुर्की माजी सम्राटाला मांडलिक का होईना पण राज्य असलेल्या घराण्यातील जावई मिळाले आणि माजी खलिफाच्या वंशातील राजकन्या सुना म्हणून मिळाल्यामुळे निजाम उस्मान अलीखानांनाही आपला दर्जा उंचावल्याचे समाधान मिळाले. हा विवाह समारंभ मौलाना शौकतअली व सर अकबर हैदरी यांच्या मध्यस्थीने ठरला होता.

दक्षिण फ्रान्समध्ये नीस शहरात अतिशय साधेपणाने साजऱ्या झालेल्या व कोणताही डामडौल नसलेल्या या लग्न समारंभात काजी म्हणून स्वतः माजी सम्राट मजीदखान यांनीच काम केले व ही लग्ने लावून दिली. लग्नाला साक्षीदार म्हणून हैदराबाद मंत्रिमंडळातील सर अकबर हैदरी, सर रिचर्ड चेवेनिक्स ट्रेंच व नवाब मेहदीयारजंग बहादूर उपस्थित होते. तुर्कस्तानच्या दरबारातील काही माजी मानकरीही या लग्नाला उपस्थित होते. स्वतः निजाम मात्र या लग्नाला हजर नव्हता. १२ डिसेंबर १९३१ रोजी बोटीने नववधू आपल्या पतिराजांसह मुंबईमार्गे हैदराबादेस आल्या. शहरात त्यांच्यासाठी स्थापण्यात आलेल्या स्वागत समितीने या दोन दाम्पत्यांचे शानदार स्वागत केले.

४ जानेवारी १९३२ रोजी नवविवाहितांच्या सन्मानार्थ औपचारिक शासकीय मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळच्या भाषणात रेसिडेंट टेरेन्स कीज म्हणाले, ''मुगल राजांनी वेगवेगळ्या लढाऊ जमातींना एकाच ध्वजाखाली आणण्याचा साहसी उपक्रम भारतात करण्याला प्रारंभ केला, तेव्हापासून कोणत्याही राजपुत्राने समुद्रापारच्या वधूची निवड आपल्यासाठी केली नव्हती.'' लग्नाने राज्ये व राजवंश जोडले जातात व त्याचा राजकारणातही फायदा होतो हे खरे; पण येथे निजामाला इतर राजकीय फायदा मिळवून देण्याची क्षमताच मजीदखान गमावून बसला होता. तो देऊ शकत होता मुस्लिम जगात किंचित आदर. या विवाहांमुळे निजामाला तो खचितच मिळाला.

◆ ◆ ◆

६
लोकजागृतीची पहाट

स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी अगोदर बुसी सारखे फ्रेंच सेनाधिपती आणि नंतर इंग्रजांचा आधार घेणाऱ्या निजामांच्या आसफजाही राजवटीने १८०० साली इंग्रजांचे रीतसर मांडलिकत्व स्वीकारले. 'आसफजाही' राजवटीने रणांगणावर शौर्य गाजवल्याच्या फारशा नोंदी नाहीत. मराठ्यांविरुद्धच्या नऊपैकी आठ लढायात त्यांनी मार खाल्ला होता. मात्र जे स्वाभिमानाने लढले ते नष्ट झाले, जे मोगलांसमोर, इंग्रजांसमोर लाचार झाले, ते टिकले असे इतिहास सांगतो. सार्वभौम सत्तेचा 'विश्वासू दोस्त' म्हणवून घेण्यात धन्यता मानणारे निजामाचे राज्य आपल्या जनतेशी मात्र मग्रुरीने वागत होते. राजा मुस्लिम असला, तरी ८५ टक्के जनता हिंदू होती. या जनतेच्या धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच बिनदिक्कतपणे चालू होता. ही जनता तेलगू, मराठी आणि कन्नड मातृभाषा असलेली होती. या भाषेत शिक्षण घेण्याचीसुद्धा सोय नव्हती. राज्यकारभार उर्दूत, शिक्षण उर्दूत, धार्मिक सण, आणि उत्सवावरसुद्धा निर्बंध, सभा, मिरवणुका, संघटना, वृत्तपत्र, भाषण यांचे स्वातंत्र्य नाही. राजकीय संस्था स्थापन करण्याची तर गोष्टच दूर. अशा दडपशाहीच्या वरवंट्याखाली संस्थानातील जनता भरडली जात होती.

लोकजागृतीचे पहिले प्रयत्न साहजिकच शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात झाले. १९०७ मध्ये हैदराबाद शहरात विवेकवर्धिनी, पुढच्या वर्षी गुलबर्गा येथे नूतन विद्यालय, १९१६ मध्ये परभणीस नूतन विद्यालय, १९१७ मध्ये औरंगाबादेस सरस्वती भुवन व शारदा मंदिर अशा मोजक्याच खाजगी शाळा निघाल्या. परभणीत १९०१ मध्येच गणेश वाचनालय हे मराठवाड्यातील पहिले वाचनालय सुरु झाले. १९१३ मध्ये हैदराबाद उच्च न्यायालयाचे एक न्यायमूर्ती राय बालमुकंद यांनी 'ह्यूमॅनिटेरियन लीग' स्थापन केली. भाग्य रेड्डी नावाच्या संस्थानातील पहिल्या दलित नेत्याने 'आदि हिंदु लीग' स्थापन केली होती. सामाजिक समतेच्या दृष्टीने प्रयत्नशील असणाऱ्या संस्थानातील या पहिल्या संस्था. नांदेड जिल्ह्यातील कवाना गावातील नागोराव देशमुख यांच्या पुढाकाराने सामाजिक परिषदेची अधिवेशने १९१८ पासून भरु लागली. या परिषदांच्या निमित्ताने धोंडो केशव कर्वे, बॅ. मुकुंदराव जयकर, सरलारानी चौधरी वगैरे मंडळी संस्थानात येऊन गेली. १९०१ पासूनच लोकमान्यांच्या प्रेरणेने सुरु झालेला गणेशोत्सव संस्थानातही होऊ लागला. जमीनमोजणी व तंत्रशिक्षण खात्यात पश्चिम महाराष्ट्रातील जे सुशिक्षित तरुण संस्थानात नोकरीस आले, त्यांपैकी अनेक 'केसरी' चे वाचक व टिळक भक्त होते. १९०९ मध्ये जॅक्सनचा नाशिकच्या विजयानंद थिएटरात

गोळी झाडून खून करणारा अनंत लक्ष्मण कान्हेरे व त्याच्या बरोबर फासावर गेलेले देशपांडे-कर्वे औरंगाबादच्या सरकारी कला शिक्षण विद्यालयाचे विद्यार्थी होते.

खिलाफत चळवळ व असहकार आंदोलनाचे पडसाद १९२०-२१ मध्ये संस्थानातही उमटले. खिलाफतीला पाठिंबा देणाऱ्या मोठमोठ्या सभा संस्थानात झाल्या. खादीचा प्रसार होऊ लागला. अनेक तरुणांच्या डोक्यावर गांधी टोप्या दिसू लागल्या. चरखे आले. तारानाथ नावाच्या एका सरकारी शाळेतील शिक्षकाने नोकरीचा राजीनामा देऊन रायचूर जिल्ह्यात खाजगी शाळा सुरु केली आणि 'हिंदू' सारख्या संस्थानाबाहेरील वृत्तपत्रात संस्थानातील दडपशाहीचे चित्रण करणारे लेख लिहिले. उस्मानाबाद जिल्ह्यात हिप्परगा येथे व्यंकटराव देशमुख व अनंतराव कुलकर्णी यांनी एक खाजगी विद्यालय सुरु केले व विद्यार्थ्यांवर राष्ट्रीय विचारांचे संस्कार करण्यास प्रारंभ केला. वामन नाईक, न्या. केशवराव कोरटकर, श्रीपाद दामोदर सातवळेकर, दत्तो आप्पाजी तुळजापूरकर अशा अनेक व्यक्तींनी संस्थानातील सार्वजनिक जीवनात थोडेफार चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सातवळेकर व तुळजापूरकर यांना पुढे संस्थान सोडून जावे लागले. सरकारी पुढाकाराने स्थापन झालेल्या शिक्षण परिषदेत उर्दूच्या सक्तीऐवजी तेलगू, मराठीसारख्या लोकभाषात शिक्षण द्यावे, अशी मागणी होऊ लागल्यामुळे परिषदेचे सरकारीकरण करण्यात आले. १९१८ मध्येच संस्थानात काँग्रेसची शाखा स्थापन झाली. १९२० मध्येच मवाळ पद्धतीने लेखन करणारे; परंतु संस्थानातील लोकजागृतीची नोंद घेणारे 'निजामविजय' साप्ताहिक सुरु झाले. पुढच्याच वर्षी हैदराबाद राजकीय सुधारणा संघ स्थापन झाला; परंतु संस्थानातील बंदीमुळे राजकीय परिषदा मात्र संस्थानाबाहेर भरवाव्या लागल्या.

संस्थानातील ही जागृती दडपण्यासाठी १९२१ मध्ये 'गश्ती निशान ५२' (परिपत्रक क्रमांक ५२) या नावाने कुप्रसिद्ध असलेला हुकूम जारी करण्यात आला. राजकीय परिणाम होऊ शकतील अशा कोणत्याही सभेला या हुकमाद्वारे बंदी घालण्यात आली. सभांना मंत्रिमंडळाची पूर्वपरवानगी आवश्यक करण्यात आली. १९२९ मध्ये ही बंधने आणखी कडक करणारा 'गश्ती निशान ५३' जारी करण्यात आला. मुद्रणालय सुरु करण्यासही मंत्रिमंडळाची परवानगी लागे. १९२६ मध्ये सरकारच्या परवानगीशिवाय खासगी शाळा काढता येणार नाहीत व त्यात सरकारी अभ्यासक्रमच फक्त शिकवावा लागेल, असा हुकूम जारी झाला. ज्या गोष्टींना परवानगी आवश्यक करण्यात येई ती गोष्ट करता येणार नाही, असाच अर्थ असे. कारण परवानगी सामान्यतः मिळतच नसे.

सरकार अर्जविनंत्यांनी बधत नाही, हे लक्षात आल्यानंतर स्वातंत्र्यासाठी संघर्ष हाच एकमेव मार्ग शिल्लक राहिला. पूर्वी अखिल भारतीय काँग्रेसचे धोरण संस्थानी प्रश्नाबाबत

हस्तक्षेप न करण्याचे होते. त्यामुळे मार्गदर्शनही भारतीय नेतृत्वाकडून मिळत नव्हते. १९३५ पासून त्यात थोडा बदल होऊ लागला. संस्थानासकट सर्व भारताला स्वातंत्र्य हे काँग्रेसचे धोरण असल्याचे १९३७ च्या अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या कलकत्ता बैठकीत जाहीर करण्यात आले. गांधीजी संस्थानांच्या चळवळीत लक्ष घालू लागले. मात्र संस्थानातील जनतेला त्यांच्या वेगळ्या राजकीय संस्था स्थापन करण्याचा सल्ला देण्यात आला.

हैदराबादेत कायदेभंग करुन स्टेट काँग्रेसची स्थापना करावयाची असल्यास संस्थानातील नेमस्त विचारांचे प्रस्थापित नेतृत्व उपयोगी पडणार नाही हे लक्षात घेऊन तरूण मंडळी नव्या नेतृत्वाच्या शोधात होती. हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून आलेल्या व्यंकटेश भवानराव खेडगीकरांनी लोकसेवेसाठी संन्यास घेतला होता व ते स्वामी रामानंद तीर्थ झाले होते. हिप्परग्याच्या शाळेचे संचालक, तसेच दिगंबरराव बिंदू व आ. कृ. वाघमारे यांसारखे कृतिशील राजकारण करू इच्छिणारे मराठवाड्यातील कार्यकर्ते यांचा त्यांच्याशी विचारविनिमय चालू होता. संस्थानातील तेलगू भाषिक प्रदेशास तेलंगण संबोधण्यात येई. त्या भागात आंध्र महासभा व कानडी भागात कर्नाटक परिषद अशा अराजकीय परिषदा स्थापन झाल्या होत्या. त्याच धर्तीवर मराठवाड्यातही संस्था स्थापन करण्याचा वामन नाईक, काशीनाथराव वैद्य, दिगंबरराव बिंदू आदींचा प्रयत्न होता. त्यांना वाघमारे-अनंतराव कुलकर्णी वगैरेंनी पाठिंबा दिला. दिवाण महाराजा किशनप्रसादांच्या जहागिरीतल्या परतूड येथे जून १९३७ मध्ये परभणीचे एक वकील गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली हैदराबाद संस्थान महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन भरले. हा मराठवाड्यातील कार्यकर्त्यांचा पहिला मेळावा होता. संस्थानातील परिस्थितीबाबत अस्वस्थ असलेले व प्रत्यक्ष हालचाल करु इच्छिणारे शेकडो कार्यकर्ते परतूडला जमले. त्यात काशीनाथराव वैद्यांसारख्या नेमस्त विचारांच्या नेत्यापासून दिगंबरराव बिंदू, आनंद कृष्ण वाघमारे, श्रीनिवासराव बोरीकर, अनंतराव कुलकर्णी यांसारखे संस्थानच्या विविध भागात सार्वजनिक कार्यात भाग घेणारे व विचाराने प्रत्यक्ष चळवळीला अनुकुल असणारे कार्यकर्ते होते. गोविंददास श्रॉफ यांच्यासारखे जहाल विचारांचे तरूणही तेथे होते. परस्परांच्या ओळखी होत होत्या व संघटना बांधणीला सुरुवात झाली होती.

पुढच्या वर्षी म्हणजे जून १९३८ मध्ये लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन भरले. अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण व ठरावातील नागरिक स्वातंत्र्यावरील बंधनाच्या उल्लेखाला जिल्हाधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला. सरकारच्या निषेधार्थ अधिवेशन स्थगित करण्यात आले; पण त्यापूर्वी नागरिक स्वातंत्र्याच्या प्रश्नासाठी एक समिती नेमण्यात आली. या तीन जणांच्या समितीत काशीनाथराव वैद्य, दिगंबरराव बिंदू हे दोघे सदस्य होते. समितीचे संयोजक

होते स्वामी रामानंद तीर्थ. हिप्परग्याची शाळा १९३५ मध्ये सोडून त्यांनी मोमीनाबाद (सध्याचे अंबाजोगाई) अंबाजोगाई येथे योगेश्वरी नूतन विद्यालयाची स्थापना केली होती. शिक्षणाचे मर्यादित क्षेत्र सोडून प्रत्यक्ष राजकारणात यावे व संस्थानातील चळवळीचे नेतृत्व करावे अशी विनंती त्यांच्या मित्रांनी त्यांना केली होती. शाळेच्या संचालक पदाचा त्यांनी राजीनामा दिला व मोमीनाबादेहून हैदराबादेस स्थलांतर केले. हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना करावयाची, नागरिक स्वातंत्र्याची मागणी करणारी चळवळ करावयाची व जेथे बंदी करण्यात येईल तेथे कायदेभंग करावयाचा असे कार्यकर्त्यांनी ठरविले होते.

◆ ◆ ◆

७
लढ्याचे पहिले पर्व

काशीनाथराव वैद्य यांच्या घरी २९ जून १९३८ रोजी झालेल्या एका बैठकीत हैदराबाद स्टेट कॉँग्रेसची स्थापना करावयाची व सभासद नोंदणी सुरु करावयाची, असा निर्णय घेण्यात आला. मात्र बहुतांशी मवाळ मंडळीच या बैठकीस हजर होती. स्वामी रामानंद तीर्थ, आ. कृ. वाघमारे, दिगंबरराव बिंदू अशा मराठवाड्यातील कोणत्याही नेत्यास या बैठकीचे निमंत्रणही नव्हते. सभासद नोंदणी चालू होती तेथे स्वामीजी व बिंदू नंतर स्वतःच जाऊन सभासद झाले. ऑगस्ट महिन्यात स्टेट कॉँग्रेसच्या अस्थायी समितीने एक पत्रक प्रसिद्ध करुन निजामाच्या छायाछत्राखाली जबाबदार राज्य पद्धती स्थापन करणे, हे आपले ध्येय आहे, आपली संघटना धर्मातीत असेल व शांतता पूर्ण मार्गाने आपले कार्य करील, असे जाहीर केले. ९ सप्टेंबर रोजी नोंदलेल्या सभासदांची सर्वसाधारण सभा पदाधिकारी व कार्यकारिणीची निवड करण्यासाठी भरणार होती; परंतु सात तारखेलाच सरकारने हैदराबाद स्टेट कॉँग्रेसवर बंदी घालणारा हुकूम तिच्या जन्मापूर्वीच काढला. त्यामुळे सत्याग्रहाशिवाय पर्याय राहिला नाही. अगोदर पुढाकार घेण्यास उत्सुक असलेली मवाळ मंडळी सत्याग्रहात भाग घेण्यास उत्सुक नव्हती. अनेकांकडे खेटे घालून त्यांचा नकार मिळाल्यानंतर गोविंदराव नानल या जेष्ठ वकिलांनी बंदी घातलेल्या संघटनेचे अध्यक्षपद स्वीकारण्याचे कबूल केले. स्वामीजी व त्यांचे सहकारी सत्याग्रह आंदोलन संघटीत करणार होते. सत्याग्रहासाठी २४ ऑक्टोबरचा मुहूर्त ठरला.

'हिंदू सिव्हील लिबर्टीज युनियन' या नावाने संघटीत झालेल्या हिंदू सभेच्या कार्यकर्त्यांनी स्टेट कॉँग्रेसच्या सत्याग्रहाच्या पूर्वी तीन दिवस म्हणजे २१ ऑक्टोबरलाच धार्मिक व नागरी स्वातंत्र्याच्या मागणीसाठी सत्याग्रह सुरु केला. त्यानंतर जानेवारी १९३९ मध्ये हिंदू महासभा अधिकृतपणे या आंदोलनात उतरली. हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचा सत्याग्रह ज्या दिवशी सुरु झाला त्या दिवशी आर्य समाजानेही आपले सत्याग्रह आंदोलन सुरु केले. व देशभरातून आलेले सत्याग्रही निजामाच्या राजवटीतील धार्मिक अन्यायाच्या विरोधात देशाचे लक्ष वेधू लागले. स्टेट कॉँग्रेसच्या सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीत नानल, रामकृष्ण धूत, जनार्दनराव देसाई, श्रीनिवासराव बोरीकर व नंतर तेलंगण लढ्याचे कम्युनिस्ट नेते म्हणून प्रसिद्ध झालेले रवि नारायण रेड्डी यांचा समावेश होता. त्यानंतर तीनच दिवसांनी म्हणजे २७ ऑक्टोबरला स्वामीजींनी स्वतः सत्याग्रह केला. हिंदूसभा व आर्य समाज यांच्यावतीने होणारे सत्याग्रह मुख्यतः धार्मिक जुलूम व नागरी हक्कावरील बंधने यांच्या विरोधात होते. मात्र स्टेट कॉँग्रेसच्या सत्याग्रहाचे उद्दीष्ट नागरीक हक्काबरोबरच जबाबदार राज्य पद्धतीची स्थापना हे होते. पर्यायाने

तो निजामाच्या एकतंत्री राजवटी विरुद्ध लोकशाही प्रस्थापनेसाठीचा लढा होता. स्टेट काँग्रेस आपला लढा धर्मातीत राखू इच्छित होती. स्टेट काँग्रेसच्या जन्मापूर्वीच घातलेल्या बंदीत सरकारने दिलेले कारण, ती जातीय आहे असे होते. सर अकबर हैदरींच्या मंत्रिमंडळाने स्टेट काँग्रेसच्या चळवळीला याच खोट्या कारणावरुन धोपटण्याचे ठरविले होते. गांधीजींनी या साऱ्या प्रश्नांचा सम्यक विचार केला आणि स्टेट काँग्रेसला आपले आंदोलन सध्या स्थगित करण्याचा सल्ला दिला. त्याच्या पूर्वीपासून गांधीजी हैदरींशी बंदी उठविण्याबाबत पत्रव्यवहार करीतच होते. २३ डिसेंबरला काशीनाथराव वैद्यांनी आपल्या सत्याग्रहाच्या वेळी स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीचा सत्याग्रह परत घेत असल्याचा निर्णय जाहीर केला, मात्र त्यांच्या तुकडीला सभाबंदीचे नियम मोडल्याबद्दल शिक्षा झालीच. एप्रिल १९३९ पर्यंत गांधीजींच्या मध्यस्थीने सर्व सत्याग्रहींना सरकारने सोडले. आर्य समाजाच्या मागण्यांबद्दलही तडजोड झाली. धार्मिक स्वातंत्र्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आर्य समाज व हिंदू सभेचे आंदोलनही स्थगित झाले. स्टेट काँग्रसचे आंदोलन धर्मातीत असावे व धर्माच्या पायावर उभ्या राहिलेल्या शक्तींशी त्याची सरमिसळ होऊ नये असे गांधीजींना वाटत होते. स्टेट काँग्रेसमधील तरूण कार्यकर्त्यांना सुरवातीला हा सल्ला पटला नाही; परंतु सर्वच कार्यकर्त्यांनी तो मानला.

सत्याग्रह आंदोलन चालू असतानाच निजामी सत्तेविरुद्धची चिड वाढविणारी आणखी एक घटना घडली. उस्मानिया विद्यापीठाच्या हैदराबादेतील वसतीगृहात हिंदू व मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी प्रार्थनागृहे म्हणून दोन खोल्या राखून ठेवल्या होत्या मुस्लिम विद्यार्थी नमाज पढत. हिंदू मुलांनी आपल्या खोलीत 'वंदे मातरम्' म्हणण्यास प्रारंभ केला होता. हीच बातमी त्याच विद्यापीठाशी सलग्न असलेल्या औरंगाबादच्या महाविद्यालयात समजली आणि तेथेही वसतीगृहात 'वंदे मातरम्' म्हणण्यास प्रारंभ झाला. औरंगाबादचे प्राचार्य मोहियुद्दीन यांनी 'वंदे मातरम्' म्हणण्यास बंदी केली. याच काळात जीनांनी 'वंदे मातरम्' सार्वजनिक ठिकाणी म्हणू नये अशी मागणी केली होती. औरंगाबादच्या पाठोपाठ हैदराबाद येथेही बंदी घालण्यात आली. तडजोडीचे सर्व प्रयत्न विफल झाले, व विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेजातून काढून टाकण्यात आले. शेकडो विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी संस्थानाबाहेर गेले. उस्मानिया विद्यापीठाचा विरोध आतानाही नागपूर विद्यापीठाने या मुलांना आपल्या महाविद्यालयात प्रवेश दिला. शाळेतील मुले येवला वगैरे जवळच्या विद्यालयात गेली. मात्र परत माफी मागितल्याशिवाय उस्मानियात प्रवेश दिला जाणार नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे काहींनी आपले महाविद्यालयीन शिक्षणच सोडून दिले. मात्र या आंदोलनामुळे संस्थानातील तरूणांमध्ये जागृती झाली.

देशातील युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेता मोठे जन आंदोलन सुरु करणे हितावह ठरणार नाही. मात्र लोकांची स्वातंत्र्याकांक्षा जिवंत ठेवण्यासाठी निवडक लोकांना व्यक्तिगत

सत्याग्रह करण्याची परवानगी द्यावी, असे गांधीजींनी ठरविले होते. देशपातळीवर पहिले व्यक्तिगत सत्याग्रही म्हणून विनोबा भाव्यांची, तर दुसरे सत्याग्रही म्हणून जवाहरलाल नेहरुंची त्यांनी निवड केली होती. त्याच प्रकारे हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या वतीने सत्याग्रह करण्यासाठी अहिंसेवरील निष्ठा व इतर कसोट्यांच्या आधारावर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ, अच्युतभाई देशपांडे, हिरालाल कोटेचा, मोतीलाल मंत्री व देवरामभाई चौहान या पाच सत्याग्रहींना व्यक्तिगत सत्याग्रहाची परवानगी दिली. कोणत्याही मोठ्या आंदोलनाचे दडपण सरकारवर नसल्यामुळे दीर्घकाळ तुरुंगात रहावे लागेल, याची स्पष्ट कल्पना गांधीजींनी सत्याग्रहींना दिली होती. कायदेभंग करण्याचा आपला इरादा निजामाला एक पत्र पाठवून जाहीर करताच स्वामीजींना ११ सप्टेंबर १९४० रोजी अटक झाली. १६ डिसेंबर १९४१ रोजी पंधरा महिन्यांच्या तुरुंगवासानंतर या सर्व सत्याग्रहींची सुटका झाली.

स्टेट कॉंग्रेसवर बंदी असल्यामुळे तिचे कार्यकर्ते पुन्हा महाराष्ट्र परिषद, आंध्र महासभा व कर्नाटक परिषद अशा प्रादेशिक परिषदांमार्फत काम करु लागले. नांदेड जिल्ह्यातील उमरी येथे महाराष्ट्र परिषदेचे तिसरे अधिवेशन काशीनाथराव वैद्यांच्या अध्यक्षतेखाली झाले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गोवालिया टँक मैदानावर भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनास स्वामीजी व संस्थानातील अनेक कॉंग्रेस कार्यकर्ते हजर होते. अधिवेशनावरुन परतताच स्वामीजींना अटक झाली. संस्थानात सत्याग्रह सुरु झाला. अनेक कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. मोडतोडीच्याही काही घटना घडल्या. स्वामीजींनी स्थापिलेल्या मोमीनाबादच्या योगेश्वरी विद्यालयातील शिक्षक बाबासाहेब परांजपे व चिटणीस नारायणराव जोशी यांना अटक झाली. तर अनेक शिक्षकांना संस्थानातील कोणत्याही शिक्षण संस्थेत काम करु देऊ नये असा आदेश निघाला. गोविंदभाई श्रॉफ, आ. कृ. वाघमारे, स. कृ. वैशंपायन, व्ही. डी. देशपांडे, रतिलाल जरीवाला, डी. एल. पाठक आदिंना कम्युनिस्ट असल्याच्या संशयावरुन स्थानबद्ध करण्यात आले होते. बावीस महिन्यांच्या कारावासानंतर त्यांना २४ ऑक्टोबर १९४२ रोजी सोडण्यात आले. स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवण्याबाबत बराच पत्रव्यवहार काशीनाथराव वैद्य वगैरे नेते व सरकारचे प्रतिनिधी यांच्यात झाला. परंतु त्यातन काही निष्पन्न झाले नाही. 'कॉंग्रेस' या शब्दाचा नावातील वापर संस्थानबाहेरील संघटनेशी असलेल्या संबंधाचा निर्देशक आहे, म्हणून तो वगळा हा सरकारी सल्ला मान्य करुनही सरकारने नव्या संघटनेस मान्यता देण्याचे टाळले.

◆ ◆ ◆

८

गांधीजींचे मार्गदर्शन

भारतातील संस्थानांमध्ये नागरिक स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्यांना काँग्रेसची सहानुभूती असली, तरी अ. भा. काँग्रेसने या लढ्यात प्रत्यक्ष भाग घेऊ नये, हेच प्रारंभी काँग्रेसचे धोरण होते. २० जून १९३४ रोजी संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी महात्मा गांधींना पुण्यात भेटले, तेव्हा "संस्थानी प्रश्नात ढवळाढवळ न करण्याचे काँग्रेसचे धोरणच योग्य व शहाणपणाचे आहे. खालसा भागाला संस्थानासंबंधी धोरण ठरविण्याचा अधिकार नाही. काँग्रेसने संस्थानात ढवळाढवळ करण्यचा प्रयत्न केला, तर संस्थांनी प्रजेच्या हितसंबंधास बाधा येईल, अशी माझी खात्री आहे," असे गांधीजींनी सांगितले होते. पुढच्या काळात हे अलिप्ततेचे धोरण बदलत गेले. संस्थानांसकट सर्व हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य, हे काँग्रेसचे ध्येय असल्याचे १९३७ मध्ये अ. भा. काँग्रेस कमिटीच्या कलकत्ता येथील बैठकीत जाहीर करण्यात आले. संस्थानी प्रजेच्या चळवळीत तेथील काँग्रेसजन भाग घेऊ शकतील, मात्र अ. भा. काँग्रेस संघटनेतर्फे नव्हे, तर स्वतंत्र संघटना स्थापन करुन, असे १९३८ मध्ये हरिपुरा काँग्रेसमध्ये ठरले. १९३८ पासून महात्मा गांधींनी हैदराबादमधील प्रजेच्या लढ्याच्या मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारली.

नऊ सप्टेंबर १९३८ रोजी हैदराबाद स्टेट काँग्रेस ही हैदराबाद संस्थानातील जनतेची संघटना स्थापन होणार होती. तिच्यावर तिच्या जन्मापूर्वीच हैदराबाद सरकारने बंदी घातली. या बंदीबाबत पंतप्रधान सर अकबर हैदरींशी जमनालाल बजाजांनी पत्रव्यवहार केला, परंतु बंदी उठविण्यास हैदरींनी नकार दिला. स्टेट काँग्रेसने बंदी मोडून सत्याग्रहाला प्रारंभ केला. याच सुमारास सरकारी महाविद्यालयांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना 'वंदे मातरम' गीत गाण्यास बंदी घालण्यात आली होती. त्याविरुद्ध विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु झाले. स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाच्या आगेमागे हिंदू सिव्हिल लिबर्टीज युनियन (हिंदू सभा) व आर्यसमाज यांनी नागरिक स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह सुरु केले होते. हैदराबाद स्टेट काँग्रेसवर बंदी घालण्यासाठी सरकारने दिलेल्या कारणांत स्टेट काँग्रेस जातीय आहे, असा एक आरोप होता. या परिस्थितीत धार्मिक स्वातंत्र्यावर जोर देणाऱ्या संघटनांचे आंदोलन व स्टेट काँग्रेसचे आंदोलन यांची सरमिसळ होऊ नये, अशी भूमिका घेऊन स्टेट काँग्रेसला आपले आंदोलन परत घेण्याचा गांधीजींनी सल्ला दिला. स्टेट काँग्रेसने हा सल्ला थोड्या अनिच्छेनेच मान्य केला. गांधीजींचा हा सल्ला न पटलेले गोविंदभाई श्रॉफ यांच्यासारखे कार्यकर्ते कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांना भेटले, तेव्हा डांगे यांनी 'गांधींचा सल्ला मानणे हेच अंतिमतः हिताचे आहे', असे

सांगितले. २१ फेब्रुवारी १९३९ रोजी हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचे गोविंदराव नानल वगैरे नेते गांधीजींना भेटले, तेव्हा 'स्थगिती व माधार सशस्त्र युद्धातसुद्धा घ्याव्या लागतात', असे सांगून खादी व विधायक कार्यास वाहून घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. त्याच दिवशी रात्री वर्ध्यातच झालेल्या बैठकीत स्टेट कॉँग्रेसने खादी विक्री, सूतकताई, हरिजनांना सामाजिक सोयी उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांची गाऱ्हाणी सनदशीर मार्गांनी मांडणे व मुस्लिमसंपर्क हा आपला कार्यक्रम ठरविला. सत्याग्रह परत घेतल्यानंतर सत्याग्रहींची ताबडतोब सुटका झाली नाही. त्याबाबत गांधीजींनी पंतप्रधान हैदरींशी पत्रव्यवहार केल्यावर एप्रिल १९३९ मध्ये सर्वांची सुटका झाली. बंदी उठविण्यासाठी सरकार बरोबर बोलणी करू इच्छिणाऱ्या काशीनाथराव वैद्य यांनी २५ एप्रिल १९३९ रोजी गांधीजींची मुंबईत जुहू येथे भेट घेतली व 'जबाबदार राज्यपद्धती व कॉँग्रेस' या शब्दांना हैदराबाद सरकार आक्षेप घेत असेल, तर संस्थेच्या नावातील 'कॉँग्रेस' शब्द वगळण्यास व उद्दिष्टात जबाबदार राज्यपद्धती या शब्दप्रयोगाऐवजी संस्थानिकांच्या छत्राखाली लोकांना जास्तीत जास्त सत्ता, असा शब्दप्रयोग करण्यास आपली हरकत नसल्याचे सांगितले. मात्र सरकारबरोबरच्या वैद्यांच्या पत्रव्यवहारातून काहीच निष्पन्न झाले नाही.

मजलीसे इत्तेहादुल मुस्लमीनच्या अधिवेशनात झालेल्या प्रक्षोभक भाषणानंतर २३ मार्च १९४० रोजी बीदर शहरात एक संपूर्ण बाजारपेठ जाळून टाकण्यात आली. लुटालूटही करण्यात आली. पोलिस व सरकारी अधिकाऱ्यांनी कोणताही हस्तक्षेप केला नाही. या घटनेनंतर बीदरला भेट देऊन स्वामी रामानंद तीर्थ गांधीजींना भेटले. गांधीजींनी हैदरींना पत्र लिहून या घटनेची चौकशी करण्याची मागणी केली. बीदरच्या घटनेबद्दल गांधीजी मौन का पाळून आहेत, असा प्रश्न एकाने विचारल्यावर ४ मे १९४० रोजी गांधीजींनी 'हरिजन' मध्ये लिहिले की, 'मी एखाद्या गोष्टीविषयी जाहीरपणे काही बोललो नाही म्हणजे मी त्याकडे दुर्लक्ष केले आहे, असा अर्थ होत नाही.' गांधीजींनी यापूर्वीच हैदरींना पत्र पाठविले होते. एक जून रोजी पुन्हा गांधीजींनी चौकशी समिती नेमण्याची मागणी जाहीरपणे केली.

संघटनेचे नाव बदलण्याची तयारी दर्शवूनही स्टेट कॉँग्रेसवरील बंदी उठली नाही, तेव्हा ऑगस्ट १९४० मध्ये स्वामी रामानंद तीर्थ व इतर नेते वर्ध्याला गांधीजींना भेटले. ''आता सत्याग्रहाशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही, मात्र या वेळचा सत्याग्रह वेगळा असेल. तुमच्यापैकी ज्यांची अत्युच्च त्यागाची तयारी असेल त्यांनाच यात भाग घेता येईल. सामुदायिक चळवळ होणार नाही. दीर्घकाळ तुरुंगात रहावे लागेल. मी मध्यस्थी करणार नाही. जनसंपर्क पूर्णपणे तुटलेला असताना एकाकी अवस्थेतही ज्यांची अहिंसेवरील श्रद्धा कायम राहील असे सत्याग्रही लागतील''. असे गांधीजींनी सांगितले. या काळात देशात

व्यक्तिगत सत्याग्रहाचे आंदोलन सुरु करण्याचा विचार गांधीजी करीत होते. सामुदायिक सत्याग्रहापेक्षा तो गुणात्मक दृष्ट्याही वेगळा असणार होता. सरकार समोर अडचण उभी करणे हा त्याचा उद्देश असणार नव्हता. श्रेष्ठ स्वरुपाच्या आत्मक्लेशाने आपल्या मागण्यांची समर्थनीयता इतरांना पटू शकते, या आत्मविश्वासाचा आधार या सत्याग्रहाला होता. जीवननिष्ठा म्हणून अहिंसा कितपत स्वीकारली आहे याची खात्री करुन स्वामी रामानंद तीर्थ व इतर चार सत्याग्रहींनाच हैदराबाद संस्थानात व्यक्तिगत सत्याग्रह करण्याची परवानगी गांधीजींनी दिली. व्यक्तिगत सत्याग्रहात विनोबांना पहिले सत्याग्रही मानण्यात येते. नोव्हेंबर १९४० मध्ये त्यांनी सत्याग्रह केला. सप्टेंबर १९४० मध्येच हैदराबाद मध्ये स्वामीजींना व औरंगाबादमध्ये इतर चौघांना पंतप्रधान हैदरींना पत्र पाठवल्यावर अटक झाली. गांधीजींनी या नव्या सत्याग्रहाचा पहिला प्रयोग हैदराबादेत केला होता.

पंधरा महिन्यांच्या तुरुंगवासानंतर व्यक्तिगत सत्याग्रही सुटले. स्वामीजी त्यानंतर पुन्हा सत्याग्रहाची परवानगी मागावयास गेले असता गांधीजींनी थोडा काळ थांबण्याचा सल्ला दिला. गांधीजी एका देशव्यापी निकराच्या लढ्याचा विचार करीत होते. त्यांनी स्वामीजींना अ. भा. काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनास येण्यास सांगितले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी गोवालिया टँकवरील अधिवेशनात 'चले जाव' चा आदेश ब्रिटिशांना देणारा ऐतिहासिक ठराव मंजूर झाला. हैदराबादेत मोठी चळवळ उभी राहील काय, या बद्दल स्वामीजींना शंका होती. परंतु अगदी एक सत्याग्रही मिळाला तरी चालेल, असे गांधीजींनी सांगितले होते. स्वामीजींनी मुंबई अधिवेशनाचा संदेश सांगणारी पत्रके छापून घेतली व ती संस्थानात वितरीत झाली. अनेक प्रमुख कार्यकर्त्यांना अटक झाली. मोडतोडीच्या काही घटना संस्थानातही झाल्या.

बेचाळीसच्या लढ्यात कम्युनिस्टांनी भाग घेतला नव्हता. रशियावर जर्मनीने हल्ला केल्यानंतर त्यांच्या दृष्टीने महायुद्ध लोकयुद्ध झाले होते व त्यांनी ब्रिटिश सरकारला सहकार्य करणे सुरु केले. बहुसंख्य कम्युनिस्ट तेव्हा काँग्रेसपक्षात राहूनच काम करीत. १९४५ मध्ये राष्ट्रीय नेते तुरुंगातून बाहेर आले. व त्यानंतर नेहरु, वल्लभभाई व गोविंदवल्लभ पंत यांची एक समिती १९४२ च्या चळवळीत भाग न घेता तिला विरोध करण्याबद्दल कम्युनिस्टांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी नेमण्यात आली. गांधीजींचे मत केवळ कम्युनिस्ट असल्याबद्दल कारवाई करण्याऐवजी प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाची चौकशी करुन त्याने जर काँग्रेसच्या आदेशाचा भंग केल्याचे दिसले, तर त्याच्या विरुद्ध कारवाई करावी असे होते. हैदराबादेतील स्वामीजी गटाच्या कार्यकर्त्यांचे मत गांधीजींप्रमाणेच होते, मात्र संस्थानी प्रजा परिषदेने सर्व कम्युनिस्टांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला. तो पुढे हैदराबादेतही अंमलात आला.

भारत स्वतंत्र होत असताना संघराज्यात सामील होण्याऐवजी निजामाने आपण स्वतंत्र राहणार अशी घोषणा केली. हैदराबादेत आणखी एक लढा देण्याची गरज निर्माण झाली. भारतीय स्वातंत्र्याच्या युद्धातील शेवटची लढाई हैदराबादच्या भूमिवर लढली जाईल, अशी भविष्यवाणी गांधीजींनी स्वामीजींजवळ केली होती. हा शेवटचा लढा परिस्थितीनुसार व जरुर तेथे शस्त्र हातात घेऊन लढावा लागेल असे हैदराबादच्या कार्यकर्त्यांनी सांगताच लढा पूर्णपणे अहिंसकच असला पाहिजे हा आपला आग्रह असल्याचे गांधीजीने सांगितले होते. मात्र निःशस्त्र गावकऱ्यांवर पोलिस व रझाकार करीत असलेल्या अत्याचाराचा लोकांनी सशस्त्र प्रतिकार केला, हे स्वामीजींनी जेव्हा सांगितले तेव्हा 'बरे झाले, लोक भ्याडाप्रमाणे पळून गेले नाहीत' असे गांधीजींने उद्‌गारले होते.

जानेवारी १९४८ मध्ये गोविंदभाई श्रॉफ व स. कृ. वैशंपायन वगैरे गांधीजींना भेटावयास नव्या दिल्लीत बिर्ला हाऊसमध्ये गेले. तेव्हा गांधीजी दिल्ली व आसपासच्या भागात होणाऱ्या हिंसेने विलक्षण व्यतीत झालेले दिसले. एकशे पंचवीस वर्षे जगण्याची इच्छा असलेले व गंभीर प्रश्नांना तोंड देतानाही आत्मविश्वास न गमावणारे गांधीजी या भेटीत हताश, अगतिक वाटत होते.मनुष्यातील पशुत्वाच्या या उद्रेकाने व्यथित झालेल्या गांधीजींचे आयुष्य अवघ्या तीन चार दिवसांनंतर त्यांच्या हत्येने संपुष्टात आले. हैदराबाद जेव्हा मुक्त झाले तेव्हा गांधीजी हयात नव्हते. मात्र काश्मिर किंवा हैदराबाद हे प्रश्न सैन्यानेच सोडवावे लागतील ही वस्तुस्थिती गांधीजींनी स्विकारलेली होती.

◆ ◆ ◆

९

स्वातंत्र्य लढ्याची प्रशिक्षण केंद्रे

हैदराबादच्या स्वातंत्र्य लढ्यात दोन शाळांना अनन्य साधारण महत्व आहे. या लढ्यातले अनेक सेनानी आणि सैनिक या शाळात एकतर शिक्षक होते किंवा विद्यार्थी होते. शाळा होत्या तशा नेहमीचे इंग्रजी, मराठी,गणित,इतिहास असे विषय शिकविणाऱ्याच; परंतु त्याच्या जोडीला जे देशप्रेमाचे धडे इथे गिरवले जात, त्यांनी या शाळांना स्फोटक दारूगोळ्याचे कोठार बनविले होते.

उस्मानाबाद जिल्ह्यातल्या तुळजापुर तालुक्यात हिप्परगा नावाचे एक खेडे आहे. पाच सातशे लोक वस्तीच्या या गावात व्यंकटराव देशमुख व अनंतराव कुलकर्णी या भावांनी १९२१ च्या गणेश चतुर्थीला एका खाजगी शाळेचा प्रारंभ केला. थोरले भाऊ व्यंकटराव तळेगावचे समर्थ विद्यालय पाहून आले होते. तशी शाळा हैदराबाद संस्थानात आपल्या गावी असावी असे त्यांना वाटत होते. धाकटे अनंतराव (दत्तक गेल्यामुळे कुलकर्णी झालेले) असहकारितेच्या चळवळीत पुण्यातले महाविद्यालयीन शिक्षण सोडून आले होते. त्यांनी शाळेची व्यवस्था पाहायची आणि व्यंकटरावांनी जनसंपर्क व आर्थिक बाजू सांभाळायची अशी कामाची वाटणी होती. व्यंकटरावांनी अक्षरश: आपली सगळीच मालमत्ता शाळेच्या कामाला दिली होती.

हिप्परगा गावालगत दोन एकराच्या प्रशस्त जागेत ऐंशी खणांची एक चौसोपी परंतु साधी इमारत बांधण्यात आली. या इमारतीत दिवसा शाळा व रात्री मुलांचे वसतीगृह असे. भिंती आणि जमीन दर रविवारी शिक्षक आणि विद्यार्थी शेणाने सारवीत. गावात एका वाड्यात असलेल्या शाळेच्या भोजनगृहात ते ताटवाटी घेऊन जात व जेवून परत येत. शिक्षकांपैकी काही शाळेच्या आवारातच असलेल्या झोपड्यात राहत. गुरूकुलासारखे वातावरण होते.

शिक्षक सुद्धा असाधारण लाभले होते. पुढे 'लोकसत्तेचे' संपादक व रॉयवादी विचारवंत म्हणून महाराष्ट्राला ज्ञात झालेले ह. रा. महाजनी या शाळेत शिक्षक होते. तेव्हा त्यांचा वेश कमरेला लुंगी,वर उत्तरीय म्हणून एक उपरणे व डोक्याला संजाब असा होता. हिप्परगा सोडल्या नंतरच्या काळात त्यांचे वैचारिक व बाह्य दोन्ही परिवर्तन घडून आले. स्वामी रामानंद तीर्थ या नावाने पुढे प्रसिद्ध झालेले हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेते येथे आले, तेव्हा व्यंकटेश भवानराव खेडगीकर होते. येथेच त्यांनी संन्यास घेतला व ते रामानंद तीर्थ झाले.रामचंद्र गोविंद उर्फ बाबासाहेब परांजपे इंग्रजी व्याकरण व विज्ञान शिकवत. पुण्याच्या

फर्गसनमधुन बी.एस्सी. झाल्याबरोबर या शाळेत आलेल्या या तरूण शिक्षकाने आपल्या वत्कृत्वाने हजारो विझलेली मने पेटवली. के. के. देशपांडे हे एकेकाळचे रॉयवादी. परदेश पर्यटन करून आलेले. शाळेच्या नियमातून सूट देऊन त्यांना सतत धुम्रपान करण्याची परवानगी देण्यात आली होती. ग. धों. देशपांडे हा एक अफाट वाचन असलेला केवळ ज्ञानावर निष्ठा असल्याने कुणाचाही मुलाहीजा न बाळगणारा शिक्षक होता. कोंडो रामचंद्र उर्फ बाबुराव कानडे हे फारसी -उर्दूचे जाणकार. कोणतेही प्रशिक्षण झालेले नसताना त्यांनी पुढील काळात मराठवाड्यात औसा येथे देशातल्या सर्वोत्तम खादी उत्पत्ती केंद्रापैकी एक उभारले. श्री.रं. देशपांडे उर्फ एस. आर. गुरूजी हे काही दिवस केरळ राज्यातल्या कन्हनगड जवळ स्वामी रामदास यांच्या आनंदाश्रमात होते. आश्रमाचे ते आजीव सेवक झाले होते व आश्रमाच्या 'प्रेमसुधा' या नियतकालिकाचे संपादनही ते करीत. हे स्वामी रामदास मूळ मराठी !

हैदराबाद संस्थानातील एका पिढीची अनेक कर्तृत्ववान माणसे या शाळेत शिकली. हैदराबाद संस्थानातून हद्दपार होऊन मुंबईत जावे लागलेल्या 'माझे रामायण' या कादंबरीचे कर्ते दत्तो अप्पाजी तुळजापुरकर यांनी आपल्या दोन मुलांना या शाळेत शिक्षणासाठी ठेवले होते. त्यापैकी एक विद्यारण्य तुळजापुरकर पुढे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले. पहाटे साडेचार वाजता सर्वांना उठावे लागे. प्रातर्विधी आटोपून प्रार्थना व नंतर व्यायाम होई. विहिरीवर अंघोळ करून आल्यावर न्याहारी व नंतर शाळा. सायंकाळी क्रीडांगणावर खेळ, नंतर भोजन व सामुदायिक प्रार्थना असा दिनक्रम असे. महत्वाचा उपक्रम म्हणजे पंधरा मिनिटांचा जादा तास. या वेळात देशभक्तांच्या व स्वातंत्र्यासाठी लढलेल्या ऐतिहासिक महापुरूषांच्या कथा सांगितल्या जात. अनेकांची मने या पंधरा मिनिटांच्या तासांनी घडविली. शाळेत ध्वजवंदन होई. काँग्रेसचा तिरंगा ध्वज फडकवला जाई. शाळेचा वार्षिक समारंभ असला म्हणजे संस्थानातील ठिकठिकाणचे कार्यकर्ते आवर्जून येत. शाळेवर देखरेख ठेवण्यासाठी शाळेच्या जवळच एक पोलिस चौकी निजामी पोलीसांनी उभारली होती. त्यात शाळेला भेट देणाऱ्यांची नोंद होई. लोकांत भीती निर्माण करण्याचा हा प्रयत्न असे.

१९२९ ते १९३५ पर्यंत मुख्याध्यापक स्वामी रामानंद तीर्थ व त्यांचे सहकारी या शाळेत होते. नंतर ते अंबाजोगाईला गेले. पुढे काही वर्षे हिप्परग्याची शाळा चालली. अनेक थोरामोठ्यांनी तिला भेटी दिल्या. वि. स. खांडेकरांनी 'माळरानावरली बाग ' या शीर्षकाने १९४३ मध्ये लिहिलेल्या एका परिचय लेखामुळे ही शाळा महाराष्ट्रात ज्ञात झाली. परंतु शाळेचे ऐतिहासिक कार्य १९३५ लाच संपले होते.

हैदराबाद संस्थानात नवी खाजगी शाळा सुरू करण्यास बंदी करणारा हुकूम १९२६ पासून अमलात आला. हिप्परगा सोडल्यावर नवी शाळा काढायची होती. नव्या शाळेला

परवानगी तर मिळणारच नव्हती. शेवटी एक मार्ग शोधण्यात आला. अंबाजोगाईला (तेव्हा त्या गावचे नामांतर मोमीनाबाद असे झालेले होते.) योगेश्वरी विद्यालय या नावाची एक शाळा सरकार दरबारी १९१८ मध्ये नोंदवली व कागदोपत्री अस्तित्व असलेली होती. त्या शाळेचे पुनरूज्जीवन करून तिलाच हायस्कूलचे वर्ग जोडण्याचे ठरले. स्वामीजी, बाबासाहेब परांजपे, अंबाजोगाईतले एक वकील व शाळेचे चिटणीस नारायणराव जोशी घरोघर फिरले. पालकांनी आपली मुले पाठविण्याचे कबूल केले. ५ मे १९३५ रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी शाळेचा शुभारंभ करण्यात आला. हिप्परग्यातील स्वामीजींचे बहुतेक शिक्षक सहकारी अंबाजोगाईला आले होते. पहिल्याच वर्षी दोनशे पंच्याहत्तर मुलांनी शाळेत प्रवेश घेतला. सरकारने नव्या वर्गांना परवानगी देताना बराच त्रास दिला. परंतु शेवटी दोन वर्षांनी हायस्कूलचे वर्गही सरकारमान्य झाले.

शाळेला जोडून असलेल्या एका वसतीगृहात मुलांची राहण्या जेवण्याची सोय महिना दहा रूपयात होई. तेवढी ऐपत नसलेल्या मुलांसाठी दरमहा सहा रूपये घेऊन सोय करणारे आणखी एक वसतीगृह सुरू झाले. शाळेच्या वसतीगृहात स्वयंपाक करणारे नाटेकर रात्री अंबाजोगाईच्या दलीत वस्तीत रात्र शाळेत शिकवत. शाळेत आणि वसतीगृहात समतेचे संस्कार केले जात होते. १९३८ च्या जून मध्ये स्वामी रामानंद तीर्थांनी शिक्षणाचे मर्यादित क्षेत्र सोडून पूर्ण वेळ राजकारणाला द्यावा असे ठरले, तेव्हा इतरांनी शाळा सांभाळली. मात्र ती शाळेचा उद्देश व परंपरा कायम ठेवून सांभाळली. त्यामुळे १९४२ च्या चळवळीच्या वेळी बाबासाहेब परांजपे व चिटणीस नारायणराव जोशी दोघांनाही तुरुंगात पाठविण्यात आले. गांधी जयंती साजरी करणे चले जावची घोषणा करणारी पत्रके गावात लावणे वगैरे प्रकारांच्या मागे या शाळेतील शिक्षक आहेत व मराठवाड्यात होत असलेल्या सत्याग्रहाला त्यांची चिथावणी आहे अशी सरकारची माहिती होती. त्यामुळे या शाळेतील अकरा शिक्षक व दोन विद्यार्थी यांच्यावर नोटीसा बजावण्यात आल्या. संस्थने त्या सर्वांना काढून टाकावे असे सांगण्यात आले. जे बीड जिल्ह्याचे मूळ रहिवासी नव्हते त्यांनी जिल्ह्यात प्रवेश करू नये असा व या सर्वांना कोणत्याही शिक्षण संस्थेत कामावर घेवू नये असा आदेश सरकारने काढला. ग. धों. देशपांडे, एकनाथराव कुलकर्णी, बाबूराव कानडे, सदाशिवराव किंबहुने, श्रीनिवास अहंकारी, लाला बिंदाप्रसाद वगैरे बरोबरच ज्यांच्या विरूद्ध उपाय योजना झाली त्या शिक्षकात पुढे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती झालेल्या व्यंकटराव देशपांडे यांचाही समावेश होता. तेही येथे शिक्षक होते.

स्वातंत्र्याच्या चळवळीत सैनिक आणि सेनानी पुरवण्याबरोबरच हिप्परगा व अंबाजोगाईच्या या दोन शाळांनी आणखी एक महत्वाचे काम केले. आजूबाजूच्या ग्रामीण

भागातील मुलांच्या पालकांना भेटून त्यांना मुलांना शिकविण्यास प्रवृत्त केले. काही दलित मुलांनाही त्यामुळे शिकता आले. पुढे मराठवाड्यातील राजकारणात आलेले अनेक तरुण या शाळांत शिकले होते. औरंगाबादचे सरस्वती भुवन, गुलबर्ग्याचे नूतन विद्यालय, सेलूचे नूतन विद्यालय, हैदराबादची विवेकवर्धिनी अशा आणखी काही शाळांनीही याच प्रकारचे काम करण्यास आपल्या परीने हातभार लावला; पण आणखी एका शाळेचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. रायचूरला एक 'हमदर्द हायस्कूल' होते. पंडित तारानाथ नावाचे मूळ मंगळूरचे एक गृहस्थ संस्थानच्या शिक्षण खात्यात नोकरीला आले. पुढे त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन मार्च १९२० मध्ये रायचूरला ही शाळा सुरु केली. या शाळेत ते काय शिकवत याचे एक उदाहरण म्हणजे 'निजाम : भारतीय डायर' हा जालियनवाला बाग प्रकरणात कुप्रसिद्ध झालेल्या जनरल डायरशी निजामाची तुलना करणारा त्यांनी लिहिलेला एक लेख त्यांचा विद्यार्थी राजबहादूर यांच्या नावावर मद्रासच्या 'हिंदू' दैनिकात प्रसिद्ध झाला. त्याबद्दल त्याला 'मन्नानूर' या हैदराबाद संस्थानचे अंदमान समजल्या जाणाऱ्या तुरुंगात पाठविण्यात आले. तारानाथांना शाळा बंद करुन संस्थानच्या सरहद्दीबाहेर तुंगभद्रा जिल्ह्यात 'प्रेमायतन' नावाचा आश्रम काढावा लागला.

◆ ◆ ◆

१०

अनासक्त अवधूत

सर्व व्यक्तिगत इच्छांचा, अभिलाषांचा लोप ही संन्यस्त वृत्तीची खूण होय. स्वतःच्या ठायी अशी वृत्ती निर्माण करणे ही मोठी कठीण गोष्ट आहे; परंतु काहींच्या ठिकाणी ही जन्मजातच असते. अशा माणसांना आपण स्वतः, आपले कुटुंब यांचा विचारच मनाला शिवत नाही. ती जगतात समाजासाठी अन् मरतातही त्याचसाठी. संन्यास घ्यायला विसरलेली; परंतु खऱ्या संन्यासी वृत्तीची काही माणसे एका संन्यासाच्या - स्वामी रामानंद तीर्थांभोवती हैदराबाद चळवळीत गोळा झाली. रामचंद्र गोविंद उर्फ बाबासाहेब परांजपे त्यापैकीच एक होते.

बाबासाहेबांचे वडील गोविंदराव सोलापूरजवळ मोहोळला स्टेशनमास्तर रहात होते. नंतर ते सोलापूरला स्थायिक झाले. बाबासाहेबांचे मोठे बंधू विनायकराव हे स्वामीजींचे म्हणजे पूर्वाश्रमीच्या व्यंकटेश खेडगीकरांचे मित्र. मोगलाईत हिप्परग्याला राष्ट्रीय शाळेत खेडगीकर मुख्याध्यापक झाल्यानंतर त्यांना विज्ञान विषयाला एक शिक्षक हवा होता. त्यांनी गोष्ट काढताच विनायकरावांनी रामचंद्रला पाठवून दिले. फर्ग्युसन मधून तेव्हा रामचंद्र बी. एस्सी. झाला होता.

देखणे रूप, प्रभावी वक्तृत्व व प्रचंड वाचन असलेल्या बाबासाहेब परांजपे यांनी मुलांना नुसतेच विज्ञान शिकविले नाही. या शाळेच्या ब्रीदाप्रमाणे मुलांवर राष्ट्रीय संस्कारही केले. याच शाळेतील काही मंडळींनी स्वामी रामतीर्थांच्या विचारानुसार एक 'सेवक संघ' स्थापन केला होता. त्या संघातील कर्मकांडातून निर्माण झालेल्या काही गोष्टी बुद्धिवादी पिंड असलेल्या बाबासाहेबांना भावल्या नाहीत. ते त्या संघातून बाहेर पडले. पुढे स्वामीजींनी अंबाजोगाईला योगेश्वरी नूतन विद्यालयाचे पुनरुज्जीवन केले. तेव्हा बाबासाहेबही तेथे आले.

शाळेचे संसारी शिक्षक घर करुन रहात. स्वामीजी व इतर शिक्षक काही शाळेत, कुणी वसतीगृहात रहात. वेगवेगळ्या गावची मुले गावात भाड्याने खोली घेऊन गटागटाने रहात. अशा एखाद्या ठिकाणी अंबाजोगाईत बाबासाहेबांची वस्ती असे. बाबासाहेब मुलांना शिकवित, त्यांच्याशी बोलत, त्यांना इतिहासातील मूल्यांसाठी संघर्ष करणाऱ्यांच्या स्फूर्तीकथा सांगत. बोलता बोलता ज्या ठिकाणी रात्र होई तेथेच दहा बारा मुलांच्या पलीकडे आपलीही सतरंजी अंथरुन झोपून जात.

संपूर्ण वेष धोतर, सदरा व एक टोपी. सगळे पांढरे स्वच्छ खादीचे. रोज आपले कपडे स्वतःच धुवावयाचे. कपड्यांच्या अशा दोन संचापलिकडे जवळ काही सामानच नव्हते.

अपरिग्रहाचे जातीवंत उदाहरण. त्यांच्या शब्दांच्या सौंदर्याएवढीच त्या शब्दामागची त्यांची तळमळही सुंदर होती. त्या तळमळीने मराठवाड्यातील अनेक तरुणांना पेटविले. खानदेशातल्या तरुणात जे साने गुरुजींनी केले तेच बाबासाहेबांनी इकडे केले.

दुर्दैवाने बाबासाहेबांची सलग ध्वनिमुद्रीत केलेली किंवा लिहून काढलेली भाषणे उपलब्ध नाहीत. मात्र अनेकांच्या ती चांगली स्मरणात आहेत. अनेकांनी त्यांच्या आठवणी लिहिल्या आहेत. कधी ते कठोपनिषदातल्या नचिकेताची गोष्ट सांगत. जगातले सगळे ऐश्वर्य, सगळी सुखे, यांचा देकार लाथाडून आत्म्याचे व जन्ममृत्यूचे रहस्य मला सांग म्हणून यमाकडे हट्ट धरणाऱ्या नचिकेताची गोष्ट सांगून बाबासाहेब 'ऐहिक सुखांचा त्याग करुन स्वातंत्र्याच्या ध्येयाने तसेच वेडे व्हा' असे सांगत. कधी 'क्रांतीच्या उपासकांनी धोक्याचे, संकटाचे जीवन जगले पाहिजे' हा लेनिनचा उपदेश सांगत. अंबाजोगाईच्या शाळेच्या प्रारंभ काळातच स्वामीजी, बाबासाहेब यांच्या सारखे शिक्षक जातपात न करण्याचे, अस्पृश्यता न पाळण्याचे संस्कार विद्यार्थ्यांवर करतात म्हणून रुष्ट होऊन काही पालकांनी तक्रार केली. तेव्हा पालकांच्या एका बैठकीत बाबासाहेबांनी "होय ! आम्ही मुलांना बिघडवतो. मनुष्यानेच निर्माण केलेले भेद तोडून सर्वांमधील माणूस ओळखण्याचे आम्ही त्यांना शिकवतो. त्यांच्यातील माणूसकी आम्ही जागी करतो. हा अपराध आम्हाला कबूल आहे", अशा सुरात जे भाषण केले त्या भाषणाने तक्रार करणाऱ्यांच्याही डोळ्यात पाणी उभे राहिले. पोलिस कारवाईनंतर तुळजापुरला मुक्तीदात्या नेत्यांच्या सत्कारातच बाबासाहेब कडाडले, "ज्या स्वातंत्र्यात देवळात दर्शनासाठी जाण्याचा दलितांना अधिकार नाही ते कसले स्वातंत्र्य ?" बाबासाहेब स्वातंत्र्यापर्यंत अविवाहित होते. त्यांनी पित्याच्या वात्सल्याने दलित समाजातील अनेक मुलांना शिक्षण दिले. त्यांची राहण्या-जेवण्याची सोय केली. आयुष्यात त्यांना उभे केले.

चळवळीच्या शेवटच्या कालखंडात जेव्हा सशस्त्र लढ्याचा निर्णय झाला तेव्हा बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचा नवा पैलू पहावयास मिळाला. शस्त्रे मिळवून देऊ शकतील अशा सर्वांशी त्यांनी मुंबईत, पुण्यात संपर्क स्थापन केला. त्यात शिरुभाऊ लिमये होते तसेच गांधी खूनखटल्याचे माफीचे साक्षीदार दिगंबर बडगेही होते. बडगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या बेताची बाबासाहेबांना कल्पना नव्हती. शस्त्रे विकणारे त्याचा उपयोग कशासाठी होतो याची फिकीर थोडीच करतात? ती माणसे सर्वांनाच शस्त्रे विकतात. मुंबई पोलिसांनी बेकायदा शस्त्रविक्री बाबत धाडी घातल्या, त्यामुळे हैदराबादच्या मंडळींना ही खरेदी थांबवावी लागली. पुढे बाबासाहेब नागपूरात शस्त्र खरेदी केंद्रात मदत करावयास गेले.

याच काळात पुण्यात देशमुख आणि कंपनी ही प्रसिद्ध प्रकाशन संस्था चालवणाऱ्या रा. ज. देशमुखांच्या शनिवार पेठेतील वाड्यात एक बॉम्ब निर्मिती केंद्र सुरु झाले. आपली

विज्ञान विद्या बाबासाहेबांनी इथे उपयोगात आणली होती. मध्य प्रांतातील शुक्ला-मिश्रांचे सरकार जसे हैदराबादमधील स्टेट काँग्रेसच्या सशस्त्र लढ्याला मदत करीत होते. तशी मदत खेर मुरारजींचे मुंबई प्रांतातील सरकार करीत तर नव्हतेच; परंतु शक्य ते अडथळे उभारत होते. १० डिसेंबर १९४७ रोजी 'ज्ञानप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका बातमीनुसार शनिवार पेठेतील रामभाऊ देशमुखांच्या वाड्याच्या झडतीत पाच हातबॉम्ब, ९० काडतुसे, स्टेनगन्स, आर्सेनिक ट्रायक्लोराईड, रिव्हॉल्व्हरची काही काडतुसे, ७ गावठी हातबॉम्ब, दोन रायफल मॅग्झिन्स, एक रिव्हॉल्व्हर व ३०३ रायफलींची २२ काडतुसे सापडली. त्यावेळी रा. ज. देशमुख, बाबासाहेब परांजपे, व्यासाचार्य शांतीकर, रंगनाथ सायगावकर व विश्वंभरराव हराळकर यांना पकडण्यात आले. रा. ज. देशमुख हे बाबासाहेबांच्या हिप्परग्याच्या विद्यार्थ्यांपैकी एक. ही बातमी प्रसिद्ध झाल्यावर आपल्या विरुद्ध वापरण्यासाठी मुंबई प्रांतात शस्त्रे तयार करण्यात येतात याचा निषेध करणारा खलिता हैदराबादने भारताचे एजंट जनरल कन्हैयालाल मुन्शी यांच्याकडे पाठविला.

बाबासाहेब स्वामीजींच्या महत्त्वाच्या सहकाऱ्यांपैकी एक असले तरी त्यांचा पिंड संघटनेच्या चौकटीत काम करुन काही पद सांभाळण्यास अनुकुल नव्हता. त्यामुळे अगदीच थोडा काळ ते मराठवाडा प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष राहिले. बाबासाहेबांनी लोकांना पेटवत जायचे व इतरांनी त्यांची संघटना बांधावयाची, अशी ती वाटणी होती. वृत्तीने पुरोगामी असलेल्या बाबासाहेबांना स्वातंत्र्यानंतरचे काँग्रेसचे रुप भावले नाही. ते गोविंदभाई वगैरेंच्या बरोबर काँग्रेस बाहेर पडले व लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स मध्ये गेले. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बीड मतदार संघातून लोकसभेवर निवडूनही गेले; परंतु पक्षीय किंवा संसदीय राजकारण हा त्यांचा पिंडच नव्हता. १९५० पासूनच ते स्वामीजींनी सुरु केलेल्या नांदेडच्या पीपल्स कॉलेजमध्ये व नंतर १९५६ ला सुरु झालेल्या अंबाजोगाईच्या योगेश्वरी महाविद्यालयात लक्ष घालू लागले. त्यांच्या प्रेरक व्यक्तिमत्त्वाचा फायदा संस्थेला होई. मात्र त्यांचा पिंड व्यवस्थापकाचा, संघटकाचा नव्हता.

१९५० च्या सुमाराला बाबासाहेबांनी सिंधुताईंशी विवाह केला; परंतु संसारात रमून स्वस्थ बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. ते कर्तृत्वाची नवनवी क्षितीजे हुडकीत होते. लातूर जवळ मुरुड आणि काही खेड्यात सधनक्षेत्र विकासाचा विधायक प्रयोग त्यांनी केला. कोणतेही काम घेतले की त्यात स्वतःला झोकून देण्याच्या वृत्तीमुळे बाबासाहेबांनी अविश्रांत मेहनत करुन या गावात काम केले. नंतर लातूरचे पुरणमल पॉलिटेक्निक, दयानंद कॉलेज व उदगीरचे उदयगिरी महाविद्यालय यांच्या निर्मितीतही लक्ष घातले. स्वातंत्र्यासाठी लढण्याची ईर्षा तरुणात निर्माण करणारे बाबासाहेब स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणातून बाजूला सरकून

शिक्षण आणि विधायक काम यांच्यात रमून गेले. २६ एप्रिल १९९१ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी झालेल्या बाबासाहेबांच्या निधनाने हैदराबादच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक अनासक्त अवधूत काळाच्या पडद्याआड गेला.

◆ ◆ ◆

११
संस्थानाबाहेरची मदत

हैदराबाद मुक्ती संग्राम मुख्यतः संस्थानातील जनतेनेच चालवला असला तरी १९३८ मध्ये त्यात संस्थानाबाहेरील अनेकांनी भाग घेतला. 'अन्याय घडो कोठेही, धावून तिथेही जाऊ' हा बाणा असलेले सेनापती पांडुरंग महादेव बापट हे त्यातले अग्रणी. पुणे जिल्ह्याच्या मुळशी पेट्यात टाटा कंपनीने बोगद्याचे एक काम सुरु केले. तेव्हा विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांना मोबदला म्हणून पर्यायी जमीनीच द्या अशी मागणी करणाऱ्या सत्याग्रहात सात वर्षांची शिक्षा भोगणारे बापट 'सेनापती' म्हणून ओळखले जावू लागले होते. 'आपल्या प्रजेवर जुलूम करण्यात निजामाचा पहिला नंबर आहे, इंग्रजी सत्ता दूर करण्यासाठी करावयाच्या संघटनांत संस्थानी व खालसा असा भेद करता यावयाचा नाही,' असे जाहीर करुन बापटांनी हैदराबादेत सत्याग्रहासाठी जाण्याचे ठरविले. त्यांनी स्वामी रामानंद तीर्थांना एक पत्र पाठवून संस्थानात येण्याचा आपला मनोदय कळविला. स्वामीजींनी उत्तरात लिहिले 'आपण अवश्य यावे, आपले स्वागत आहे.'

२३ सप्टेंबर १९३८ रोजी 'आपण धर्मशाहीवादी नसून कष्टशाहीच्या बाजूने आहोत', अशी आपली भूमिका स्पष्ट करणारे पत्रक काढून बापट हैदराबादला निघाले. चोवीस व पंचवीस सप्टेंबरला ते हैदराबादेत होते. स्वामीजी आदि कार्यकर्त्यांशी त्यांनी चर्चाही केली. पंचवीस तारखेला रात्री पोलिसांनी त्यांना मोटारने लिंगमपल्लीस नेले व तेथे रेल्वेत बसवून संस्थानाबाहेर पाठवून दिले. पुण्यास पोचल्यावर बापटांनी आपण सत्याग्रह सहायक मंडळे स्थापन करणार व पुन्हा संस्थानात जाणार असे जाहीर केले. बापटांच्या मंडळाचे नाव 'हैदराबाद स्टेट कॉंग्रेस सत्याग्रह सहाय्यक कॉंग्रेसनिष्ठ मंडळ' असे होते. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह सुरू झाल्यावर बापट दोन वेळा पुन्हा संस्थानात आले. पहिल्या वेळी त्यांना मागील वेळेप्रमाणे पकडून संस्थानाबाहेर पाठविण्यात आले. दुसऱ्या वेळी १ डिसेंबर १९३८ ला ते आले तेव्हा मात्र गुलबर्गा येथे त्यांना अटक करुन खटला चालविण्यात आला. त्यात त्यांना दोन वर्षांची शिक्षा देण्यात आली. स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह परत घेण्यात आल्यावर जानेवारी १९३९ मध्येच बापटांची सुटका करण्यात आली. बापटांचा सत्याग्रह प्रतिकात्मक होता. ते मुख्यतः संस्थानातील जागृतीला मदत करु इच्छित होते. आपल्याला अटक झाल्यास एस. एम. जोशी या मंडळाचे अध्यक्ष होतील व ना. ग. गोरे त्यांना सहाय्य करतील असे बापटांनी जाहीर केले होते. हैदराबाद सत्याग्रहाच्या संदर्भात प्रभातफेरीत म्हणण्यासाठी बापटांनी एक कवनही केले होते.

'छळाचा प्रतिकार शांती प्रधान
निजामी प्रजा ही करी सावधान
तया बांधवा या चला हात द्याया
निजामा चला या चला वाकवाया'

असे एक कडवे त्यात होते.

सेनापती बापटांनी हैदराबाद प्रश्नात लक्ष घालण्यापूर्वीच हैदराबादच्या संकटग्रस्त हिंदूंच्या मदतीसाठी निधी जमा करण्याचा व प्रत्यक्ष सत्याग्रह सुरु करण्याचा विचार स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर करीत होते. 'केसरी' वृत्तपत्रात निधिबद्दलचे आवाहन प्रसिद्ध झाले होते. हैदराबाद संस्थानातील यशवंत दिगंबर उर्फ वाय. डी. जोशी, जुक्कलकर वगैरे हिंदुमहासभेचे कार्यकर्तेही सत्याग्रहाचा विचार करीत होते. अ. भा. हिंदुमहासभेचा निर्णय न झाल्याने त्यांनी 'हिंदू सिव्हिल लिबर्टीज युनियन' स्थापन करुन तिच्या मार्फत २१ ऑक्टोबर १९३८ रोजीच म्हणजे स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहापूर्वीच सत्याग्रह प्रारंभिला. पुढे जानेवारी १९३९ मध्ये हिंदुमहासभेचा भागानगर सत्याग्रह सुरु झाला. या सत्याग्रहात महाराष्ट्र हिंदुमहासभेच्या अनेक नेत्यांनी भाग घेतला. त्यात शंकर रामचंद्र दाते, ल. ब. भोपटकर, धोंडूमामा साठे वगैरे तर होतेच शिवाय आज पुरोगामी विचारांचे मराठीतील एक नामवंत कवी म्हणून सर्वांना ज्ञात असलेले गो. वि. उर्फ विंदा करंदीकर यांचाही समावेश होता. याशिवाय या सत्याग्रहात आणखी एक उल्लेखनीय नाव आढळते ते म्हणजे ख्यातनाम कादंबरीकार गोपाळ नीलकंठ दांडेकर यांचे. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर भागानगर सत्याग्रहाचे मार्गदर्शन करीत होते व त्यांनी हिंदूंच्या नागरी स्वातंत्र्याच्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात असे पत्र पंतप्रधान सर अकबर हैदरी यांना लिहिले होते.

२४ ऑक्टोबर १९३८ ला आर्य समाजानेही हैदराबादेत धार्मिक व नागरी हक्कांच्या बहालीसाठी सत्याग्रह सुरु केला. पंजाब, दिल्ली, राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश अशा अनेक प्रांतातील आर्यसमाजी कार्यकर्त्यांनी दूर हैदराबाद संस्थानात येऊन सत्याग्रह केला व निजामी पोलिसांचा छळ सोसला. संस्थेच्या दृष्टीने आर्य समाजाचा सत्याग्रह सर्वात मोठा होता. आर्य समाजाच्या सत्याग्रहात बारा हजार तर हिंदू सभेच्या सत्याग्रहात सुमारे चार हजार कार्यकर्त्यांनी भाग घेतला. स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहात सुमारे सहाशे लोकांनी भाग घेतला. पोलिसांच्या अहवालानुसार हे आकडे अनुक्रमे सात हजार पाचशे चौऱ्याण्णव, एक हजार पाचशे नव्वद व पाचशे पासष्ट असे आहेत. १७ जुलै १९३९ ला निजाम सरकारने काही घटनात्मक सुधारणा जाहीर केल्या व धार्मिक बाबतीतील अन्याय्य हुकूम दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले. हिंदुमहासभेने १ ऑगस्ट १९३९ रोजी व ७ ऑगस्ट रोजी आर्य समाजाने

आपले आंदोलन परत घेतले. स्टेट कॉंग्रेसचे आंदोलन गांधीजींच्या सल्यावरुन डिसेंबर १९३८ मध्येच परत घेण्यात आले होते. धार्मिक मागण्यांसाठी होणारे सत्याग्रह व राजकीय हक्कासाठी होणारे सत्याग्रह यांची सरमिसळ होऊ नये अशी गांधीजींची इच्छा होती.

प्रत्यक्ष सत्याग्रहात भाग घेणाऱ्या उपनिर्दिष्ट व्यक्तीं व्यतिरिक्त संस्थानाबाहेरच्या इतर अनेक व्यक्तींची लढ्याला मदत झाली. गांधीजी, नेहरु, पटेल या सारख्या कॉंग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांचे मार्गदर्शन लढ्याला होतेच. शिवाय पट्टाभी सीतारामय्या, बलवंतराय मेहता या सारखे कॉंग्रेसचे व संस्थानी प्रजा परिषदेचे नेते हैदराबाद स्टेट कॉंग्रेसला मार्गदर्शन करीत होते. स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठल्यावर व लढा सुरु झाल्यावर संघटनात्मक कामासाठी पैसेच नव्हते. संस्थानातील धनीकांनी काही अपवाद वगळता फारशी मदत केली नाही. तेव्हा जयप्रकाश नारायणांनी पुरुषोत्तमदास त्रिकमदासांना पंचवीस हजार रुपयांची देणगी द्यावयास लावली. ती शेवटच्या लढ्यातील एकमेव मोठी देणगी. समाजवादी नेत्यांपैकी नानासाहेब गोऱ्यांनाही संस्थानांत तुरुंगवास भोगावा लागला. भूमिगत चळवळीला मार्गदर्शन शिरुभाऊ लिमये वगैरेंनी केले. मुंबई प्रदेश कॉंग्रेसच्या स. का. पाटीलांनी हैदराबाद स्टेट कॉंग्रेस कार्यालयाला काही दिवस मुंबई कॉंग्रेस कार्यालयात जागा दिली. सशस्त्र लढ्याला मनमोकळी व मोठी मदत झाली ती मध्य प्रांतांच्या शुक्ला-मिश्रा यांच्या कॉंग्रेस सरकारकडून. अर्थात तो स्वतंत्र विषय आहे.

सशस्त्र लढ्याच्या काळात आंध्र कॉंग्रेसचे ए. कालेश्वरराव, टी. प्रकाशम यांनीही पुष्कळ मदत केली. विजयवाडा, मद्रास येथील हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची कार्यालये अशा मदतीशिवाय चालूच शकली नसती. म्हैसूर कॉंग्रेसचे नेते एस. निजलिंगप्पा यांचेही मार्गदर्शन चळवळीला मिळत असे.

◆ ◆ ◆

१२

बहादुरयारजंग

हैदराबाद शहरातल्या जमरुद महल थिएटरमध्ये १९३० मध्ये बहादूरखानाचे भाषण होते. १९२७ पासून बहादूरखानाने हैदराबाद संस्थानात 'तबलीग' ची म्हणजे शुद्धीकरणाची मोहीम सुरु केली होती. शुद्धीकरणाचा व्यावहारिक अर्थ म्हणजे इतर धर्मियांना मुस्लिम करणे. फर्डे वक्तृत्व, इस्लामी इतिहास व धर्मग्रंथ यांतील दाखले देण्याची क्षमता व निःस्वार्थ वृत्ती या गुणांमुळे लोकप्रिय झालेल्या बहादुरखानाची कीर्ती सातवे निजाम मीर उस्मान अलीखान यांच्या कानावर गेलेली होतीच. पूर्वसूचना न देताच आलेले उस्मान अलीखान व्याख्यानाला पहिल्या रांगेत येऊन बसले.

भाषण रंगात आले होते. प्रत्यक्ष राजाच समोर येऊन बसलेला पाहताच बहादूरखान इस्लामने सांगितलेली राजाची कर्तव्ये भाषणात सांगू लागले. त्या भाषणाने प्रभावित झालेल्या निजामाने लवकरच एक फर्मान काढून बहादुरखानाला 'नवाब बहादुरयारजंग' असा किताब दिला व छोटासा तनखा चालू करुन त्याला जहागीरदारही केले. बहादुरयारजंगाच्या 'मजलीसे तबलीग-इ-इस्लाम'च्या शाखा अनेक ठिकाणी स्थापन झाल्या. या पवित्र धर्मकार्यात सरकार आणि ईत्तेहादुल मुस्लमीनचे त्यांना सहाय्य मिळू लागले. पगारी धर्मप्रचारक नेमले गेले. खेड्यापाड्यांत सरकारी अधिकाऱ्यांच्या धाक दाखवणाऱ्या उपस्थितीत धर्मांतरे होऊ लागली. ब्रिटिश रेसिडेंटने १ सप्टेंबर १९३६ च्या आपल्या पाक्षिक अहवालात कळवले की, गेल्या दशकात वीस हजारांहून अधिक दलितांना मुस्लिम धर्माची दीक्षा देण्यात आली आहे.

धर्मांतराच्या या मोहिमेचा हेतू बहादुरयारजंगांनी लपवून ठेवलेला नव्हता. ज्या वेळी हे राज्य संघराज्याचा भाग बनेल, तेव्हा आजूबाजूनी हिंदू बहुसंख्यांक प्रांतांनी वेढल्या जाणाऱ्या या संस्थानात मुस्लिमाची संख्या वाढवण्याचा हा प्रयत्न आहे, असे ते म्हणत. इस्लाम हा राजाचा धर्म आहे. तो प्रजेने स्वीकारला तर राजाला आनंद होईल, असे ते सांगत. धर्मांतराची पद्धत फार सोपी असे. ज्याचा धर्म बदलावयाचा त्याला खाद्यपदार्थ व नवे कपडे देत. एका फॉर्मवर त्याची सही वा अंगठा घेत. या फॉर्ममध्ये आपण इस्लामचा स्वीकार केल्याचे लिहिलेले असे. फक्त एवढाच विधी असे.

या धर्मांतराच्या विरोधात आर्य समाज दृढपणे उभा राहिला. त्याने दडपणाचा प्रतिकार करण्यासाठी लोकांची हिंमत वाढवली. १९३१ ते १९४१ या दशकात आर्य समाजाच्या, संस्थानात दोनशे एकेचाळीस शाखा स्थापन झाल्या.

जबाबदार राज्यपद्धतीची चळवळ ही आपल्या अनियंत्रित विशेषाधिकारांचा शेवट करणार आहे, याची स्पष्ट जाणीव निजाम आणि राज्यातला राज्यकर्ता मुस्लिम वर्ग या दोघांनाही

होती. १९२८ मध्ये 'अित्तेहाद-इ-बैनुल मुस्लिमीन' या नावाची मुस्लीमांची एक बिगर राजकीय संघटना स्थापन झाली होती. १९३८ मध्ये या संघटनेने राजकीय स्वरूप धारण केले व बहादूरयारजंग तिचे अध्यक्ष झाले. संघटनेचे नाव 'मजलीस अित्तेहादुल मुस्लिमीन' असे झाले.

मुस्लिमांच्या धर्मभावना भडकवण्याचे काम बहादुरयारजंगांनी व त्यानंतर कासिम रझवीनी केले.

कायदे मंडळाची सुधारणा करण्यासाठी अय्यंगार समितीने केलेल्या शिफारसी काँग्रेसप्रमाणेच मजलीस इत्तेहादुल मुस्लमीनलाही अमान्य होत्या. प्रत्येकाची कारणे निराळी होती. जबाबदार राज्यपद्धती काँग्रेसला हवी होती, तर मजलीसला कायदे मंडळात मुस्लिमांची बहुसंख्या हवी होती. शेवटी निजामाने आपल्या अधिकाऱ्याकरवी मजलीसला असे लेखी आश्वासन दिले की कायदे मंडळात मुस्लिम बहुसंख्या टिकवली जाईल. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या आंदोलनाला राज्यातील मुस्लिम नेतृत्वाबरोबरच अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या व्यासपीठावरूनही विरोध होऊ लागला.

निजामाला 'हिज एक्झाल्टेड हायनेस' म्हणण्यात येई. त्याला 'हिज मॅजेस्टी' म्हणावे अशी मजलीसची मागणी होती. शिवाय निजामाच्या राज्यकारभारावर नजर ठेवण्यासाठी मंत्रिमंडळातील पोलिस आणि महसूल खात्यात एक मंत्री व काही अधिकारी ब्रिटीश नेमले जात. या गोष्टीवर बहादूरयारजंगांनी टीका करण्यास प्रारंभ केला. रेसिडेंटने बहादूरयारजंगाना सुनावले 'हिज मॅजेस्टी' फक्त इंग्लंडचा राजा आहे. नेपाळप्रमाणे हैदराबाद कधीही स्वतंत्र राज्य नव्हते. तुमच्या राज्यात ब्रिटिश मंत्री आणि अधिकारी नेमणे हा बेकायदेशीर हस्तक्षेप म्हणता येणार नाही.

डिसेंबर १९३९ मध्ये बीदर या ऐतिहासिक शहरात मजलीसे ईत्तेहादुल मुस्लमीनचे वार्षिक अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात नेहमीप्रमाणे बहादुरयारजंगांचे प्रक्षोभक भाषण झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''आम्ही हैदराबादचे मुसलमान आता स्वतंत्र आहोत. महायुद्धात आम्ही ब्रिटिशांना मदत केली व युद्ध संपल्यावर मागणी केली की, त्यांना आम्ही भाडेपट्ट्याने दिलेले आमचे भाग (वऱ्हाड वगैरे) परत द्यावेत; परंतु त्यांनी नकार दिला. आता परिस्थिती बदलली आहे. ब्रिटिश आमच्याबरोबर नसले, तरी कोणत्याही प्रसंगाला तोंड द्यायला आम्ही तयार असले पाहिजे. वादळ येत आहे. त्याला तोंड देण्यासाठी तयार व्हा. गतवर्षीच्या घटनांपासून (स्टेट काँग्रेसचा पहिला सत्याग्रह १९३८ ला झाला होता) आपण बोध घेतला पाहिजे. ईत्तेहादुल मुस्लमीनच्या हातात सत्ता असती, तर सत्याग्रही उंदरांना गोळ्या घातल्या असत्या आणि पंधरा दिवसांत सत्याग्रह बंद पाडला असता.

‘‘मुसलमानांचा स्वर्ग त्यांच्या तलवारीच्या छायेत असतो. आमच्या पूर्वजांनी रक्त सांडले आणि हा देश जिंकून घेतला. भारतावरचे स्वामित्त्व केवळ दौर्बल्यामुळे आम्ही घालवले. आम्ही जर औरंगजेबाच्या पदचिन्हांवर चाललो असतो तर असे झाले नसते.’’

या अधिवेशनानंतर अवघ्या तीन महिन्यांनी २३ मार्च १९४० रोजी बीदर शहरात हिंदूंची दोनशे दुकाने जाळण्यात आली. लुटालूट झाली. या प्रकाराने गांधीजी व नेहरूंसारखे नेतेही हादरून गेले.

येथपर्यंत बहादुरयारजंगांचे राजकारण निजामाच्या उद्दिष्टांना पूरक होते. परंतु नंतर बहादुरयार जंगांनी अशी भूमिका घेतली की, प्रत्येक मुसलमान सार्वभौम आहे. निजामाचे सिंहासन हे मुसलमानांच्या राजकीय व सांस्कृतिक सार्वभौमत्वाचे केवळ प्रतीक आहे. आम्ही सर्व मुसलमान राजपदाचे अंग आहोत. मजलीसचे कार्यकर्ते ‘अनल मलिक’ (मी राजा आहे) असे घोषवाक्य लिहिलेले बिल्ले लावू लागले. निजामाला हा प्रकार मान्य नव्हता. आपले राजपद टिकवण्यासाठी तो मुस्लिमांना प्राधान्य द्यावयाला तयार होता, परंतु त्या सगळ्यांत तो राजपद वाटायला तयार नव्हता. निजामाने राजपत्रात या भूमिकेला विरोध करणारे निवेदन प्रसिद्ध केले. संस्थानात ब्रिटिश हस्तक्षेपाविरुद्ध जो प्रचार चालू हाता, त्यामागे निजामच असल्याचा संशय ब्रिटिश सरकारला होता. अगदीच नाइलाज झाला, तेव्हा १९४१ रोजी बहादुरयारजंगांची जहागीर जप्त का करू नये, अशी ‘कारणे दाखवा’ नोटिस बजावण्यात आली. परंतु हा केवळ देखावा होता. २४ ऑगस्ट १९४१ रोजी बहादूरयारजंगांनी माफीनामा सादर केला. या माफीनाम्याचा मसुदाच महंमदअली जीनांनी लिहिला होता. २९ ऑगस्टला जीना हैदराबादेत आले, त्या वेळी त्यांच्याशी विचारविनिमयानंतर ही माफी स्वीकारण्यात आली. जीना व बहादुरयार जंग यांचा चांगला स्नेह होता. अ. भा. मुस्लिम संस्थानी परिषदेची संघटना जीनांनी बहादुरयारजंगांवरच सोपविली होती. २२ मार्च १९४३ रोजी बहादुरयार जंगांवर वर्षभरासाठी भाषणबंदीचा हुकूमही बजावण्यात आला होता. १० एप्रिल १९४३ रोजी आपली मनसब व विशेषाधिकार त्यांनी ‘नजर’ म्हणून निजामाला परत केले. निजामाने पण हे सर्व त्यांच्या कुटुंबीयांसाठीच राखून ठेवले.

बहादुरयारजंग भडकावणारी भाषणे करीत असले, तरी ते स्वतः भडक डोक्याचे नव्हते. त्यांना परिस्थितीचे आकलन होते. २४ मे १९३८ रोजी गुलाम अहमद या आपल्या स्नेह्याला लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, ‘‘हे मला कळते, की शेवटी माझा पराभव होईल. मुस्लिमांच्या हातून हैदराबाद संस्थान निसटून जाईल आणि भारतीय समुद्रात एखाद्या लाटेसारखे विरेल. मुस्लिमांचे भले त्यांनी इतरांबरोबर सलोख्याने राहण्यातच आहे. परंतु मी काय करु ? हे उद्दीष्ट स्वीकारण्यास माझी मनोधारणा तयार होत नाही. मी इस्लामी राज्याच्या

स्वप्नसृष्टीतच राहतो. एक तर मी ते निर्माण करीन किंवा ते स्वप्न पाहत हे जग सोडून जाईन''.

२५ जून १९४४ रोजी आपले एक मित्र व हैदराबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हाशमअलीखान यांच्या घरी भोजनानंतर हुक्का ओढत असताना बहादुरयारजंगांचा आकस्मिक मृत्यू झाला. स्वतः निजाम बहादुरयारजंगांच्या अंत्ययात्रेत सामील झाला.

त्यांच्या मृत्यूनंतर पंतप्रधान छत्तारींची निजामाशी भेट झाली. तेव्हा छत्तारी म्हणाले, ''त्यांच्या मृत्यूने राजाने एक निष्ठावंत सेवक गमावला आहे; परंतु ईश्वराच्या योजनेत काही शहाणपण नसेल असे कसे म्हणावे ?''

निजाम उत्तरला, ''बहादुरयारजंगांचे महत्त्व अधिक वाढणे मात्र अशांतीला कारण झाले असते.'' वयाच्या अवघ्या अडतिसाव्या वर्षी मृत्यू पावलेल्या बहादुरयारजंगांनी हैदराबादच्या इतिहासावर कायमचा ठसा उमटविला.

◆ ◆ ◆

१३

जीना आणि हैदराबाद

काळ बदलला की संदर्भ बदलतात, काही माणसेही बदलतात. त्यांची इतरांबरोबरची नाती बदलतात. जे मित्र होते ते शत्रू होतात. जे शत्रू होते ते जिवाभावाचे स्नेही बनतात. हैदराबाद संस्थानच्या आयुष्याच्या शेवटच्या दशकात महंमद अली जीना हे निजामाचे सल्लागार आणि मार्गदर्शक होते. निजाम वेळोवेळी त्यांचा सल्ला घेई. मात्र हेच जीना जेव्हा प्रथम हैदराबादेत आले तेव्हा निजामाच्या सरकारने त्यांना पुन्हा संस्थानात येण्याला बंदी घातली होती.

१९१९ च्या एप्रिलमध्ये 'उद्याचा भारत' या विषयावर भाषण देण्यासाठी जीना हैदराबादला आले. शहराच्या पोलिस आयुक्तालयाचे अधिकारी व्यंकटरामा रेड्डी यांनी जीनांना भेटून त्यांच्यावर 'जीनांनी हे भाषण देऊ नये', असा हुकूम बजावला. जीनांनी हा हुकूम मानण्यास इन्कार केला तेव्हा निदान भाषणात राजकीय विषयांना स्पर्श केला जाऊ नये, असे रेड्डींनी सांगितले. जीनांचे भाषण झाले, त्यात संस्थानातील कारभारावर टीका नसली तरी राजकीय विषयांची चर्चा होतीच. जीना मुंबईला परत गेल्यावर राजकीय खात्याचे मंत्री सर निजामत जंग यांनी त्यांना पत्र लिहून कळविले, 'व्यावसायिक किंवा इतर कोणत्याही कारणासाठी त्यांनी पूर्वपरवानगी शिवाय पुन्हा संस्थानात येऊ नये.' आपल्या उत्तरात जीनांनी कळविले, ''मी राजकीय विषयावर बोलणे टाळीन, परंतु स्वयंशासन व संबंधित विषयांसंबंधी बोलेन.'' आपले हैदराबादेत झालेले संपूर्ण भाषण जर निजामासमोर ठेवण्यात आले तर त्यांना त्यात काही आक्षेपार्ह वाटणार नाही, अशी खात्रीही त्यांनी व्यक्त केली. मात्र या उत्तरानंतरही आपला पूर्वीचा बंदी हुकूम परत घेण्यास निजामाने इन्कार केला व तसे जीनांना कळवण्यात आले.

संस्थानात येण्यावर जीनांना बंदी घालणारा हा हुकूम पुढे १९३० मध्ये परत घेण्यात आला. निजामाच्या सरकारने आपली भूमिका बदलली याचे कारण जीनांनीच आपली भूमिका बदलली होती, हेच होते. जे जीना १९१९ मध्ये भारतातील राष्ट्रवादाचे व धर्मनिरपेक्ष राजकारणाचे पुरस्कर्ते नेते होते. ते १९३० मध्ये भारतातील मुस्लिमांचे, त्यांच्यासाठी स्वतंत्र राजकारण करू पाहणारे नेते म्हणून ओळखले जाऊ लागले होते. आता जीना आणि निजाम यांचे राजकीय विचार एकाच दिशेने जाणारे होते. १९२९-३० पासून जीना भारतातील मुस्लिमांच्या भवितव्याचा वेगळा विचार करु लागले होते.

बंदी परत घेतली गेल्यानंतर १९३७ मध्ये जीना आपली बहीण फातिमा हिच्याबरोबर

हैदराबादला आले. त्यानंतर पुन्हा १९३९ व १९४१ मध्ये त्यांनी हैदराबादला भेटी दिल्या. या काळातच त्यांची 'मजलिसे इत्तेहादुल मुस्लिमिन' या संघटनेचे नेते व एक प्रभावी वक्ते बहादुरयारजंग यांची ओळख झाली. परस्परांचे महत्त्व परस्परांनी ओळखले. पुढे काँग्रेसने भारतीय संस्थानातील प्रजेसाठी स्थापन केलेल्या 'अ.भा. संस्थानी प्रजा परिषदे' प्रमाणे मुस्लिम लीगने 'अ. भा. संस्थानी मुस्लिम प्रजा परिषद' स्थापन केली. त्या वेळी बहादुरयार जंग यांनाच त्याचे अध्यक्ष करण्यात आले. देशातील अनेक भागांतील मुस्लिम उर्दूकडे आपली-मुस्लिमांची-भाषा म्हणून बघत असले, तरी त्यांचे नेतृत्व करणाऱ्या जीनांना फारसे उर्दू येत नव्हते. उर्दूवर प्रभुत्व असलेला एक वक्ता बहादूरयारजंगच्या रुपाने जीनांना सापडला.

फेब्रुवारी १९४१ मध्ये उत्तर प्रदेशातील एक जमीनदार छत्तारीचे नवाब अहमद सईद यांना हैदराबादचे पंतप्रधानपद स्वीकारण्याचे निमंत्रण देण्यात आले. त्या वेळी नवाब हे मुस्लिम लीगचे सभासद होते. आपल्याला देण्यात आलेले निमंत्रण जीनांना कळवून त्यांनी जीनांची संमती मागितली. जीनांनी आपली नाराजी अप्रत्यक्ष कळवली व दुसऱ्या एका कारणासाठी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोटीसही दिली. छत्तारीनंतर आलेले मिर्झा इस्माईल यांच्या नावाला तर जीनांनी स्पष्ट विरोध केला. इस्माईल परत गेल्यावर झाफरुल्लाखान, गुलाम अहमद वगैरे नंतर झालेल्या पाकिस्तानातील मुत्सद्द्यांना हैदराबादेत पंतप्रधान म्हणून पाठवण्याची विनंती निजामाने केली होती. परंतु जीनांना ती मान्य करणे शक्य झाले नाही. अगदी शेवटचे पंतप्रधान लायकअली यांच्या नेमणुकीपर्यंत निजाम जीनांचा सल्ला घेतच होता.

कायदेमंडळाच्या व मंत्रिमंडळाच्या रचनेत सुधारणा सुचवणाऱ्या अय्यंगार समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर हिंदूंवर अन्याय करणाऱ्या व जबाबदार राज्य पद्धतीचे तत्त्व नाकारणाऱ्या त्या सुधारणा स्वीकारण्यास काँग्रेसला राजी करण्याचा एक प्रयत्न म्हणून काही हिंदू व मुस्लिम पुढाऱ्यांत निजामाच्या प्रेरणेने ऐक्य बोलणी सुरु करण्यात आली होती. ती 'जीना लवकरच येणार आहेत, त्यांचा सल्ला घेऊन पुन्हा सुरू करू.' असे कारण अधिकृतपणे सांगून १९४१ मध्ये स्थगित करण्यात आली होती.

काश्मीरमध्ये जबाबदार राज्य पद्धतीची स्थापना होऊन बहुसंख्यांकांचे राज्य आले पाहिजे, अशी मागणी करणारे जीना हैदराबादेत मात्र फक्त मुसलमानांनाच राज्य करण्याचा अधिकार आहे, या मजलीसच्या भूमिकेला पाठिंबा देत होते, काश्मीर व हैदराबादमधील परिस्थिती वेगवेगळी आहे, असे सांगत होते. वेगळेपण एवढेच होते की, काश्मीरमध्ये बहुसंख्य मुस्लिम होते, तर हैदराबादेत हिंदूंची बहुसंख्या होती.

एकट्या निजामातच सार्वभौमत्व एकवटलेले नसून संस्थानातील प्रत्येक मुसलमान

सार्वभौम आहे, अशी भूमिका बहादुरयारजंग याने घेतली व ब्रिटिशांच्या संस्थानातील हस्तक्षेपावरुन त्यांच्यावर भाषणात हल्ले करण्यास सुरवात केली. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या निजामाने बहादुरयारजंगाविरुद्ध कारवाई करण्याचे ठरविले. या प्रकरणी जीनांनीच मध्यस्थी केली. बहादुरयारजंगाने दिलेला मूळ माफीनामा जीनांनीच तयार केला होता. निजामाने माफी स्वीकारताना काढलेल्या फर्मानाचा मसुदासुद्धा जीनांनीच तयार केला असता, तर बरे झाले असते, असे जीनांना पाठविलेल्या पत्रात बहादूरयारजंगाने म्हटले. अशा रीतीने संस्थानात 'बहादूरयारजंग माफी' नावाचे एक नाटक अभिनीत झाले. त्याचे दिग्दर्शक जीनाच होते.

ऑगस्ट १९४६ मध्ये मिर्झा इस्माईलना पंतप्रधान नेमण्याच्या निजामाच्या बेताला विरोध करण्यासाठी जीना जेव्हा हैदराबादला आले तेव्हा त्यांच्या व निजामाच्या झालेल्या भेटीबद्दल एक हकिगत नवाब होशयारजंग या निजामाच्या सहायकाने अनेकांना सांगितली आहे. स्वतः इस्माईल यांनी 'माय पब्लिक लाईफ' या आपल्या आत्मचरित्रात ती उद्धृतही केली आहे. पायावर पाय टाकून निजामाच्या समोर बसल्याबद्दल व त्याच्या उपस्थितीत सिगार ओढल्याबद्दल निजाम जीनांवर भडकला व "तुम्हाला माहिती आहे मी कोण आहे? हैदराबादच्या निजामासमोर वागण्याची ही पद्धत आहे काय?" असे त्याने आवाज चढवून विचारले. जीनांनी क्षमायाचना केल्यावरही निजामाचा पारा उतरला नाही व मिर्झा इस्माईलांच्या नेमणुकीबद्दल निजाम कडवटपणे 'मला माझ्या कारभारात कुणाचा हस्तक्षेप नको आहे. मला याबद्दल तुमच्याशी चर्चा करण्याची इच्छा नाही', असे म्हणाला. अशी हकिगत होशयारजंग सांगतात. निजाम व जीना यांचा या काळापूर्वीचा व नंतर अगदी जीनांच्या मृत्यूपर्यंतचा पत्रव्यवहार पाहिला म्हणजे असे वाटते की, ही हकिगत काल्पनिक असावी व आपल्या धन्याचे महत्त्व वाढण्यासाठी व त्याची एक विशिष्ट प्रतिमा निर्माण करण्यासाठी ती होशयारजंगानीच रचून सांगितलेली असावी. जीनांचा हस्तक्षेप तर निजामालाच हवा होता व जीनांच्या मृत्यूपर्यंत निजाम त्यांच्या मताला फार महत्त्व देत होता. सर्व महत्त्वाच्या निर्णयांबाबत त्यांचे मार्गदर्शन घेत होता.

निजामाने भारत व पाकिस्तान या दोन्हीपैकी कोणत्याही प्रस्तावित संघराज्यात मी सामील होणार नाही, असे जाहीर करावे हा सल्ला राज्याचे घटनात्मक बाबींचे सचिव अली यावरजंग त्यांना भेटले, तेव्हा जीनांनी दिला होता. त्यानंतर ११ जून १९४७ रोजी आपले स्वातंत्र्य जाहीर करणारे व कोणत्याही संघराज्यात सामील होण्याचा आपला इरादा नसल्याचे जाहीर करणारे फर्मान निजामाने प्रसिद्ध केले. त्यानंतरही महंमद अली जीनांनी थोडी तरी सवड काढून हैदराबादला आपल्याला भेटावयास यावे म्हणजे पुढील हालचालींचे धोरण ठरवता येईल यासाठी निजाम आर्जवे करीत होता.

निजाम आणि जीना किती जवळ होते याचा पुरावा म्हणजे निजामाचे १८ जून १९४७

चे जीनांना पाठविलेले पत्र. ११ जून रोजी काढलेल्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात हिंदू-मुस्लिम हे माझे दोन डोळे आहेत, असे मानभावीपणे म्हणणारा निजाम या पत्रात आपले अंतःकरण उघड करतो आहे. जीना कामात असल्यामुळे जून महिन्यात हैदराबादला येऊ शकले नव्हते. निजाम उस्मानअलीखान त्याबद्दल लिहितात -

'मला वाटते की जेव्हा आपले शत्रू (म्हणजे मला हिंदू असे म्हणावयाचे आहे.) सर्व प्रकारच्या उचापती करीत आहेत, अशा वेळी तुम्ही येथे न येणेच उचित आहे. मात्र आपण येईल त्या परिस्थितीला तोंड देण्याची सिद्धता ठेवलेली आहेच.'

ज्या भाषेत निजामाने हे लिहिले आहे त्यावरून दोघांच्या संबंधातील मोकळेपणा स्पष्ट होतो.

शेवटी जेव्हा हैदराबाद संस्थानचे अस्तित्वच संपण्याचा प्रसंग ओढवला तेव्हा जीना काहीच मदत करु शकले नाहीत. प्रत्यक्ष पोलिस कारवाई सुरु झाली, त्यापूर्वीच दोन दिवस त्यांनी या जगाचा निरोप घेतला होता.

◆ ◆ ◆

१४

डिचपल्लीची मशीद आणि नबाबाच्या मिश्या

उत्तर प्रदेशातल्या एका छोट्याश्या जहागिरीचे जहागिरदार, इंग्रजांच्या मर्जीतील एक मुस्लिम नेते, मुस्लिम लीगचे पदाधिकारी सर अहमद सईद यांची जुलै १९४१ मध्ये सर अकबर हैदरी यांच्या जागी हैदराबादचे पंतप्रधान म्हणून नेमणूक झाली. हेच छत्तारीचे नबाब. हैदराबादेत नेमणूक स्वीकारल्यानंतर तिथल्या प्रथेप्रमाणे त्यांचे नाव 'नबाब सईद-उल-मुल्क बहादूर' झाले. १९४१ मध्ये त्यांची झालेली नेमणूक तीन वर्षांसाठी होती. परंतु ती निजामाने पाच वर्षासाठी करुन त्यांना मुदतवाढ दिली. १९४१-१९४६ हा छत्तारीच्या नबाबांचा हैदराबादमधील पहिला कार्यकाल अतिशय तणावाचा होता. छत्तारीचे नबाब मुस्लिम लीगचे सभासद व एकेकाळी बॅ. जीनांचे सहकारी असले तरी प्रवृत्तीने मवाळ, मृदुभाषणी होते. याच काळात निजाम, बहादूरयारजंगांसारख्या अतिरेकी मुस्लिम नेतृत्वाला खतपाणी घालत होता. भडकवण्यात आलेल्या मुस्लिमांना न दुखावता आवर घालण्याचा प्रयत्न करणे ही तारेवरची करसत होती.

छत्तारीच्या नबाबाच्या कार्यकालाच्या शेवटच्या दिवसात घडलेला एक प्रसंग हैदराबादेतील त्यावेळच्या परिस्थितीवर जसा प्रकाश टाकतो तसेच तो धर्माच्या नावावर लोकांना भडकवणे किती धोकादायक आहे, हेही दर्शवतो. निजामाबाद जिल्ह्यात डिचपल्ली या गावी अमेरिकन ख्रिश्चन मिशनऱ्यांनी कुष्ठरोग्यांसाठी एक रुग्णालय उघडले होते. हैदराबाद संस्थानात तेवढे एकच रुग्णालय कुष्ठरोग्यांवर उपचार करीत असे. या रुग्णालयात साहजिकच सर्वच धर्माचे रुग्ण येत. येथे जे मुस्लिम रुग्ण येत त्यांच्यासाठी या रुग्णालयाच्या आवारात एक मशीद असली पाहिजे, अशी कल्पना निघाली. रुग्णालय ख्रिश्चन मिशनचे, त्यात मशीद कोण करु देणार? वगैरे विचार डोक्यात येण्याचा तो काळच नव्हता. तुरूंगामध्ये मशीद, सरकारी कार्यालयात मशीद अशा उभारणीत काही चुक आहे असे कोणासही वाटत नसे. या रूग्णालयासाठी निजाम सरकारने मिशनला जागा दिली असली तरी सध्या मिशनच या जागेचे मालक होते. मिशनची परवानगी न मागताच रूग्णालाच्या आवारात मशीद बांधण्याच्या कामाला जबरदस्तीने प्रारंभ झाला. काही उत्साही धर्मवेड्यांनी केलेले मशीदीसाठीच्या ओट्याचे बांधकाम मिशनच्या अधिकाऱ्यानी पाडून टाकले. ताबडतोब संस्थानभर निषेध सुरू झाले. पंतप्रधान छत्तारींकडे रूग्णालयात मशीद बांधण्याबाबत विनंती अर्ज आला होता. सरकारने मशीद बांधण्याचे तत्वत: मान्य केले होते. मात्र निश्चित जागा ठरविण्यासाठी मिशन बरोबर बोलणी होत होती.

मार्च १९४६ च्या दुसऱ्या आठवड्यात पंतप्रधान छत्तारी काही कामासाठी मुंबईस गेले होते. १४ मार्चला ते हैदराबाद मध्ये परत आले. सायंकाळ होऊन गेली होती. अशा वेळी मंत्रीमंडळाचे एक सदस्य मोईन नवाज जंग यांनी त्यांना कळविले की, मजलीसे इतेहादुल मुस्लिमीनचे एक नेते अब्दुल रहमान रईस डिचपल्ली मशीद प्रकरणाबाबत त्यांना भेटू इच्छितात. नबाबांनी सांगितले की, आता रात्र झाली आहे, त्यांना उद्या भेटू द्या. मजलीस या प्रश्नाबाबत जाहीर सभा घेण्याच्या विचारात होती. नबाबांना हे जेव्हा मोईन नवाज जंगांनी सांगितले, तेव्हा ते म्हणाले, 'सरकारने मशीद बांधावयाचे पूर्वीच ठरवले असताना आता जाहीरसभा कशाकरता?'

दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ मार्च १९४६ रोजी 'शाह मंजिल' या पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानी अब्दुल रहमान रईस पंतप्रधानांना भेटावयाला आले. फार मोठा जमाव जमतो आहे हे छत्तारीच्या नबाबांना कळले होते; परंतु पोलिस बोलावून घ्यावेत, असे त्यांना वाटले नाही. रईस यांनी नबाबांच्या भेटीत मागणी केली की, सरकार मशीद बांधून देणार आहे, असे आश्वासन त्यांनी लेखी देण्यात यावे. रईस आपल्या बोलण्याची माहिती बाहेर जमलेल्या जमावाला द्यावयास बाहेर गेले. आणि ही जणू पूर्वनिश्चित खूण असावी तसे हजारो लोक पंतप्रधानांच्या निवासस्थानात घुसले. त्यांनी तेथे नासधूस करण्याला सुरवात केली. शाह मंजिलला आग लावण्याचाही प्रयत्न झाला. (हेच शाह मंजिल आता आंध्र प्रदेशाचे राजभवन झाले असून, त्यात राज्यपाल राहतात.) याच बंगल्याच्या शेजारी स्वतंत्र बंगल्यात हैदराबादचे पोलीस मंत्री ग्रिम्सन राहत. त्यांच्याही बंगल्यात जमाव घुसला व त्यांनी त्या बंगल्यातील सामानाचीही नासधूस केली.

या हल्ल्यात पंतप्रधान छत्तारीच्या नबाबांना धक्काबुक्की करण्यात आली व त्यांच्या मिशा उपटण्यात आल्या, अशी वार्ता सर्वत्र पसरली. मात्र नबाबांनी आपले आत्मचरित्र 'यादे अय्याम' नावाने उर्दूत तीन खंडात लिहिले आहे. त्यात त्यांनी या वार्तेचा इन्कार केला आहे व 'आपल्यावर यावेळी शारीरिक हल्ला झाला नाही', असे सांगितले आहे.

निजाम किंवा पंतप्रधान छत्तारीचे नबाब यांनी स्वत: या प्रकरणातील दोषींबद्दल काहीही कारवाई केली नाही. निजामाने फक्त एवढेच केले की, या हल्ल्यातील नुकसानीबद्दल छत्तारीच्या नबाबांना दीड लक्ष व ग्रिम्सन यांना पंच्याहत्तर हजार रूपयांची रक्कम भरपाई म्हणून मंजूर केली. छत्तारींना असेही कळाले होते की, या हल्ल्यामागे स्वत: निजामच असावा. निजामाचे खासगी चिटणीस काजीमयारजंग यांनी छत्तारींना सांगितले की, निजामाच्या इच्छेप्रमाणे ग्रिम्सन यांना जर ब्रिटीश सरकारने परत बोलावले असते, तर हा हल्ला झालाच नसता.

याची पार्श्वभूमी अशी होती,की लॉर्ड रिडींग व्हाईसरॉय होते तेव्हापासून निजामाच्या कारभारातील महत्त्वाच्या गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अशी व्यवस्था अमलात होती की महसूल खात्याचे महासंचालक, पोलीस खात्याचे महासंचालक अशी दोन महत्वाची पदे व मंत्रिमंडळातील एका मंत्र्याची जागा यावर ब्रिटीश सरकारच्या सनदी नोकरांची ब्रिटीश सरकारच नेमणूक करी. १९२४ पासून ही व्यवस्था निमूटपणे सहन करणाऱ्या निजामाला आता ही व्यवस्था झुगारून द्यावीशी वाटू लागली होती. तो स्वत: तर त्याविरूद्ध बोलू शकत नव्हता. बहादुरयारजंग आणि मजलीस त्याचीच इच्छा बोलून दाखवित होते. छत्तारीच्या नबाबांच्या घराशेजारी असलेल्या पोलीस मंत्री ग्रिम्सनच्या घरावर हल्ला झाला त्याचे कारण तेच असावे.

या घटनेनंतर छत्तारीच्या नबाबांनी राजीनामा दिला. मात्र निजामाने तो लगेच मान्य केला नाही. 'ब्रिटीश मंत्र्याचे शिष्टमंडळ भारतात येणार आहे, म्हणून तुम्ही काही दिवस थांबा', असे त्याने नबाबांना सांगितले परंतु शेवटी १५ जुलै १९४६ रोजी सर अहमद सईद उर्फ छत्तारीचे नबाब हैदराबाद सोडून गेले.

एवढा प्रकार झाला तरी त्याच्यानंतर आलेल्या मिर्झा इस्माईलांची आठ नऊ महिन्यांची कारकीर्द संपताच पुन्हा छत्तारीचे नबाब निजामाच्या आग्रहाला बळी पडले व मिर्झा इस्माईलांच्या राजीनाम्यानंतर कोणी दुसरे योग्य माणूस मिळेना म्हणून छत्तारीच्या नबाबांनाच पुन्हा हैदराबादचे पंतप्रधान नेमण्यात आले. १९४७ च्या ऑक्टोबर महिन्यात छत्तारीचे नबाब वॉल्टर मॉक्टन व सर सुलतान अहमद अशा तिघांचे एक शिष्टमंडळ दिल्लीत नव्या स्वतंत्र भारताच्या सरकार बरोबर वाटाघाटी करीत होते. भारतीय बाजूने मान्य केलेला, हैदराबाद सरकारलाही मान्य झालेला एक सामिलनाम्याच्या कराराचा मसुदा घेऊन शिष्टमंडळ हैदराबादला आले होते. त्यांना निजामाची सही घेऊन सकाळी परत जावयाचे होते. निजामाने सकाळी सही करण्याचे कबूल केले होते. परंतु २८ ऑक्टोबर १९४७ रोजी पहाटे तीन वाजता पंचवीस-तीस हजारांच्या जमावाने छत्तारी व इतरांच्या निवासस्थानाला गराडा घातला व त्यांना दिल्लीस जाऊ दिले नाही. शिष्ट मंडळाच्या तिन्ही सभासदांना निजामी फौजेतील एका ब्रिटीश अधिकाऱ्याच्या जवळच असलेल्या घराचा आसरा घ्यावा लागला. मात्र यावेळी कोणाला शारीरिक दुखापत झाली नाही. दुसऱ्या दिवशी निजामाने सही करण्यास नकार दिला व शिष्टमंडळच बदलून टाकले. यानंतर महिन्याभरात छत्तारीच्या नबाबांनी दुसऱ्यांदा हैदराबादचे पंतप्रधानपद सोडून प्रयाण केले.

◆ ◆ ◆

१५

लढ्याचे दुसरे पर्व

दुसरे महायुद्ध भारताच्या दाराशी आल्यावर भारतीयांच्या सहकार्याची विशेष गरज ब्रिटिश सरकारला वाटू लागली व युद्ध संपताच घटनासमिती नेमून भारताला वसाहतीचे स्वराज्य दिले जाईल असे त्यांनी जाहीर केले. ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्या ११ मार्च १९४२ च्या या संबंधीच्या घोषणेत भारतातील मुस्लिम अल्पसंख्यांकाच्या विशेष स्थानाची दखल घेतल्याबद्दल निजामाने ब्रिटिश सरकारचे आभार मानले. मात्र जेव्हा घटनासमिती नेमण्यात आली तेव्हा त्यावर आपले प्रतिनिधी निजामाने कधीच पाठवले नाहीत. हैदराबाद संस्थानातील घटनात्मक सुधारणा सुचवण्यासाठी आरवमदु अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल युद्ध चालू असल्याचे कारण दाखवून निजामाने बासनात बांधून ठेवला होता. त्यात काही फेरफार करुन कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या. विशिष्ट किमान जमीनधारणा असणाऱ्या व विशिष्ट मूल्यांकन असणाऱ्या घराचे मालक व विशिष्ट किमान भाडे देणाऱ्या भाडेकरुंनाच मताधिकार होता. प्रत्येक जिल्ह्यातून अेक हिंदू व अेक मुस्लिम निवडून येणार असला तरी इतर मतदारसंघातील नेमणुकातून मुस्लिमच कायदेमंडळावर येतील अशी तरतूद मजलीस इत्तेहादुल मुस्लमीनच्या नेत्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे करण्यात आली होती. निवडणुकावर स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बहिष्कार घातला होता व सुधारणा फेटाळल्या होत्या. कासिम रझवी हे बहुमतवाल्या मजलीसच्या विधिमंडळ पक्षाचे नेते निवडले गेले होते. हिंदू जागावर सरकारच्या पाठीराख्या स्वतंत्र उमेदवारांची निवड झाली होती. पंतप्रधानांची निवड विधीमंडळातून करण्याची आवश्यकता नव्हती व तो विधीमंडळाला जबाबदार असणार नव्हता. या जागेवर निजामाने उदारमतवादी राजकीय मुत्सद्दी म्हणून लौकिक असलेले सर मिर्झा इस्माईल यांची नेमणूक जीनांचा सल्ला डावलून केली. मात्र त्यांना अवघ्या दहा महिन्यात जावे लागले. त्यांच्याजागी इत्तेहादुल मुस्लमीनचे समर्थक व एक उद्योगपती मीर लायक अली यांची नेमणूक झाली.

स्टेट काँग्रेसवरील बंदी उठताच महाराष्ट्र परिषद, आंध्र महासभा व कर्नाटक परिषद या तिन्ही परिषदांचे विलीनीकरण काँग्रेस संघटनेत करण्याची कार्यवाही सुरू झाली, तसेच काँग्रेसच्या सभासद नोंदणीची मोहीम हाती घेण्यात आली. स्वातंत्र्य येणार व सत्तेचा रथ काँग्रेस संघटनेच्या मार्गावरून येणार, हे आतापर्यंत स्पष्ट झाले होते. मवाळ मंडळींनी आजवर आंदोलनात भाग घेण्याचे टाळले होते व सरकार आणि मुस्लिम नेतृत्त्व यांच्याबरोबर वाटाघाटी

करूनच पदरात पडेल त्यावर समाधान मानण्याचे त्यांचे धोरण होते. एम. नरसिंगराव, जी. रामाचारी, काशिनाथराव वैद्य, बी. रामकृष्ण राव, कोंडा व्यंकट रंगारेड्डी व डॉ. एम. चन्नारेड्डी हे या गटाचे म्होरके होते. काँग्रेसच्या धोरणाला मान्य नसलेल्या गोष्टीही यातील काहींनी गुप्तपणे बोलणी करून मान्य केल्या, असाही आरोप पुढे झाला. प्रारंभी या गटाने सभासद नोंदणीत बहुमत करण्याचा प्रयत्न करून काँग्रेस संघटनेवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यात अपयश येऊन स्वामीजीच अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर स्वामीजींच्या गटावर कम्युनिस्ट धार्जिणे असण्याचा आरोप या गटाने केला. पुढे कृषक मजदूर पार्टी नावाचा काँग्रेस अंतर्गत गट तयार झाला. आणि शेवटी समांतर काँग्रेसची स्थापना झाली.

हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पहिले आधिवेशन हैदराबाद शहरातील चिकडपल्ली भागात १६ ते १८ जून पर्यंत स्वामी रामानंद तीर्थांच्या अध्यक्षतेखाली झाली. जवळपास एक लाख लोक या अधिवेशनाला हजर होते. १९४२ च्या आंदोलनाच्या वेळी गोवालिया टँकवर झालेल्या अधिवेशनासारखेच वातावरण हैदराबादेत होते. या अधिवेशनापूर्वी पाच दिवस आधी ११ जून १९४७ रोजी आपण भारत वा पाकिस्तान मध्ये सामील न होता स्वतंत्र राहणार आहोत, अशी घोषणा करणारे एक फर्मान निजामाने प्रसिद्ध केले होते. 'आझाद हैदराबाद' ची ही घोषणा म्हणजे जनतेच्या स्वातंत्र्याकांक्षेवर बोळा फिरविणारे पाऊल होते. त्यामुळे स्टेट काँग्रेसच्या अधिवेशनात जनतेला निर्णायक लढ्याला तयार होण्याचे आवाहन करण्यात आले. संस्थानात ७ ऑगस्ट हा दिवस भारतीय संघराज्यात सामील होण्याचा निर्धार दिन म्हणून पाळण्यात आला. भारतभर स्वातंत्र्याचा जल्लोष चालू असताना नवा भारतीय ध्वज फडकवण्यावर संस्थानात बंदी घालण्यात आली. ती मोडून शेकडो ठिकाणी तिरंगा फडकवण्यात आला. शेकडो लोक तुरुंगात गेले.

अधिवेशन संपल्याबरोबर स्टेट काँग्रेसने संस्थानातील जातीय दहशतवादाला प्रतिकार करण्यासाठी लोकांचे मनोधैर्य वाढावे म्हणून सरहद्दीवर प्रतिकार शिबिरे उभारण्याचा निर्णय घेतला. संस्थानातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती फारच गंभीर झाली होती. बहादुरयारजंगांपेक्षाही कासिम रझवीचे नेतृत्व जास्त अविचारी होते. गणवेशधारी मुस्लिम स्वयंसेवकांची-रझाकारांची-संघटना फोफावू लागली होती. खेड्यापाड्यात लुटालूट व जाळपोळ चालू होती. अनेक ठिकाणी बलात्कार व खुनाच्या घटना घडत होत्या. संस्थानातील अनेक हिंदू कुटुंबे आश्रयार्थ संस्थानाबाहेर गेली तर भारतातील मुस्लिमांना आश्रयार्थ संस्थानात आमंत्रित करण्यात आले होते.

भारत व पाकिस्तान या दोन देशांची निर्मिती होणार हे स्पष्ट होताच संस्थानांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला. नव्याने स्थापन झालेल्या संस्थानी खात्याचे मंत्री सरदार

वल्लभभाई पटेल यांनी संस्थानिकांबरोबर बोलणी सुरु केली. काही संस्थानांनी खळखळ केली; परंतु भौगोलिक दृष्ट्या संलग्न असलेल्या एका संघराज्यात सामील होण्याव्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही, हे बहुतेकांच्या लक्षात आले. काही संस्थानिक स्वतंत्रपणे, तर काही आपले संघ करुन भारतात सामील झाले. अपवाद फक्त काश्मीर, हैदराबाद, त्रावणकोर, भोपाळ व जुनागड यांचा. ब्रिटिशांची सार्वभौम सत्ता निघून जाताच संस्थाने सार्वभौम बनतील, अशी यातील काहींची धारणा होती.

१९४६ मध्येच सर वॉल्टर मॉंक्टन यांची निजामाने आपले घटनाविषयक सल्लागार म्हणून नेमणूक केली होती. भारताचे होऊ घातलेले संघराज्य व हैदराबाद संस्थान यांच्या संबंधाबद्दलच्या वाटाघाटीत त्यांचा सल्ला घेतला जात असे. ११ जुलै १९४७ पासून या वाटाघाटी सुरू झाल्या. निजामाने आपल्याला स्वतंत्र वसाहतीचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली, ती माऊंटबॅटननी स्पष्टपणे फेटाळली होती.वाटाघाटीत हैदराबाद शिष्टमंडळाने वऱ्हाडचा प्रश्न उपस्थित केला. भारताचे भौगोलिक ऐक्य टिकविण्यास हैदराबादने साह्य केले, तर निजामाच्या काही मागण्यांचा सहानुभूतीने विचार शक्य आहे; असे भारतीय अधिकाऱ्यांनी सूचित केले. इतर संस्थानांपेक्षा हैदराबादला झुकते माप देण्याची तयारी भारत सरकारने दाखवूनही काही उपयोग झाला नाही. निजाम आपल्याच शिष्टमंडळाने मान्य केलेल्या गोष्टीही पुढे अमान्य करत असे. शेवटी २९ नोव्हेंबर १९४७ रोजी भारतातील ब्रिटिश सत्ता व निजाम यांचे जसे संबंध होते तसेच एक वर्ष मुदतीसाठी नव्या भारत सरकारचे निमाजाबरोबर असावेत असे मान्य करणारा 'जैसे थे' करार झाला.

या करारानंतर लगेच लायक अलींनी आपले मंत्रिमंडळ बनवले. त्यात सामील होण्यास स्टेट काँग्रेसने नकार दिला. त्या मंत्रिमंडळात मजलीस अित्तेहादुल मुस्लमीनच्या चार अधिकृत प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला. त्याशिवाय हिंदुंचे प्रतिनिधी म्हणून ज्यांना जनमानसात स्थान नव्हते, अशा जी. रामाचारी, जे. व्ही. जोशी, मल्लिकार्जुनप्पा तोडकरी व दलितांचे प्रतिनिधी बी. एस. व्यंकटराव यांचा समावेश करण्यात आला. रझाकारांचे अत्याचार थांबत नाहीत, हे दिसल्यानंतर पहिल्या तिघांनी थोड्याच काळात आपापल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

'जैसे थे' करारामुळे संस्थानांतर्गत परिस्थितीत कोणताच बदल झाला नव्हता. निजामाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात आलेल्या स्वतंत्र भारताचा ध्वज परकीय आहे म्हणून तो फडकविण्यास संस्थानात बंदी घातली व भारतीय चलन संस्थानात बेकायदा ठरवले होते. अनेक ठिकाणी तिरंगा फडकावून काँग्रेस कार्यकर्ते जेल मध्ये गेले. तर तिरंगा ध्वज असलेले रेल्वेचे डबे व संघराज्याची टपाल कार्यालये यावर रझाकारांनी हल्ले केले होते.

संस्थानातील हिंदु प्रजेला सन्मानपूर्वक जगणे अशक्य झाल्यावर आजवर अलिप्त असणाऱ्यांनाही या स्थितीचा विरोध करावा असे वाटू लागले. हैदराबाद शहरातील सुमारे शंभर वकीलांनी २५ फेब्रुवारी १९४८ रोजी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांना संस्थानातील बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थिती बद्दल एक निवेदन दिले व आपण न्यायालयावर बहिष्कार घालत असल्याचे जाहीर केले. सदाशिवराव महा, विनायकराव कोरटकर, गोपाळराव एकबोटे, रामचंद्रराव भादेकर वगैरेंनी प्लीडर्स प्रोटेस्ट कमिटी स्थापन करून न्यायालयात जाणे थांबवले व रझाकरांच्या अत्याचाराची माहिती गोळा करून ती भारत सरकारकडे पाठविली. संस्थानात शेतकऱ्यांकडून लेव्ही म्हणून जबरदस्तीने सरकार धान्य वसूल करीत असे. त्यात सरकारी नियम धाब्यावर बसवून अधिकारी मनमानी करून जुलूम करीत. त्याविरूद्ध शेतकऱ्यांना स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते संघटित करीत होते. शेवटच्या पर्वात स्वातंत्र्य आंदोलनात मोठ्या प्रमाणात ग्रामीण जनता उतरली, त्याचे हे ही एक कारण होते. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने दिगंबराव बिंदूच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कृतीसमितिने संस्थानाच्या सरहद्दीवर स्टेट कॉंग्रेस कार्यकर्त्यांची प्रतिकार शिबीरे संघटित केली होती. त्यातील कार्यकर्ते संस्थानात येऊन रझाकार केंद्रे व पोलिस ठाणी तसेच करोडगिरी (जकात)नाकी यावर हल्ले करीत. संस्थानातील जनतेचे मनोधैर्य वाढण्यास त्यामुळे मदत झाली. अशा मोहिमात अनेक रझाकार व पोलिस मारण्यात आले. त्याच बरोबर काही सैनिकही हुतात्मे झाले. ३० जानेवारी १९४८ रोजी चळवळीसाठी पैसा उपलब्ध व्हावा म्हणून नांदेड जिल्ह्यातील उमरी येथील हैदराबाद स्टेट बॅंकेच्या शाखेवर हल्ला करून ती लुटण्यात आली.

◆◆◆

१६

निजामाची दोन प्यादी

निजामी राजवटीच्या शेवटच्या पर्वात आपल्या राजकीय खेळात शेवटच्या निजामाने जी प्यादी वापरली, त्यात मीर लायक अली व कासीम रझवी हे दोन मुख्य होते. पहिले हैदराबादचे शेवटचे पंतप्रधान झाले. दुसऱ्याने धर्मवेडाने एका समाजाला बहकवले.

भारत सरकारबरोबर संस्थानच्या सामिलीकरणाबाबतच्या वाटाघाटीत पूर्वी कबूल केलेल्या गोष्टींनाही निजाम नंतर संमती देत नाही व रझाकारांचे मोर्चे घरावर दडपण आणण्यासाठी येतात, हे पाहून छत्तारीच्या नवाबांनी पंतप्रधानपदाचां राजीनामा दिला. २ नोव्हेंबर १९४७ रोजी छत्तारीच्या नवाबांचा राजीनामा निजामाने स्वीकारला व नव्या पंतप्रधानाचा शोध सुरु केला. निजामानेच उत्तेजन दिलेल्या रझाकार संघटनेचे व तिचे मूळ असलेल्या इत्तेहादूल मुस्लिमीन या राजकीय पक्षाचे बळ खूप वाढले होते. पंतप्रधान त्यांनाही आवडेल असाही हवा होता; परंतु भारताबाहेर वाटाघाटी करावयाच्या, बाहेरच्या जगाबरोबर संबंध स्थापित करावयाचे, तर त्याची बाह्य वर्तणूक तरी चांगली असावी लागणार होती, त्यामुळे आक्रमक भाषणे करणाऱ्या रझाकार नेत्याचा या जागेसाठी उपयोग नव्हता. संस्थानात जे काही थोडेफार उद्योग होते त्यात अनेक ठिकाणी भागीदारी असलेले एक उद्योगपती लायक अली यांची त्यासाठी निजामाने निवड केली. लायक अलीचे मेव्हणे मोईन नवाजजंग हे अगोदरच एक वरिष्ठ अधिकारी म्हणून सरकारशी संबंधित होते. ते इत्तेहादुल मुस्लमीनच्या वर्तुळातही होतेच. लायक अली हे रझाकार चळवळीला आर्थिक पाठबळ देणारे एक धनिक होते. त्यांना पंतप्रधान नेमण्याला रझवी व इतर नेत्यांचा संपूर्ण पाठिंबा होता.

२९ नोव्हेंबर १९४७ रोजी भारत व हैदराबाद यांच्यात स्वातंत्र्यापूर्वी होती तशीच स्थिती कायम ठेवण्याबाबत ' जैसे थे' करार झाला. पंतप्रधानपदाचा कार्यभार या सुमारास लायक अली यांनी स्विकारला. तत्पूर्वीच त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने सामील व्हावे असा प्रयत्न चालविला होता. संस्थानात चाललेल्या हिंदूंवरील अत्याचारावर पांघरुण घालण्यास व हैदराबादचे स्वतंत्र अस्तित्व निदान काही हद्दीपर्यंत मान्य करवून घेण्यास मंत्रिमंडळात कॉंग्रेस असणे उपकारक ठरणार होते. स्वामीजी तुरुंगात होते. तुरुंगात जाऊन लायक अलींनी त्यांच्या बरोबर बोलणी करण्याचा प्रयत्न केला. स्वामीजींनी स्पष्ट सांगितले की, अशा मंत्रिमंडळात स्टेट कॉंग्रेस कधीही सामील होणार नाही. ह्या बोलण्यात राज्याचे सचिव जहीर अहमद हेही लायक अली बरोबर असत. शिवाय हैदराबादचे एक हिंदू धनिक पन्नालाल पित्ती हेही लायक अली बरोबर एक-दोन वेळा तुरुंगात स्वामीजींना भेटण्यास

आले होते. अर्थात जबाबदार राज्यपद्धतीची व भारतात सामील होण्याची स्टेट काँग्रेसची मागणी मान्य होईपर्यंत स्टेट काँग्रेस मंत्रिमंडळात येणे शक्यच नव्हते. लायक अलीच्या गळाला एकच मासा लागला. ते म्हणजे स्वतःला काँग्रेस पुढारी म्हणवणारे मवाळ नेते जी. रामाचारी. लायक अलींनी १२ ऑक्टोबरला मंत्रिमंडळ तयार केले. त्यात रामाचारींचा समावेश झाला होता.

नव्यानेच अस्तित्वात आलेल्या पाकिस्तान जवळही विविध कामांसाठी योग्य माणसे उपलब्ध नव्हती. संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानच्या प्रतिनिधी मंडळाचे एक सदस्य म्हणून बॅ. जीनांशी पूर्व परिचय असलेल्या लायकअलींचा समावेश झाला होता. जीनांनी त्यांना या जबाबदारीतून मुक्त केल्यानंतर त्यांची हैदराबादचे पंतप्रधान म्हणून नेमणूक झाली. मार्च १९४८ मध्ये दिल्लीला वाटाघाटीसाठी गेलेले असताना लायक अली गुपचूप कराचीची वारी करुन आले व तेथे जीनांना ते भेटले. मात्र जीना आजारी असल्यामुळे या भेटीचा काहीच उपयोग झाला नाही.

भविष्यात काय वाढून ठेवले आहे याचा पूर्ण अंदाज लायकअलींना होता. ज्या वेळी निजामाने मोईन नवाज जंगांना बरीच मोठी रक्कम देऊन संयुक्त राष्ट्रसंघात भारताविरुद्ध तक्रार दाखल करण्यास पाठवले, तेव्हा लायक अलींनी आपल्या या मेहुण्याला त्याची बायको (म्हणजे लायक अलीची बहीण) व मुले यांना बरोबर घेऊन जाण्यास सांगितले. भविष्यात मोईन नवाजजंगांना कदाचित हैदराबादेत येताच येणार नाही याची स्पष्ट कल्पना लायक अलींना होती. मात्र संस्थानातील सर्वसामान्य मुस्लिमाला वस्तुस्थितीची जाणीव देण्याचे कर्तव्य त्यांना पार पाडावयाचे नव्हते.

कासिम रझवीची प्रतिमा क्रूर नेता अशी रंगवण्यात येते. खरी गोष्ट अशी आहे की, जेव्हा निजामाला मुस्लिमांच्या भावना भडकवण्याची व त्यांच्या संघटनेचा उपयोग करण्याची आवश्यकता निर्माण झाली तेव्हा निजामाने उत्तेजन देऊन निर्माण केलेले हे नेतृत्व होते. लातूर त्या वेळी उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुक्याचे गाव होते. या गावात वकीली करणाऱ्या रझवीने अलीगढला शिक्षण घेतले होते. मजलीस इत्तेहादुल मुस्लमीन या संघटनेला राजकीय स्वरूप देण्यात आले, तेव्हापासून कासिम रझवी या संघटनेशी संबंधित होता. हळूहळू आपले बळ वाढवत होता. शेवटी त्याने या संघटनेचे अध्यक्षपद हस्तगत केले.

बहादुरयारजंगांनी हैदराबादेतील प्रक्षोभक मुस्लिम जातीयवादाची मुहूर्तमेढ रोवली असली तरी त्यांचे वागणे-बोलणे यात एक खानदानी अदब होती. कासिम रझवीत तोही गुण नव्हता. अंगी दूरदृष्टी किंवा फारसे इतर कर्तृत्व नसलेल्या रझवीला फक्त भडक वक्तृत्वाची देगणी मिळाली होती. कासिम रझवीची काही भाषणे गाजली आणि वादाचा विषय झाली.

३१ मार्च १९४८ रोजी हैदराबादेत शस्त्र सप्ताहाचे उद्‌घाटन करताना तो म्हणाला "मुस्लिम सार्वभौमत्वाचे आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत हैदराबादचे मुस्लिम आपल्या तलवारी म्यान करणार नाहीत. एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात तलवार घेवून ते लढत राहतील". १२ एप्रिल रोजी केलेल्या भाषणात तो म्हणाला होता, "...तो दिवस दूर नाही. ज्या दिवशी बंगालचा उपसागर आमच्या सार्वभौम राजाचे पद प्रक्षालन करील आणि दिल्लीच्या लाल किल्यावर आसफजाही ध्वज फडकेल."

रझवी असे बोललेच नाहीत, असे हैदराबाद सरकारने सांगितले; पण ते खरे नव्हते. रझवींच्या अशा बेताल बडबडीने अविचारी लोकांची माथी भडकली व संस्थानात गुंडगिरी माजली. बहुसंख्य असलेली हिंदू जनता भयभीत झाली. अनेक खेड्यांवर रझाकारांनी हल्ले केले, लुटालूट व जाळपोळ केली. अनेक ठिकाणी दहशत बसविण्यासाठी खून करण्यात आले. अनेक बलात्कार झाले. औंढ्याच्या नागनाथाच्या यात्रेतील स्फोट, काँग्रेस कार्यकर्ते गोविंदराव पानसरे यांचा व शोएबुल्लाखान या स्वतंत्र वृत्तीच्या पत्रकाराचा खून यांनी या अत्याचारांवर कळस चढविला.

भारताचा नकाशा टेबलावर पसरून लष्करी चढाईच्या अव्वाच्या सव्वा गप्पा मारणारा रझवी भारतीय सैन्य हैदराबादेत पोचले तेव्हा युद्धाच्या आघाडीवर नव्हता. त्याला हैदराबादेत अटक करण्यात आली. त्याच्यावर चाललेल्या खटल्यांपैकी बिबिनगर स्टेशन व गावावर केलेल्या हल्याच्या प्रकरणी त्याला सात वर्षांच्या सक्त मजुरीची शिक्षा झाली. ती भोगून मुक्त झाल्यानंतर तो पाकिस्तानात गेला.

लायकअलींना पोलिस कारवाईनंतर घरीच नजर कैदेत ठेवण्यात आले होते. तेथून निसटून ते पाकिस्तानात पळून गेले. हजारो लोकांच्या छळाला जबाबदार असणारे लायक अली व कासिम रझवी हे दोघेही सुरक्षितपणे पाकिस्तानात गेले याबद्दल हैदराबाद संस्थानातील नागरिकांना तेव्हा दुःख वाटणे साहजिक होते. परंतु आज मात्र असे वाटते की झाले ते बरे झाले. ते भारतात राहिले असते तर कदाचित पुन्हा पुढारी होऊ शकले असते.

◆ ◆ ◆

१७
अखेरच्या पर्वातील दोन हुतात्मे

फॅसिस्ट मनोवृतीचे नेते विरोधकांचा आवाज बंद करण्यासाठी, त्यांच्यात दहशत निर्माण करण्यासाठी अनुयायांना हिंसाचाराची चिथावणी देतात तेव्हा जे घडते, त्याची उदाहरणे हैदराबाद स्वातंत्र्य आंदोलनानेही पाहिली. गोविंदराव विनायकराव पानसरे हे तरूण हैदराबाद स्टेट कॉंग्रसचे नांदेड जिल्ह्यातल्या मुधोळ तालुक्याचे पूर्ण वेळ संघटक म्हणून काम करीत होते. १४ ऑक्टोबर १९४६ रोजी कोंडलवाडी येथे एका सभेत पानसरे यांनी केलेले भाषण सरकारला आक्षेपार्ह वाटले, म्हणून हैदराबाद संरक्षण कायद्याच्या कलम ३३ व ३७ अन्वये त्यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. २१ ऑक्टोबर रोजी बिलोली येथील दंडाधिकाऱ्यांनी त्यांना जामिनावर सोडण्याचा हुकूम केला. सुटका झाल्यावर त्यांना न्यावयास आलेल्या कार्यकर्त्यांबरोबर एका बैलगाडीतून पानसरे बिलोलीहून कोंडलवाडीकडे निघाले. बिलोली-कोंडलवाडी अंतर सहा किलोमीटर आहे. वाटेत अर्जापूर लागते. अर्जापूरच्या माळावर त्यांना एका रझाकार टोळीने अडविले. 'तुमच्यात पानसरे कोण ?' असा प्रश्न त्या सशस्त्र टोळीने विचारला. उत्तर यायच्या आत पानसरे व त्यांचे एक सहकारी पुंडलिक पाटील यांच्यावर तलवारीचे वार सुरु झाले. पानसऱ्यांनी ओरडून सांगितले, की 'मी पानसरे आहे, तुम्हाला मला मारायचे असेल तर मारा.' त्यामुळे पुंडलिक पाटलावरचे वार थांबले; पण पानसऱ्यांचे शिर क्षणार्धात धडावेगळे करण्यात आले. पानसऱ्यांच्या खुनानंतर त्यांचा दहनविधी ताबडतोब उरकून घेण्यात आला.

निजाम कॉलेजमध्ये इंटरच्या वर्गात असताना देशसेवेच्या प्रेरणेने पानसऱ्यांनी शिक्षण सोडून दिले होते. निजामी अधिकारी व रझाकार यांच्या जुलमाविरुद्ध गांधीवादी पद्धतीने ते हैदराबादचे पंतप्रधान व ब्रिटिश रेसिडेंट यांना पत्र लिहून आपला निषेध व्यक्त करीत. नांदेड व शेजारच्या निजामाबाद या दोन्ही जिल्ह्यात पानसऱ्यांनी कॉंग्रेसची जोरदार संघटना बांधली व अन्यायाच्या प्रतिकारासाठी कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवले. पानसऱ्यांच्या खुनाची स्वाभाविकपणे तीव्र प्रतिक्रिया झाली. दुसऱ्याच दिवशी खून झाला त्या जागी काही लोक जमले व त्यांनी काही दगड एकत्र करुन त्यावर चार पत्र्यांचे आच्छादन उभारले. तेथील जागेची पूजा केली. खून झाला तो वार सोमवार होता. दर सोमवारी शेकडो लोक तेथे जमू लागले. मंत्रिमंडळाकडे या प्रकारचे अहवाल गेल्यावर तेथे असा निर्णय झाला की, हे तात्पुरते स्मारक काढून टाकावे. कारण असे देण्यात आले की, जेथे स्मारक उभारले आहे, ती जागा खाजगी असून, ती एका मुसलमानाच्या मालकीची आहे.

६ जानेवारी १९४७ रोजी सोमवार होता. या दिवशी पानसरे यांचा खून झाला त्या जागी सुमारे चाळीस हजार लोक बंदी हुकूम मोडून जमले होते. तेथे सभा घेण्यासाठी स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते अनंत भालेराव, रघुनाथ रांजणीकर, विठ्ठलराव रत्नाळीकर वगैरेंनी तयारी केली होती. पानसऱ्यांचा आत्मा दर सोमवारी तेथे येतो अशा अफवा पसरल्या होत्या. त्याचे निराकरण करावे, अंधश्रद्धांना विरोध करावा व पानसरे यांच्या मृत्यूचा खरा अर्थ लोकांना समजावून सांगावा या उद्देशाने सभा घेण्यात येणार होती. ध्वनीक्षेपक सुरु करण्यात आला होता. विठ्ठलराव रत्नाळीकर काही राष्ट्रीय गीते म्हणू लागले होते. एवढ्यात बिलोलीचा फौजदार झैदी वीस सशस्त्र पोलीसांच्या तुकडीसह एका पोलिस व्हॅन मधून तेथे आला व त्याने कोणतीही पूर्वसूचना न देता गोळीबार सुरु केला. या गोळीबाराने लोक सैरावैरा धावत सुटले. गोळीबारात तीन जण ठार व पाच जखमी झाले. ज्या ठिकाणी पानसरे यांचा खून झाला व नंतर गोळीबारात तीन माणसे मरण पावली, त्या ठिकाणी आता पानसरे यांच्या नावाने एक महाविद्यालय चालते आहे.

दुसरे उदाहरण शोएबुल्लाखानांचे आहे. हैदराबाद मधील बहुतेक उर्दू वृत्तपत्रे मजलीसे इत्तेहादुल मुस्लमीनची व रझाकारांची तळी उचलून धरीत होती व जातीय राजकारणाला प्रोत्साहन देत होती. त्या वेळी जी थोडी उर्दू नियतकालिके विरोधाचा सूर काढण्याचे धैर्य दाखवत होती, त्यात मुल्ला अब्दुल बासित यांचे 'खादिम', एम. नरसिंगराव यांचे 'रय्यत' व शोएबुल्लाखानांचे 'इमरोज' यांचा समावेश होता. 'खादिम' व 'रय्यत' यांची भाषा अत्यंत मवाळ असे. मुसलमानांनाच राज्य करण्याचा अधिकार आहे, या सिद्धांताचा विरोध करुन जबाबदार राज्यपद्धतीचा पुरस्कार 'इमरोज' करीत असे. पुढे हैदराबादचे पहिले लोकनियुक्त मुख्यमंत्री झालेले बी. रामकृष्णराव यांनी प्रामुख्याने 'इमरोज' काढण्यास मदत केली होती.

संस्थानात जे चालले होते, ते सर्वच मुसलमानांना पसंत होते असे नाही. बहुसंख्य जरी जातीय भावनेच्या आहारी गेले तरी काही लोकांच्या सद्सद्विवेक बुद्धिची टोचणी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. कंधार तालुक्याचे तहसीलदार फरीद मिर्झा यांनी रझाकारांचे लोहा गावात झालेले अत्याचार व अधिकाऱ्यांचे त्यांना असलेले पाठबळ न पाहवून १५ जुलै १९४८ रोजी आपल्या नोकरीचा राजिनामा दिला. निजामाने स्वतंत्र राहण्याची कल्पना सोडून देवून भारतीय संघराज्यात सामील व्हावे अशी मागणी करणारे पत्रक सात मुस्लिमांनी १३ ऑगस्ट १९४८ रोजी काढले. त्यावर सेवानिवृत्त मुख्य अभियंता अहमद मिर्झा, सेवानिवृत्त शिक्षण संचालक महंमद हुसेन जाफरी, एक जहागिरदार नवाब मंजूरजंग, पुढे काँग्रेसचे खासदार झालेले बाकर अली मिर्झा, माजी तहसिलदार फरीद मिर्झा, खादिम चे संपादक मुल्ला अब्दुल बासित व सेवानिवृत्त लेखापरिक्षक एच. के. मुनीम या सात लोकांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या.

या पत्रकावर आपली प्रतिक्रिया कासिम रझवीने १८ ऑगस्टच्या भाषणात व्यक्त केली. मिर्झा इस्माईल, दिल्लीत निजामाचे एजंट जनरल म्हणून ज्यांनी काम केलेले ते मवाळ प्रवृत्तीचे झैन यारजंग, मंजूरजंग वगैरे मुस्लिम हे फितूर असून मुस्लिमांची सत्ता व त्यांचा स्वाभिमान या विरुद्ध उठणारा प्रत्येक हात कलम केला पाहिजे असे त्याने सांगितले. अनेक रझाकार पुढाऱ्यांनी, 'पत्रकावर सही करणाऱ्या पेन्शनरांच्या पेन्शनी बंद करा व त्यांना मृत्यू दंडाची शिक्षा द्या', अशी पत्रके काढली. सरकारने पत्रकावर सह्या करणाऱ्यांपैकी चार पेन्शनरांना *'तुमचे पेन्शन बंद का करु नये याची कारणे दाखवा'* अशी नोटीस बजावली.

२२ ऑगस्ट १९४८ रोजी पहाटे दोन वाजता 'इमरोज' च्या कार्यालयातील आपले काम आटोपून घरी परत निघालेला तरूण पत्रकार शोएबउल्लाखान व त्याच्या बरोबरचा त्याचा मेहुणा या दोघांवर गुंडांनी हल्ला केला. शोएबचे हात अगोदर तोडण्यात आले व नंतर त्याचा प्राण घेण्यात आला. आपल्या विरूद्ध मत व्यक्त करणाऱ्याचे काय होते, हे फॅसिस्ट धर्मवेड्यांनी दाखवून दिले होते. या खुनाबद्दलही कासिम रझवीवर पुढे खटला भरण्यात आला होता. परंतु अपिलात त्याची सुटका झाली. शोएबुल्लाचे वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठीचे बलिदान हे हैदराबाद स्वातंत्र्य लढ्याच्या यज्ञातील शेवटच्या समिधांपैकी एक होते. त्यानंतर थोड्याच दिवसात १३ सप्टेंबर रोजी भारतीय फौजांनी पोलिस कारवाई सुरू केली व हैदराबादेतील जुलमी राजवट नंतरच्या चार दिवसात कोसळली.

◆◆◆

१८

वऱ्हाडचा तिढा

अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या चार जिल्हयात विभागलेला विदर्भ एकेकाळी निजामाच्या राज्याचा भाग होता. निजामाला 'हैदराबाद व वऱ्हाडचे निजाम' असे म्हणण्यात येत असे. चौथाई व सरदेशमुखी वसुल करण्याच्या आपल्या अधिकारासाठी मराठे निजामी मुलखावरही चढाया करीत. या हल्ल्यांनी हैराण झालेल्या निजामाने १७९८ मध्ये ब्रिटीशांचे मांडलिकत्व पत्करणारा करार केला.या करारान्वये फ्रेंच सेनापतींनी निजामाच्या सैन्यात प्रशिक्षित केलेली पलटण विर्सजित करण्यात आली व ब्रिटीश सेना सिकंदराबाद जवळ बोलारम येथे राहू लागली. या फौजेच्या खर्चासाठी दरवर्षी चौतीस लक्ष रूपये देण्याचे निजामाने कबूल केले. ज्या मराठ्यांच्या धास्तीने निजामाने हा करार केला, त्या मराठ्यांचे राज्य हा करार झाल्यानंतर वीस वर्षातच बुडाले व निजामाला संरक्षणाची गरजच राहिली नाही. पण करार व त्यामुळे निर्माण झालेले दुष्परिणामांचे चक्र चालूच राहिले.

हैदराबादेतला ब्रिटीश रेसिडेंट हेन्री रसेल याने १९१२ मध्ये हैदराबादेत एक ब्रिगेड उभारण्याला प्रारंभ केला. इंग्रज अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली राहणाऱ्या या सैन्याच्या तुकडीचा खर्च मात्र निजामाकडून वसूल करण्यात येणार होता. निजामाच्या तथाकथित संरक्षणासाठी उभारलेल्या या सैन्याचा खर्च निजामाला देता आला नाही. तो देता यावा म्हणून दयाळू इंग्रजांनी स्वत:च 'पामर ॲण्ड पामर' या नावाची कंपनी स्थापन करून तिच्या तर्फे निजामाला कर्ज दिले व त्यातून देण्याची फेड करून घ्यावयाची, असे ठरले. या कर्जाला दरवर्षी साडेतेहतीस टक्के व्याज होते. असले व्याज असलेले कर्ज फिटणे शक्यच नव्हते. तेव्हा २१ मे १८५३ रोजी निजाम व रेसिडेंट कर्नल लो यांनी एक करार केला. या करारान्वये अठ्ठेचाळीस लक्ष रूपयांच्या बाकी पोटी वऱ्हाड आणि आज कर्नाटकात असलेल्या कृष्णा व तुंगभद्रा यांच्या दरम्यानचा दुआबाचा प्रदेश निजामाने इंग्रजांना दिला. या प्रांताच्या व्यवस्थापनातून राहिलेल्या नफ्यातून निजामाकडील बाकी इंग्रजांनी वसूल करावयाची होती व कर्ज फिटल्यानंतर निजामाचा मुलुख निजामाला परत करावयाचा होता. हा करार निजामावर प्रचंड दडपण आणून करण्यात आलेला होता. रेसिडेंट कर्नल लो यांचा दुय्यम मेजर डेव्हिडसन याने निजामाच्या दिवाणास अशी धमकी दिली होती,की पुण्याहून इंग्रज सेना निघाली आहे व या करारावर सही न केल्यास ती राजधानीत शिरेल.

करारात काहीही म्हटले असले, तरी मॅंचेस्टरच्या कापड गिरण्यांना कापसाचा हुकमी

पुरवठा करणारा वऱ्हाड निजामाला परत द्यावयाची इंग्रजांची बिलकुल इच्छा नव्हती. त्यामुळे खरे हिशेब ठेवलेही नाहीत व कोणी दाखविलेही नाहीत. दुआबाचा (रायचूर व गुलबर्गा जिल्ह्याचा) प्रदेश पुढे प्रयत्नपूर्वक निजामाला परत मिळाला परंतु वऱ्हाड मात्र निजामाचे संस्थान नष्ट होईपर्यंतही त्याला परत मिळू शकला नाही. १९३५ च्या भारत सरकार कायद्यान्वये मध्य प्रांताबरोबर सलग्न असलेल्या वऱ्हाडबद्दल काही कायदेशीर तरतूद करून वऱ्हाड व मध्यप्रांताचा एकच प्रांत घोषित करणे आवश्यक होते. त्यासाठी ब्रिटीश अधिकारी व निजामाचे प्रतिनिधी यांच्यात १९३६ मध्ये एक करार झाला. या करारान्वये वऱ्हाडच्या राजधानीत (अमरावतीला) विभागीय कार्यालयावर इंग्रजांच्या युनियन जॅक बरोबर निजामाचा पिवळा ध्वजही फडकवला जाईल, निजामाच्या मोठ्या मुलाला 'वऱ्हाडचा राजपुत्र' असा 'खिताब' देण्यात येईल व मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांताचा गव्हर्नर नेमताना निजामाबरोबर सल्लामसलत करण्यात येईल, असे ठरले. हा करार म्हणजे वाढे देऊन वेडे समजावले या म्हणीप्रमाणेच होता. या करारामुळे वऱ्हाड हा कायदेशीररित्या मध्यप्रांताचा भाग झाला व निजामाच्या पदरात फक्त एक खिताब पडला. मात्र या करारामुळे स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा एक अनपेक्षित अडचण उभी राहिली.

१५ ऑगस्ट १९४७ पासून मंगळदास पक्वासा यांची मध्यप्रांत व वऱ्हाडचे राज्यपाल म्हणून नेमणूक होणार होती. ही नेमणूक व्हाईसरॉयच्या शिफारशीवरून इंग्लडची राणी करणार होती. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी मुद्दा उपस्थित केला की, या नेमणूकीला निजामाची संमती हवी. निजाम व भारत सरकार यांचे संबंध तर फारच तणावाचे झाले होते. शेवटी माऊंटबॅटन यांनी राणीला असे कळविले की, निजामाशी त्यांनी तोंडी सल्लामसलत केली आहे. (खरे खोटे देव जाणे!) व त्यानंतर पक्वासांच्या नेमणुकीवर सही झाली. भारत स्वतंत्र होताना आपल्यालाही स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहत यावे, असा प्रयत्न निजामाने सुरू केला होता. 'वऱ्हाड आता मला परत द्या', अशी मागणी त्याने सुरू केली. १९४५ पासून निजामाला पाठिंबा देणाऱ्या मजलिसे इत्तेहादुल मुस्लमीनसारख्या संघटना ही मागणी करीत होत्या. वऱ्हाड परत मिळवायचा असेल, तर त्यासाठी वऱ्हाडातल्या लोकांची थोडीतरी अनुकूलता हवी त्यासाठी आपला राजपुत्र व पंतप्रधान सर मिर्झा इस्माईल यांना निजामाने वऱ्हाडचे दौरे करावयास पाठवले. अमरावतीच्या पंजाबराव देशमुखांच्या शिवाजी शिक्षण संस्थेला व खामगावच्या अंजुमन इस्लामिया हायस्कूलला निजामाने थोडी मदत दिली होती. या संस्थांना राजपुत्राच्या (ज्याला वऱ्हाडचा राजपुत्र असा 'खिताब' होता) व पंतप्रधानाच्या भेटी झाल्या. याकाळात वऱ्हाडचे नेते, निजामाच्या संस्थानात आपल्याला पुन्हा ढकलण्यात येऊ नये, अशी मागणी करीत होते. वऱ्हाडचे राजपुत्र व मिर्झा ईस्माईल यांच्या भेटीमागे

पाठींबा मिळविण्याचा निजामाचा हेतू आहे, अशी त्यांना शंका होती. ब्रिजलाल बियाणी, वीर वामनराव जोशी वगैरेंनी वल्लभभाईंना पत्रे लिहिली. शंकरराव देव तेव्हा आखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस होते.ते वल्लभभाईंचा निरोप घेवून पंजाबरावांना भेटले. पंजाबराव देशमुखांनी वल्लभभाईंना लिहिले की, वऱ्हाड निजामाला परत देण्यास त्यांचा पाठिंबा नाही व राजपुत्र व पंतप्रधान यांच्या भेटी पूर्वीच्या संबंधामुळे व औपचारिक होत्या. हैदराबाद सरकारने शिक्षण संस्थेला मदत दिली होती. त्यामुळे औपचारिक भेटीच्या वेळी मला हजर रहावे लागले.

शेवटचे निजाम मीर उस्मानअली खान आणि त्यांची पत्नी दुल्हन पाशा यांना दोन मुले व एक मुलगी होती. वडील मुलगा मीर हिमायतअलीखान उर्फ आजमजाह याला १९३६ च्या उपरोल्लेखित करारान्वये 'वऱ्हाडचा राजपुत्र' असा खिताब इंग्रजांनी दिला होता. फेब्रुवारी १९०७ मध्ये त्याचा जन्म झाला होता. वऱ्हाडचा हा राजपुत्र निजामाच्या सैन्याचा नामधारी प्रमुख असे. वर्षातून एकदा होणाऱ्या समारंभी संचलनात उपस्थित राहून सलामी घेण्याव्यतिरिक्त त्याचा सैन्याशी फारसा संबंध नव्हता. राज्यकारभारातही त्याचा काही भाग नव्हता. आपल्या या मुलाशी उस्मानअलीचेही फार सलोख्याचे संबंध नव्हते. पितापुत्रांचे सरळ संभाषणही होत नसे.

सध्या आंध्र प्रदेशाचे राजभवन आहे ती इमारत 'शहा मंजिल' निजामाच्या राज्यात पंतप्रधानांचे निवासस्थान होती. त्याच रस्त्यावर बेला व्हिस्टा नावाची एक इमारत आहे. या इमारतीत सध्या 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया' आहे. पूर्वी ही इमारत प्रिन्स ऑफ बेरार मीर हिमायत अलीखान ऊर्फ आजमजाह यांचे निवासस्थान होती. त्याचे लग्न शेवटच्या तुर्की सम्राटाची मुलगी राजकन्या दुर्रे शाहवार हिच्याशी १९३१ मध्ये झाले होते. राजपुत्राच्या बाहेरख्याली वृत्तीमुळे राजकन्या दुर्रे शाहवार त्याला सोडून विभक्त राहू लागली. अखेर बेला व्हिस्टा हे विलासाचा रंगमहाल बनले. १९५६ मध्ये या इमारतीतून तेथील स्त्रियांना बाहेर काढून ती रिकामी करुन घेण्यात आली. १९५७ मध्ये तेथे सरकारी अतिथिगृह झाले व नंतर तेथे अधिकारी प्रशिक्षणासाठीचे महाविद्यालय सुरू झाले.

वऱ्हाडच्या राजपुत्राचे नशीबच वाईट असावे. ज्या वऱ्हाडचे नाव त्याने मिरवले तो वऱ्हाड त्याला कधीच मिळाला नाही. वडील दीर्घायुषी झाल्यामुळे तो निजाम झाला नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर नामधारी निजामपदही त्याला मिळाले नाही. उस्मानअली खान १९६४ मध्ये आजारी पडले. त्यांचा अंतकाळ जवळ आला असे वाटून भारत सरकारला वऱ्हाडच्या राजपुत्रानी पत्र लिहिले, की त्यांच्या मृत्यूनंतर त्याला म्हणजे राजपुत्र हिमायत अली याला आठवा निजाम म्हणून मान्यता द्यावी. भारत सरकारने कळवले की, आपला उत्तराधिकारी

सातव्या निजामाने सुचवावयाचा आहे. या उत्तराची प्रत उस्मान अलीलाही पाठवण्यात आली. ती वाचल्यावर संतापलेल्या निजामाने आपल्यामागे आपल्या मुलाऐवजी वऱ्हाडच्या राजपुत्राचा मुलगा व आपला नातू राजपुत्र मुकर्रमजाह याला आपला वारस नेमावे, असे दिल्लीला कळवले. १९६७ मध्ये शेवटच्या निजामाचा देहांत झाल्यावर मुकर्रमजाह यास वारस जाहीर करण्यात आले. नऊ ऑक्टोबर १९७० रोजी वयाच्या बासष्ठाव्या वर्षी वऱ्हाडच्या राजपुत्राचे निधन झाले.

◆ ◆ ◆

१९
आजाद हैदराबाद रेडिओ

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत गुप्तपणे चालवल्या गेलेल्या नभोवाणी केंद्राचे एक विशेष स्थान आहे. वृत्तपत्रावरील बंधने असतील आणि भूमिगत कार्यकर्ते उघडपणे जाहीर सभा घेऊ शकत नसतील तर लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांना चळवळीची माहिती देण्यासाठी दोन साधने त्यावेळी उपलब्ध होती. एक तर प्रसिद्धीपत्रके गुप्तपणे छापून किंवा चक्रमुद्रीत करून ती वाटणे, व दुसरे म्हणजे एखादे छुपे नभोवाणी केंद्र चालवणे. त्या वेळी रेडिओ फार कमी होते. तसेच या छुप्या स्वतंत्र केंद्राची प्रक्षेपणशक्तीही काही वेळा कमी असे. परंतु या सगळ्यात एक प्रकारचे धाडस, थ्रिल होते. एखाद्या नेत्याचा प्रत्यक्ष आवाज ऐकणे किंवा चळवळीची खात्रीलायक माहिती एखाद्या कार्यकर्त्याच्या तोंडून अशा नभोवाणी केंद्रावर ऐकणे, हा एक रोमांचकारी अनुभव असे. एका माणसाने जरी या केंद्रावरचे कार्यक्रम ऐकले तरी तो त्यावरचा संदेश इतरांना सांगे. लोकांचे मनोधैर्य टिकण्याला अशा केंद्रांची मदत होई.

१९४१ मध्ये सुभाषचंद्र बोस भारतातून निसटून जर्मनीत आल्यानंतर 'आझाद हिंद रेडीओ' बर्लिनमधून चालविण्यात येई. रोज प्रथम पाऊणतास व नंतर तीन तास प्रक्षेपण या केंद्रावरून होई. आठ नऊ भारतीय भाषात हा कार्यक्रम होई. या केंद्रावरून नेताजींचा आवाज ऐकणे म्हणजे भारतातल्या ब्रिटीशसत्तेविरूद्धचा संघर्ष जागता ठेवण्याची एक प्रेरणा होती. १९४२ मध्ये 'चलेजाव' घोषणेनंतर काँग्रेस मधील समाजवाद्यांनी भूमिगत चळवळ चालविली. त्यात डॉ. राम मनोहर लोहियांच्या प्रेरणेने मुंबईत चौपाटीजवळच्या 'सी व्ह्यू' इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावर एक प्रक्षेपक उभारण्यात आला होता. विठ्ठल जव्हेरी व उषा मेहता वगैरेंनी हे केंद्र चालविले. यावरून लोहिया व अच्युतराव पटवर्धन यांची भाषणेही प्रक्षेपित झाली. या केंद्राच्या जागा नंतर वेळोवेळी बदलण्यात आल्या. शेवटी नोव्हेंबर १९४२ मध्ये पोलिसांना या गुप्त प्रक्षेपकाची जागा शोधण्यात यश आले व केंद्र बंद पडले.

हैदराबादच्या स्वातंत्र्य चळवळीतही भूमिगत चळवळीचा एक भाग म्हणून काही गुप्त नभोवाणी केंद्र चालविण्याचे ठरले. मुंबईत बोरिवलीत तेव्हा विरळ वस्ती होती. अगदी पलिकडच्या बंगल्यात असलेला एक प्रक्षेपक धीरूभाई दोशी या गृहस्थांनी रोज ठराविक काळ भाड्याने देण्याची तयारी दर्शविली. लढ्यातील एक नेते स. कृ. वैशंपायन यांनी हा प्रक्षेपक पुरेसा शक्तीशाली असल्याची खात्री करून घेतली. दोशींनी फारसे भाडे घेतले

नाही. मात्र अट घातली, की जेवढा वेळ तुम्हाला दिला आहे तो वगळता या इमारतीत कोणी यायचे नाही. ही अट गुप्तता राखण्यासाठी आहे, असे हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना वाटले. नभोवाणी केंद्र सुरू झाले.

हैदराबाद स्टेट काँग्रसने लढ्याच्या नियोजनासाठी जी कार्यालये १९४७-४८ मध्ये चालविली त्यात मुंबईच्या सि. पि. टँक भागात एका धर्मशाळेच्या वरच्या मजल्यावर एक होते. या कार्यालयात स.कृ. उर्फ भाऊसाहेब वैशंपायन हे जेष्ठ नेते असत व त्यांना लढ्याच्या प्रसिद्धीच्या कामात नांदेड जिल्ह्यातील लाठ गावाचे मूळ रहिवासी असलेले पद्माकर लाटकर हे तरूण कार्यकर्ते मदत करीत. लाटकरांचे मुख्य काम लढ्याच्या बातम्या संकलित करणे व त्या चक्रमुद्रित करून ती वार्तापत्रे मुंबईतील प्रमुख दैनिकांना पुरविणे हे होते. या कामातून ते संध्याकाळी मोकळे होत. पद्माकर लाटकरांना लहानपणांपासून नाटकाचा नाद होता. त्यांनी अनेक नाटकात कामेही केली होती. आवाजही बऱ्यापैकी होता. त्यामुळे नभोवाणीवर निवेदनाचे व कार्यक्रमात बातम्या सांगण्याचे काम त्यांनीच करावे असे ठरले.

प्रक्षेपक दररोज पाऊण तास वापरण्यासाठी मिळाला होता. सायंकाळी साडेसात ते सव्वाआठ या काळात लाटकर प्रक्षेपण करू लागले. प्रारंभी 'यह आजाद हैदराबाद रेडिओ है', अशी हिंदीत घोषणा होई व नंतर हिंदीत -मराठीत बातम्या सांगत. उरलेल्या वेळात लढ्यातील एखादी घटना ध्वनीचा परिणामकारक उपयोग करून ते रंगवून सांगत. शेवटी एखादे राष्ट्रीय गीत म्हणत. साथीला कोणी नाही, ध्वनीमुद्रिका वाजविण्याची सोय नाही, अशा परिस्थितीत हे केंद्र चालविले गेले; परंतु तरीही त्याला खूपच प्रतिसाद मिळाला. संस्थानातील जनतेला लढ्याची खरी माहिती मिळायला या प्रक्षेपणामुळे मदत झाली.

हे नभोवाणी केंद्र पाच - सहा महिने चालले. एके दिवशी स्टेट काँग्रेसच्या मुंबई कार्यालयात मुंबई गुप्त पोलिसांचा एक निरीक्षक आला. त्याने विचारले "पद्माकर लाटकर कोण आहेत ?" लाटकरांनी उत्तर दिल्यानंतर त्याने सांगितले, "तुम्ही आजाद हैदराबाद नभोवाणी कुठून चालविता हे सर्व आम्हाला माहित आहे. याच प्रक्षेपकावरून तस्करीसाठी आवश्यक ती माहिती दिली जाते, असे आम्हास कळले आहे. म्हणून या ठिकाणावर आम्ही तीन-चार दिवसात छापा घालणार आहोत. त्यावेळी तुम्ही तेथे सापडणे बरे नाही. तसेच तेथे आम्हाला हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या लढ्याशी संबंधित कागदपत्रेही सापडू नयेत. त्यामुळे तुम्ही आज सायंकाळी प्रक्षेपण करून परत येताना तुमचे सर्व कागदपत्र अगदी चिट्ठी चपाटीसुद्धा गोळा करून आणा व परत तेथे जाऊ नका". पद्माकर लाटकरांनी तेथून सर्व कागद हलविले व नंतर पोलिसांनी दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावर फोन करून कागदपत्रे हलवल्याची सूचना दिली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी बोरीवलीतील निर्जन भागातील त्या

इमारतीवर पोलिसांनी धाड घालून तो प्रक्षेपक ताब्यात घेतला.

हैदराबाद संस्थानाला लागून असलेल्या त्यावेळच्या मद्रास प्रांताच्या हद्दीत आणखी एक नभोवाणी केंद्र सुरू करण्यात आले होते. ४१.२७ लघुलहरीवरून त्या केंद्राचे प्रक्षेपण होई People's Radio, Hyderabad अशी घोषणा करून इंग्रजी व हिंदीत कार्यक्रम प्रसारित करण्यात येत. रात्री साडेआठ ते पावणे नऊ हिंदीत व पावणे नऊ ते नऊ वाजेपर्यंत इंग्रजीत कार्यक्रम होत. मुख्य भर संस्थानातील स्वातंत्र्य चळवळीतील घटना, सरकार व रझाकारांचे अत्याचार यांच्या बातम्यांवर असे .

एम. टी. राजू नावाचे एक भारतीय नागरी सेवेतील अधिकारी भारताचे हैदराबादेतील एजंट जनरल कन्हैयालाल मुन्शी यांचे चिटणीस म्हणून हैदराबादेत होते. त्यांच्याकडे हैदराबादचे गृहसचिव जहीर अहमद यांनी या गुप्त नभोवाणी केंद्राबाबत तक्रार केली. या प्रक्षेपणात निजाम, हैदराबाद संस्थान व तेथील मुसलमान यांच्या विरूद्ध प्रक्षोभक प्रचार केला जातो, असे त्यांचे म्हणणे होते. ही नभोवाणी केंद्रे बंद करण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी केली.

डिसेंबर १९४७ च्या प्रारंभापासून मे १९४८ च्या मध्यापर्यंत मुंबईतले व जानेवारी १९४८ ते सप्टेंबर १९४८ पर्यंत पूर्व सरहद्दीवरचे, अशी ही दोन केंद्रे चालली. स्वातंत्र्याच्या लढ्याच्या इतिहासाला त्यांनी आणखी एक पान जोडले.

◆ ◆ ◆

२०

राज्यविस्ताराचे आणि शस्त्रसंपादनाचे प्रयत्न

भारत आणि पाकिस्तान अशी दोन संघराज्ये निर्माण होण्याचे निश्चित होताच आपण यापैकी कोणत्याही एका संघराज्यात सामिल न होता स्वतंत्र राहणार असे निजामाने ११ जून १९४७ रोजी जाहीर केले. स्वतंत्र राहण्याचे जाहीरनाम्यात निजामाने दिलेले कारण मात्र अफलातून होते. माझ्या राज्यात हिंदू व मुस्लिम दोन्ही जमातीचे लोक राहतात. यापैकी कोणत्याही एका संघराज्यात सामील झाल्यास दुसरी जमात नाराज होईल, असे कारण निजामाने पुढे केले होते. वस्तुत: संस्थानातील बहुसंख्य असलेल्या हिंदू जमातीला काय वाटते याची निजामाने कधीच पर्वा केली नव्हती.

स्वतंत्र राहावयाचा मनाशी निश्चय होताच. निजामाने त्याची पूर्व तयारी सुरू केली होती. पेथिक लॉरेन्स, स्टफर्ड क्रिप्स व अलेक्झांडर यांचे त्रिमंत्री शिष्टमंडळ मार्च १९४६ मध्ये भारतात आले होते. छत्तारीचे नवाब हैदराबादचे प्रतिनिधी म्हणून या शिष्टमंडळाला भेटले तेव्हा त्यांनी अशी मागणी केली की, ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात संस्थानाचे जे भाग कंपनीने ताब्यात घेतले, ते हैदराबादला परत करण्यात यावेत. शिवाय हैदराबादला एखाद्या बंदराच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात. एखादे विशिष्ट बंदर तुमच्या नजरेसमोर आहे काय, असा प्रश्न शिष्टमंडळाने छत्तारींना विचारला, तेंव्हा त्यांनी गोवा बंदराचा उल्लेख केला.

१९४५ पासूनच पोर्तुगीजांच्या ताब्यातील गोवा विकत मिळविण्याचा निजामाचा प्रयत्न चालू होता. हैदराबादला समुद्रकिनारा नव्हता. स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहावयाचे तर सर्व बाजूंनी भारतीय प्रदेशाने वेढलेल्या अवस्थेत स्वतंत्र राहणे अवघड होते. शिवाय मुक्त बंदराच्या सोयीने आंतरराष्ट्रीय व्यापार व मालाची आवक सुलभ होणार होती.

पोर्तुगालमध्ये व्यवसाय करणारे एक ब्रिटीश उद्योगपती अलेक्झांडर रॉजर या प्रकरणी हैदराबाद सरकार आणि पोर्तुगीज सरकार यांच्यात मध्यस्थी करीत होते. गोवा विकत देण्याला पोर्तुगीज सरकार तयार न झाल्याने आणखी एक पर्याय हैदराबाद ने सुचवला होता. हैदराबाद सरकारने आपली निझाम स्टेट रेल्वे गोवा रेल्वेला जोडावी व गोवा बंदरात हैदराबादला मुक्त बंदराच्या सर्व सोयी मिळाव्यात, अशी ती योजना होती. दरवर्षी दहा लाख टन किमान वाहतुकीची हमी हैदराबादने द्यायची व त्यासाठी गोवा बंदराचा व गोव्यातील रेल्वेचा पोर्तुगीज सरकारने विकास करायचा अशी सूचना होती. अडचण फक्त एक होती व ती फारच महत्वाची होती. गोवा आणि हैदराबाद या दरम्यान भारतीय भूप्रदेश होता. गोवा हैदराबादला लगत

नव्हता त्यामुळे भारताच्या संमती शिवाय अशी मालवाहतूक होऊच शकणार नव्हती.

स्वातंत्र्याची घोषणा केल्याबरोबर निजामाने लंडनमध्ये मीर नवाजजंग यांना आपला प्रतिनिधी नेमले होते. जून १९४७ मध्येच नवाजजंग आणि पोर्तुगीज पंतप्रधानाचे प्रतिनिधी यांची लंडन मध्ये भेट झाली. गोवा बंदर, गोवा रेल्वे यांचे आधुनिकीकरण व गोव्यात एक जलविद्युतगृह उभारणे यासाठी हैदराबादने पैसे द्यावेत व हैदराबादला त्या बदल्यात गोव्यात मुक्त बंदराच्या सोयी मिळाव्यात, या सूचनेवर चर्चा झाली. मार्च १९४८ पर्यंत या वाटाघाटी चालू होत्या या सगळ्या प्रयत्नातून भारताच्या संमती शिवाय काहीच निष्पन्न होणे शक्य नव्हते, तसेच झाले. फक्त मध्यस्थी करणारे उद्योगपती अलेक्झांडर रॉजर यांना त्यांचा मेहनताना म्हणून दहा हजार पौंड हैदराबादने दिले.

राज्य विस्ताराचा आणखी एक प्रयत्न या काळात झाला. हैदराबाद संस्थानच्या पूर्व सरहद्दीला लागून बस्तर हे आदिवासी हिंदू राजाचे संस्थान होते. त्यावेळचा बस्तरचा राजा प्रविणचंद्र भंजदेव हा अज्ञान असल्यामुळे ब्रिटीश राजकीय खात्याच्या पालकत्वाखाली होता. व्हाईसरॉयचे राजकीय सल्लागार म्हणून त्यावेळी कॉनरॅड कॉरफिल्ड काम पाहत होते. निजामाविषयी सहानुभूती असणाऱ्या अधिकाऱ्यात कॉरफिल्डही होते. बस्तर संस्थानात आपले पाय रोवावयास मिळाले तर पुढे मागे ते संस्थानच मिळविता येईल असा निजामाचा होरा असावा. कॉरफिल्ड यांच्या आशिर्वादाने पूर्वेकडील संस्थानांचे रेसिडेंट व निजाम यांच्यात बस्तर मध्ये निजाम स्टेट रेल्वेचा विस्तार करणे व बस्तर मधील खनिज काढण्याचा अधिकार निजामाला देणे, असा एक करार होण्याचे घाटत आहे. याची कुणकुण हंगामी मंत्रीमंडळात मंत्री असलेल्या जवाहरलाल नेहरूंना नोव्हेंबर १९४६ मध्ये लागली. भारतात सत्तांतर होण्याच्या पूर्वसंध्येला रेसीडेंटने हंगामी सरकारला अंधारात ठेवून असे उद्योग करावेत, या बद्दल तीव्र नापसंती व्यक्त करणारे पत्र नेहरूंनी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांना लिहिले. वेव्हेलनी प्रथम या कराराचे 'हा केवळ व्यापारी करार आहे' असे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ' जे हैदराबाद स्वत:च अविकसित आहे, ते बस्तरच्या औद्योगिकरणाला कसली मदत करणार? हा तर अविकसित बस्तरवर पगडा बसविण्याचा प्रयत्न आहे', असे रोख ठोक उत्तर नेहरूंनी दिले. राजकीय खात्यांच्या काही अधिकाऱ्यांच्या भारत विरोधी कारवायांबद्दलही नेहरूंनी कानउघाडणी केली. मार्च १९४७ मध्ये वेव्हेल यांच्या जागी माऊंटबॅटन आले. त्यांनाही नेहरूंनी याबाबत एक कडक पत्र लिहिले. वल्लभभाईंचेही लक्ष या प्रकाराकडे नेहरूंनी वेधले. माऊंटबॅटननी नेहरूंना स्पष्ट आश्वासन दिले की, संबंधित सर्व विभागांच्या(म्हणजेच मंत्र्यांच्या) संमतिशिवाय असा कोणताही करार होऊ दिला जाणार नाही. नेहरूंच्या दक्षेतेमुळे हा करार झाला नाही. गोवा आणि बस्तर मध्ये पाय रोवण्याच्या

या प्रयत्नांव्यतिरिक्त आपल्या ताब्यातून गेलेला वऱ्हाड परत मिळविण्याचा निजाम प्रयत्न करीत होता त्याची हकीगत पूर्वी येऊन गेली आहेच.

स्वतंत्र राहायचे तर संरक्षण सिद्धता हवीच. पूर्वी हैदराबाद संस्थानला सात हजाराचे खडे सैन्य ठेवण्याची परवानगी होती. १९४७ मध्ये सैन्यदल तेरा हजारावर, तर १९४८ मध्ये ते बावीस हजार तीनशे त्र्याण्णववर पोहचले. शिवाय अकरा हजार आठशेसत्तर लोक सैन्य दलात सामील होण्यासाठी सैनिकी प्रशिक्षण घेत होते. पोलिस दलात अडोतीस हजार, तर गृह व नागरी रक्षक दलात पंधरा हजार लोक होते. मात्र सैनिक व अर्धसैनिक दलातील लोकांची संख्या मोठी असली तरी त्यांचे प्रशिक्षण फारसे चांगले झालेले नव्हते. शिवाय त्यांच्याजवळ आधुनिक व पुरेशी शस्त्रे नव्हती त्यामुळे स्वातंत्र्याच्या घोषणे पाठोपाठ मिळेल तेथून शस्त्रे आयात करण्यामागे हैदराबाद सरकार लागले.

निजामाला सर्वांत जवळचा मित्र म्हणजे पाकिस्तान होते. खुद्द पाकिस्तानचीच स्थिती इतकी वाईट होती की, ते दुसऱ्या कोणाला मदत करण्याच्या स्थितीत नव्हते. पंतप्रधान नेहरुंचे विशेष दूत म्हणून काम करणाऱ्या व्ही. के. कृष्ण मेनन यांनी नेहरूंना अशी माहिती कळवली की, कारेल बद्रेच क्राल या नावाच्या एका झेक व्यक्तीच्या मध्यस्थीने झेकोस्लोव्हाकिया मधून शस्त्रे खरेदी करण्याचा हैदराबाद सरकार प्रयत्न करीत आहे. भारतातील संस्थानांना भारत सरकारच्या मार्फतच शस्त्रे खरेदी करता येत. भारताला डावलून सरळ शस्त्र खरेदीचा प्रयत्न हा नोव्हेंबर १९४७ मध्ये भारत व हैदराबाद यांच्यात झालेल्या 'जैसे थे' कराराचा सरळसरळ भंग होता. त्याबद्दल झेक सरकारकडेही निषेध नोंदवण्यात आला. हैदराबादने एक हॅलिफॅक्स विमान खरेदी केले असून, आणखी काही विमाने खरेदीचा प्रयत्न चालू असल्याचेही भारताला कळले होते. म्हणून भारतीय हवाई हद्दीतून परवानगी शिवाय विमानोड्डाणास बंदी करण्यात आली. गोव्यात काही शस्त्रे खरेदी करण्याचा प्रयत्नही हैदराबाद सरकारने केला. सप्टेंबर १९४७ मध्ये हैदराबादचे सर सेनापती मे. जनरल अल एद्रुस यांना लंडनला शस्त्र खरेदीसाठी पाठविण्यात आले होते. शस्त्र खरेदीसाठी तीस लाख पौंडाची व्यवस्था हैदराबादने केली होती.

भारताजवळ तेव्हा हवाई मार्गाने होणारी बेकायदा वाहतूक रोखण्याची अद्ययावत यंत्रणा नव्हती. त्यामुळे बरीच शस्त्रे अगोदर पाकिस्तानात आणण्यात आली व तेथून ती लँकेस्टर विमानाच्या फेऱ्या करून संस्थानात पोचविण्यात आली. ही शस्त्रे मुख्यतः बीदर विमानतळावर व काही थोडी वरंगळ व हैदराबाद विमानतळावरही उतरविण्यात आली. डी. सी. टी. बेनेट हा ब्रिटिश हवाई दलातील माजी वैमानिक व सिडने कॉटन हा ऑस्ट्रेलियन वैमानिक यांनी ही विमाने चालवून शस्त्रांची आयात केली. ही विमाने कराचीचा मुख्य

विमानतळ न वापरता युद्ध काळात तयार केलेली व सध्या उपयोगात नसलेली कराचीजवळची एक धावपट्टी वापरत. मे १९४८ ते अकरा जून १९४८ पर्यंत बीदर विमानतळावर सहा वेळा, तर वरंगळजवळच्या मामनूर व हैदराबादमधील हकीमपेठ विमानतळावर काही वेळा ही विमाने उतरली. जी शस्त्रे आली, त्यात तीनशे तीन रायफली, नऊ एमएम स्टेनगन्स, रणगाडे विरोधी भूसुरूंग, हातबॉम्ब, कार्ट ब्राऊनिंग मशिनगन्स व इतर दारूगोळा यांचा समावेश होता.

◆ ◆ ◆

२१

चळवळीसाठी शस्त्रे

निःशस्त्र व निरपराध लोकांवर अत्याचार करणाऱ्या रझाकारांना पायबंद बसावा व लोकांचे मनोधैर्य वाढावे म्हणून संस्थानच्या सरहद्दीवर प्रतिकार शिबिरे उघडावीत असा निर्णय झाला तेव्हा पहिला प्रश्न निर्माण झाला की, ही शस्त्रे कोठून व कशी मिळवावीत ? भारताचे केंद्र सरकार व हैदराबाद संस्थानच्या तिन्ही बाजूंनी असलेल्या प्रांतांची सरकारे ही काँग्रेसचीच होती व हैदराबाद मुक्त व्हावे ही त्यांची मनोमन इच्छाही होती. मात्र उघडपणे सशस्त्र लढ्याला पाठिंबा देणे त्यांना शक्यच नव्हते. पूर्व-दक्षिण सरहद्दीवरील मद्रास प्रांतातील संस्थानलगतच्या तेलगू भाषिक भागात कम्युनिस्टांची चळवळ थोड्याफार प्रमाणात चालू होती व मद्रासमधून स्टेट काँग्रेसला फारशी मदत मिळण्याचा संभव नव्हता. सशस्त्र लढा देऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची बहुसंख्य शिबिरे मराठवाड्याच्या सरहद्दीवर होती व या भागाला मुंबई व मध्य प्रांत-वऱ्हाड लागून होते. या सरकारांच्या प्रदेशातच काही प्रयत्न करावयास हवे होते.

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर व गृहमंत्री मोरारजी देसाई होते. हे दोघेही सशस्त्र लढ्याला अनुकूल तर नव्हतेच परंतु शस्त्रविषयक प्रचलित कायद्याचे काटेकोर पालन करून स्टेट काँग्रेसच्या मार्गात अडथळे उभारण्याचे धोरणच त्यांनी मुंबई प्रांतात राबवले. बॉम्ब तयार करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या ठिकाणावर छापे मारणे व विनापरवाना शस्त्रे जवळ बाळगणाऱ्या कार्यकर्त्यांना अटक करणे असे अनेकवेळा घडले. त्यातच आणखी एका घटनेने अडचणीत भर टाकली. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींचा खून झाला. या खुनाचा कट करणाऱ्या मंडळींनी जेथून शस्त्रे मिळवली होती त्याच लोकांकडून स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनीही शस्त्रे मिळवण्याचा प्रयत्न केला होता. बेकायदा व चोरून शस्त्रे विकणारांना त्यांच्या उपयोगाचे सोयरसुतक नसते. पोलिसांनी जेव्हा गांधी खून खटल्यातील आरोपींनी मिळवलेल्या शस्त्रांचा शोध सुरू केला तेव्हा त्याच विक्रेत्यांनी स्टेट काँग्रेस कार्यकर्त्यांनाही शस्त्रे विकल्याचे आढळून आले. स्टेट काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांना अटकही झाली व काही काळ त्यांना जेलमध्येही राहावे लागले. अशा कार्यकर्त्यांत बाबासाहेब परांजपे व अनंत भालेराव यांचाही समावेश होता.

मुंबई प्रांतिक सरकारचा दृष्टिकोन संपूर्णपणे तांत्रिक होता व कायद्याकडे डोळेझाक करून सशस्त्र लढ्याला मदत करण्यास ते बिलकुल तयार नव्हते. याच्या उलट अनुभव मध्यप्रांतात आला. रविशंकर शुक्ला तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री व द्वारकाप्रसाद मिश्रा गृहमंत्री

होते. या दोघांनी व्यावहारिक व सहानुभूतीचा दृष्टिकोन स्वीकारून चळवळीला सर्व प्रकारची मदत केली. रा. कृ. पाटलांसारखे मंत्री व पु. य. देशपांड्यांसारखे स्नेहीही या कामात सहभागी झालेले होते.

जून १९४७ च्या शेवटच्या आठवड्यात स्वामीजींनी नागपूरला शुक्ला, मिश्रा, रा. कृ. पाटील, दादा धर्माधिकारी, विनोबाजी, बारलिंगे यांच्या भेटी घेतल्या व हैदराबाद संस्थानातील परिस्थिती समजावून सांगितली. स्वामीजी परत गेल्यावर रा. कृ. पाटील व शुक्ला-मिश्रा यांनी काही पैसे गोळा केले व नागपूरातील बँकेत खाते उघडण्यात आले. शिक्षणासाठी वर्ध्यात राहणाऱ्या सीताराम पप्पू या विद्यार्थ्याच्या खोलीवर स्वामीजी उतरत असत. या पप्पूंनी नागपूरात रहावे व तेथे काम करावे असे ठरले. कामाचे स्वरूप नंतरच्या काळात असे झाले की गुप्तता व शिस्त ही दोन्ही राखणे आवश्यक ठरले. नागपूरात शस्त्रे मिळवावयाची व ती सरहद्दीवर पाठवावयाची होती. दिगंबरराव बिंदू, आ. कृ. वाघमारे अशी मंडळी नागपूरात येऊन गेली तर प्रत्यक्ष कामाचा संबंध फक्त पप्पूंशीच असावा, असा निर्णय झाला होता. गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी मुख्य सचिव के. बी. एल. सेठ, पोलिसप्रमुख बम्बावाले, गुन्हे अन्वेषण विभागाचे शंकर दयाळ शुक्ल व अकोला, यवतमाळसारख्या हैदराबाद सरहद्दीला लागून असलेल्या जिल्ह्याच्या मुलकी व पोलिस अधिकाऱ्यांशी पप्पूंचा परिचय करून दिला. कोणताही कागदोपत्री पुरावा न ठेवता यंत्रणेने शक्य ती मदत हैदराबाद लढ्याला करावयाची याचा तो संदेशच होता.

मध्य प्रांतातील संरक्षण साहित्य निर्माण करणाऱ्या कारखान्यातून शस्त्रांचे स्मगलिंग होई. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी चोरट्या व्यवहारात पोलिस खातंच काही शस्त्रे बनावट गिऱ्हाईकाद्वारे खरेदी करी. या शस्त्रांपैकी काही त्यासाठी आलेला खर्च देऊन हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या उपयोगासाठी घेतली जात. या व्यवहारात व पुढे सरहद्दीवरील शिबिरातील काही कार्यकर्त्यांना शस्त्रे चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात ब्रिगेडियर शिवदत्तसिंग डोगरा यांची खूप मदत झाली.

नागपूरला शस्त्रे विकत मिळवणे, ती जपून ठेवणे, कृती समितीच्या निरोपानुसार कार्यकर्त्यांना देणे ही कामे पप्पू करीत तर जबलपूरला शस्त्रे मिळविण्याचे काम दासराव मोहनपूरकर करीत. शस्त्रांची खरेदी चोरून करावयाची असल्यामुळे कित्येकवेळा जंगलात सर्व प्रकारची जोखीम असताना जी अडवली जाणार नाहीत, अशी वाहने वापरावी लागत. एक-दोन वेळा खुद्द गृहमंत्र्यांनीच आपली मोटार दिली. स्टेट काँग्रेससाठी म्हणून जी मोटार घेण्यात आली ती कमलाताई होस्पेटांच्या मातृ सेवा संघाच्या नावे नोंदवण्यात आली होती. त्या गाडीत कार्यकर्ते शस्त्रांचीही ने-आण करीत.

सरहद्दीवरील कारवायांसाठी डिटोनेटर्सची गरज भासू लागली. गृहमंत्री मिश्रांना ही गरज कळवली जाताच त्यांनी पु. य. देशपांडेंना बोलावून घेतले व त्यांना निरोप दिला. दुसऱ्या दिवशी खाणमालक श्री. ओक यांनी सरकारकडून त्या दिवशीच खाणीतील उपयोगासाठी मिळणाऱ्या दारूगोळ्यापैकी डिटोनेटर्सचे दहा खोके, जिलेटिन, दारू व वाती असे सर्व सामान कोणतीही किंमत न घेता हैदराबाद कार्यकर्त्यांच्या स्वाधीन केले. हे सर्व अर्थातच पोलिसांना माहीत होते व त्यांच्या साक्षीनेच होत होते. विविध मार्गाने पोलिसांनी मिळविलेल्या हत्यारातील काही ते कार्यकर्त्यांना देत. डी. आय. जी. बंबावालेंनी एकाच वेळी बारा स्टेनगन्स, दोन रायफली व ग्रेनेडच्या तीन पेट्या दिल्या होत्या. सशस्त्र संघर्ष हा बाबासाहेब परांजप्यांच्या मनाला भावणारा लढ्याचा मार्ग होता. ते अतिशय उत्साहाने नागपूरातील कामावर लक्ष ठेवत. सीताबर्डीच्या किल्ल्यात कार्यकर्त्यांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले जाई तेव्हाही ते कित्येक वेळा तेथे हजर राहत.

मध्य प्रांतातील शुक्ला-मिश्रांच्या सरकारने लढ्याला शस्त्रे दिली, गाड्या दिल्या, भयानक टंचाईच्या काळात पेट्रोलचे रेशनिंग असताना पेट्रोल मिळवून दिले. त्याबरोबरच या साऱ्याचा गैरवापर होऊ नये म्हणून त्यावर लक्षही ठेवले. सरहद्दीवरील कॅंपवर कार्यकर्त्यांजवळ जी शस्त्रे होती ती पोलिस कारवाई झाल्याबरोबर अधिकारी पाठवून ताबडतोब परत घेण्यात आली. या शस्त्रांचा उपयोग करून अनेक पोलिस ठाणी, रझाकारांची केंद्रे, यांच्यावर हल्ले करण्यात आले. हैदराबाद स्टेट बॅंक या त्यावेळच्या सरकारी बॅंकेच्या नांदेड जिल्ह्यातील उमरी गावी असलेल्या शाखेवर धाडसाने हल्ला करून सतरा लाखाहून अधिक रक्कम लुटण्यात आली.

उपलब्ध पुराव्यावरून असे अनुमान काढता येते की, शस्त्रास्त्रे मिळवणे व कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे याबाबत मध्य प्रांताचे सरकार जी मदत हैदराबादच्या लढ्याला करत होते त्याची माहिती सरदार पटेलांना होती. त्यांच्या मूक संमतीच्या आधारावरच मिश्रा हे करीत होते. अर्थात त्याची कागदोपत्री नोंद राहू देणे कोणासाठीच इष्ट नव्हते. सरदारांच्या मनात काय आहे हे शुक्ला-मिश्रा जाणू शकत होते. खेर आणि मुरारजी यांना ते शक्य झाले नाही.

◆ ◆ ◆

२२
सुरक्षा परिषदेत हैदराबाद

हैदराबादच्या भारतीय संघराज्यातील सामीलीकरणाचा प्रश्न वाटाघाटीने सुटत नाही व संस्थानातील परिस्थिती गंभीर झाली आहे, हे लक्षात येताच हैदराबादेत सैन्य पाठवण्याखेरीज दुसरा पर्याय भारत सरकारजवळ राहिला नाही. भारताचे सरकार आता कोणत्याही क्षणी सशस्त्र हस्तक्षेप करील याची कल्पना निजामालाही आली. २१ ऑगस्ट १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षांच्या नावे एक तार पाठवून निजामाने हैदराबाद सरकारतर्फे हैदराबाद व भारतातील तंटा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या कलम ३५(२) अन्वये दाखल केलेल्या या तक्रारीत हैदराबादच्या सीमांचे भारत उल्लंघन करीत असल्याचे व हैदराबादच्या स्वातंत्र्याला गंभीर धोका निर्माण करीत असल्याचे म्हटले होते. हैदराबादेत फौजा पाठवाव्या लागतील हे सप्टेंबरच्या प्रारंभी नेहरुंनी जाहीरपणे सांगितल्यावर १२ सप्टेंबर १९४८ रोजी आणखी एक तार पाठवून हैदराबादने आपली तक्रार त्वरित सुनावणीस घेण्याची विनंती केली.

१६ सप्टेंबर १९४८ रोजी गुरूवारी पॅरिसमध्ये भरलेल्या सुरक्षा परिषदेच्या ३५७ व्या बैठकीत हैदराबादची तक्रार प्रथम चर्चेस आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी इंग्लंडचे प्रतिनिधी सर अलेक्झांडर कॅडगन होते. चीनचे प्रतिनिधी झियांग यांनी आपल्याला आपल्या देशाकडून सूचना घेण्यासाठी वेळ मिळावा म्हणून सोमवारपर्यंत म्हणजे २० तारखेपर्यंत हैदराबादच्या तक्रारींविषयीची चर्चा स्थगित करावी, अशी सूचना केली.

हैदराबादच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री मोई नवाजजंग यांच्या नेतृत्वाखाली एक प्रतिनिधी मंडळ हैदराबादची तक्रार संयुक्त राष्ट्रापुढे मांडण्यासाठी निवडण्यात आले होते. त्यात मोईन नवाज यांच्या व्यतिरिक्त चार सभासद होते. दलित नेते बी. श्यामसुंदर व हैदराबाद उच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश व हैदराबाद विधीमंडळाचे सरकारनियुक्त अध्यक्ष न्या. श्रीपतराव पळणीटकर यांचा त्यात समावेश होता. शिष्टमंडळाने प्रत्यक्ष हैदराबाद सोडले, तेव्हा पळणीटकर त्याबरोबर गेलेच नाहीत. आपण आजारी आहोत, असे त्यांनी सांगितले. अगोदर संमती दिलेल्या पळणीटकरांनी नंतर मित्रांच्या सल्ल्यानुसार जाणे टाळले होते. हैदराबादची बाजू मांडण्यासाठी मोईन नवाज उपस्थित झाले. मात्र त्यांना अनेक ब्रिटीश कायदेपंडितांचे साह्य लाभले.

प्राथमिक चर्चेच्या वेळी या तक्रारीबद्दल आक्षेप घेताना भारताचे प्रतिनिधी सर रामस्वामी

मुदलियार म्हणाले, ''इतिहासात कधीही हैदराबादला स्वतंत्र राज्याचा दर्जा नव्हता. ब्रिटीशांनीही हैदराबादचे स्वातंत्र्य कधीही मान्य केलेले नाही. ब्रिटीशांनी हैदराबादला स्वातंत्र्य बहाल करणारा कोणताही कायदा भारत सोडण्यापूर्वी मंजूर केलेला नाही''. हैदराबादचे म्हणणे असे होते की, ब्रिटीश सत्ता भारतातून जाताना आपले सार्वभौमत्वाचे अधिकार आपण कोणालाही देऊन जात नाही, हे त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. हैदराबादवर ब्रिटीशांचे सार्वभौमत्व संपताच हैदराबाद आपोआप स्वतंत्र झाले आहे. भारताच्या प्रतिनिधींनी असेही म्हटले की, हैदराबाद व भारताच्या संबंधाचा प्रश्न हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघास त्यात हस्तक्षेप करता येणार नाही.

१६ सप्टेंबर १९४८ रोजी जेव्हा हैदराबादची तक्रार कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यासंबंधीची सूचना चर्चेस आली, त्यापूर्वीच तीन दिवस १३ तारखेला पहाटे भारताच्या सेना संस्थानात घुसल्या होत्या व थोडाफार झालेला प्रतिकार मोडून काढून वेगाने हैदराबाद शहराजवळ येत होत्या. आठ विरूद्ध तीन असे मतदान होऊन सुरक्षा परिषदेने हैदराबादचा विषय कार्यक्रम पत्रिकेवर घ्यावयाचे ठरवले. २० तारखेला सुरक्षा समितीची बैठक पुन्हा भरली. त्याअगोदर हैदराबादवरील 'पोलिस कारवाई' पूर्ण झाली होती व भारतीय फौजांपुढे हैदराबादने शरणागती पत्करली होती. निजामाने आपण सुरक्षा परिषदेपुढे केलेली तक्रार परत घेत असल्याचे तारेने कळवले होते.

हैदराबादच्या तक्रारीबाबत आता करण्यासारखे काहीच उरले नव्हते. बैठकीच्या अध्यक्षांनी काय घडले आहे याची खात्रीलायक व पुरेशी माहिती मिळविण्यासाठी बैठक काही दिवस स्थगित करण्याची सूचना केली. मात्र हैदराबादची तक्रार बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवर कायम ठेवावी, अशी सूचना सीरियाच्या प्रतिनिधींनी केली. पुढच्या बैठकीत तक्रार परत घेण्याच्या निजामाच्या तारेचा विचार झाला, त्यावेळी त्या तारेच्या खरेपणाबद्दलच सीरियाच्या प्रतिनिधीने शंका व्यक्त केली. यावरील चर्चेत निजामाच्या २३ सप्टेंबरच्या भाषणाचा हवाला देऊन निजामाने कोणत्याही दडपणाशिवाय तक्रार परत घेतली असल्याचे भारतीय प्रतिनिधीने सांगितले. त्यानंतर चर्चा स्थगित झाली. पुढे मे १९४९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये सुरक्षा परिषदेची बैठक झाली, त्यावेळी हैदराबादच्या प्रश्नावर चर्चा झाली. परंतु सर्व संदर्भ बदलले होते. हैदराबादचे 'स्वातंत्र्य' संयुक्त राष्ट्रांच्या साह्याने रक्षिण्याचा हा प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर २० डिसेंबर १९४९ रोजी मोईन नवाज जंग यांनी सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षांना एक पत्र लिहून विनंती केली की, जर हैदराबादवरच्या आक्रमणाच्या तक्रारीचा विचार सुरक्षा परिषद करणार नसेल, तर निदान हैदराबाद नेत्यांना क्षमादान करण्यास, जे तुरुंगात आहेत त्यांना मुक्त करण्यास व त्यांची संपत्ती परत देण्यास भारताला भाग पाडावे. यावेळी

मोईन नवाजजंग यांचे मेहुणे व हैदराबादचे शेवटचे पंतप्रधान मीर लायकअली नजरकैदेत होते. हैदराबादचे काही मंत्री तुरुंगात होते. काही अधिकाऱ्यांना कामावरून दूर ठेवण्यात आले होते. मोईन नवाजजंग यांच्या या विनंतीची दखल सुरक्षा परिषदेने घेतली नाही. मात्र लायकअली नजरकैदेतून निसटून पाकिस्तानात पळून गेले. हळूहळू सर्वांची सुटका झाली.

भारताच्या लष्कराशी लढण्याचे सामर्थ्य हैदराबादेत नाही, हे निजाम आणि त्याचे मंत्रिमंडळ दोघांनाही माहीत होते. सामर्थ्याच्या वल्गना करणाऱ्या कासिम रझवीलाही ते ठाऊक असावे. भारतावर दडपण आणण्यासाठी व त्याचा हस्तक्षेप टाळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांपैकी संयुक्त राष्ट्रसंघात तंटा नेणे, हा एक मार्ग होता. जसा पाकिस्तानची मदत मिळविण्याचा प्रयत्न फोल ठरला, तसाच हाही प्रयत्न वाया गेला. जेव्हा हैदराबाद कधी स्वतंत्र होते का, याची तात्विक चर्चा सुरक्षा परिषदेत होत होती, तेव्हा हैदराबादच्या जनतेला स्वातंत्र्य देण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. भारतीय सैन्य हैदराबादचे अेक अेक भाग स्वतंत्र करीत राजधानीकडे कूच करू लागले होते. सुरक्षा परिषदेत प्रत्यक्ष चर्चा सुरू झाली, तेव्हा सर्व संपले होते.

मोईन नवाजजंग तीन कोटी रूपये घेऊन गेले होते. त्या रकमेसह ते पाकिस्तानातच राहिले. शिष्टमंडळापैकी दलित नेते बी. श्यामसुंदर काही दिवसांनंतर हैदराबादेत परत आले. काही दिवस ते तुरूंगात होते. नंतर राजकारणात थोडा भाग घेऊ लागले. मात्र त्यांचे महत्त्व उरले नव्हते. सुरक्षा परिषदेसमोरची हैदराबादची तक्रार अनेक वर्षे तशीच पडून राहिली; त्यात कुणालाच स्वारस्य नव्हते.

◆ ◆ ◆

२३

'ऑपरेशन पोलो'

बारा सप्टेंबर १९४८ ची मध्यरात्र संपली. १३ तारखेची पहाट व्हायला अद्याप थोडा अवधी होता. मे. ज. जयंतीनाथ चौधरी सोलापूरच्या भारतीय सैन्याच्या सब एरिया ऑफिसमध्ये बसले होते. अधीरतेने ते वरिष्ठांच्या सूचना देणाऱ्या दूरध्वनीची वाट पाहत होते. आदल्या दिवशीच पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष महंमदअली जीना यांचे निधन झाले होते. सर्व भारतीय सरकारी कार्यालयांबरोबरच सोलापूरच्या सैन्याधिकारी कार्यालयावरील राष्ट्रध्वजही अर्ध्यावर उतरवण्यात आला होता. जीनांच्या निधनाचा काही परिणाम आपल्या पूर्वनियोजित कारवाईवर होणार का असा प्रश्न अनेकांच्या मनात होता; परंतु पहाटे पावणेतीन वाजता चौधरींचा फोन खणखणला. दक्षिण विभागाचे सैन्यप्रमुख ले. जनरल महाराज श्री राजेंद्रसिंहजी सांगत होते- 'आगे बढो!'

हा आदेश मिळताच भारतीय सैन्य विविध ठिकाणावरून हैदराबाद संस्थानात घुसले व एका जुलमी राजवटीतून दीड कोटी जनतेच्या मुक्ततेसाठी 'पोलिस कारवाई' सुरू झाली. या कारवाईला 'ऑपरेशन पोलो' असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. हैदराबाद संस्थान वाटाघाटींनी भारतात सामील झाले नाही व लष्करी हस्तक्षेप करावा लागला, तर त्यासाठीची तयारी नोव्हेंबर १९४७ पासूनच सुरू होती. भारतीय सैन्याचे प्रमुख जनरल बुचर व दक्षिण विभागाचे प्रमुख ले. जनरल गोडार्ड हे दोन्ही अधिकारी ब्रिटीश होते.३ फेब्रवारी १९४८ रोजी याबाबतचा पहिला कच्चा आराखडा तयार करण्यात आला होता. सैन्यप्रमुख जनरल बुचर यांना प्रथमपासून या मोहिमेच्या यशस्वितेबद्दल शंका होती. ५ मे १९४८ रोजी भारतीय संरक्षणमंत्री बलदेवसिंग यांना पाठविलेल्या लेखी टिपणात बुचर यांनी म्हटले, ''काश्मिरमध्ये भारतीय सैन्य अत्यंत मर्यादित उद्दिष्टापलिकडे काही विशेष साध्य करू शकले नाही. पूर्व पंजाबात त्याच्या संरक्षणाइतकेच किमान सैन्य आहे. हैदराबादवर जर आपण हल्ला केला, तर भारतातील अंतर्गत शांतता मोठ्या प्रमाणावर धोक्यात येण्याची शक्यता आहे.''

अशा कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्यास राज्य सरकारे सक्षम आहेत या सरदार पटेलांच्या मताचा बुचर यांनी प्रतिवाद केला. शिवाय 'ऑपरेशन पोलो' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भारतीय सैन्याच्या हैदराबाद चढाई योजनेबद्दल बुचर यांचा असाही आक्षेप होता की, या योजनेत सैन्याचा मुख्य भाग सोलापूरहून हैदराबादेत शिरणार आहे. मद्रासकडची बाजू कमजोर आहे. कदाचित हैदराबादची सेना मद्रास सरहद्दीवरील आपल्या तुटपुंज्या सैन्याचा पराभव करून मद्रास प्रांतात शिरेल. तेथे आपली पुरेशी संरक्षणसिद्धता नाही. मात्र

त्यांच्या या मताशी इतर सेनाधिकारी व भारताचे सरकार सहमत झाले नाही.

संस्थानातील परिस्थिती दिवसेंदिवस अधिक बिघडत चालली होती. नान्नज, कोडार इत्यादी ठिकाणी भारतीय सैन्यदल व पोलिस यांच्या गस्ती तुकड्यांवर रझाकार व हैदराबाद पोलिसांनी हल्ले केले होते. सहनशीलतेची मर्यादा संपली होती. शेवटी भारतीय मंत्रिमंडळाने १० सप्टेंबर १९४८ नंतर कोणत्याही दिवशी हैदराबादेत शिरण्याचा सैन्याला अधिकार दिला.

जुलै १९४८ पासून 'ऑपरेशन कबड्डी' या नावाने ओळखल्या गेलेल्या एका योजनेद्वारा हैदराबाद सरहद्दीवर काही सैन्य आणून ठेवण्यास सुरवात झाली होती. अर्थात मुख्य सैन्यबळाची जमवाजमव ही कठीण गोष्ट होती. नुकत्याच झालेल्या देशाच्या फाळणीमुळे सैन्य विस्कळित झाले होते. काश्मीरमध्ये घुसखोरांचा मुकाबला करण्यात आणि देशातील काही भागात शांतता राखण्यातही काही सैन्य गुंतले होते. अशा स्थितीत जमवाजमव करण्यात आली. मोहिमेला प्रारंभ झाला.

सैन्याने आखलेल्या योजनेनुसार सैन्याचा मोठा भाग सोलापूरकडून हैदराबाद शहराकडे जाणार होता व हैदराबाद ताब्यात घेणार होता. इतर ठिकांणावरून संस्थानात येणारे सैन्य केवळ पूरक कामगिरी बजावणार होते. सोलापूर-हैदराबाद महामार्गावरील नळदुर्गला एक सुस्थितीतील किल्ला आहे. नळदुर्गजवळ एक पूल होता. महामार्गावरील हा पूल निजामी सैन्याने उडवून टाकला, तर सैन्याच्या हैदराबाकडील आगेकूच करण्याला अडथळा होणार होता. भारतीय सैन्याने पहाटे पाच वाजता तामलवाडीजवळ संस्थानच्या हद्दीत प्रवेश केला व सकाळी साडेसात वाजता नळदुर्गपर्यंत पोहोचून महत्वाचा पूल सुरक्षित अवस्थेत ताब्यात घेतला. नळदुर्गजवळचा हा पूल उडवण्याच्या कामगिरीवर हैदराबादहून निजामी सैन्यातील एक ब्रिटीश अधिकारी लेफ्टनंट टी. टी. मूर एका जीपमध्ये स्फोटके घेऊन निघाले होते; परंतु ते पुलाजवळ पोचण्यापूर्वीच भारतीय सैन्याने पूल ताब्यात घेतला होता.

नळदुर्ग व तुळजापूर या दोन्ही ठिकाणी भारतीय सैन्याला प्रतिकाराला तोंड द्यावे लागले. निजामी सैन्याने जो काही थोडा प्रतिकार केला तो याच ठिकाणी. दोन्ही ठिकाणी रझाकारांनी रस्त्यात अडथळे उभारले होते व छोटे खंदकही खणले होते. हैदराबाद सैन्याचे जवळपास दोनशे सैनिक व दोन अधिकारी मारले गेले व रझाकार व सैनिक मिळून दोनशे लोकांना भारतीय सैन्याने कैद केले. भारतीय सैन्यातील सहा जवानांना वीरमरण आले. पहिल्या दिवशी भारतीय सैन्य संस्थानात ६८ किलामीटर आत घुसले होते.

आंध्रातील विजयवाड्यातून निघालेली सैन्य तुकडी १२ तारखेला सरहद्दीजवळ चिल्लाकालू गावी मुक्कामाला होती. ते जेव्हा संस्थानातील कोडार या निजामी सैन्य तळावर पोहचले तेव्हा सर्व निजामी सैन्य माघार घेऊन खम्ममेटला गेल्याचे त्यांना आढळले. सूर्यपेठला

पोहचेपर्यंत त्यांना प्रतिकार झाला नाही. तेथे मात्र चौदा तारखेला निजामी सैन्याने प्रतिकार केला. तेथे ३५ निजामी सैनिक मारले गेले. एक अधिकारी व ४८ सैनिक पकडले गेले. पुणे-हैदराबादकडे जाणाऱ्या रस्त्यावरचा एक पूल निजामी सैन्याने उडवून दिला होता. १६ तारखेला तेथे तात्पुरता पूल उभारून सैन्य पुढे गेले.

पश्चिम आघाडीवरील सैन्य तुळजापूर, नळदुर्ग, जळकोट काबीज करून दुसऱ्या दिवशी हुमनाबादेत पोचले होते. हुमनाबादजवळ सैन्याच्या ऐवजी फक्त रझाकारांनीच प्रतिकार केला. त्यात दोनशे रझाकार मारले गेले व साठ पकडले गेले. सोळा तारखेला या आघाडीवरील भारतीय सैन्य हैदराबादपासून केवळ ९३ किलोमीटरवर होते.

वायव्येकडून चाळीसगाव व नांदगाववरून निघालेले भारतीय सैन्य सावकाश मार्गक्रमण करत औरंगाबादच्या दिशेने जात होते. या सैन्याला दौलताबादजवळ थोडा प्रतिकार झाला. तेथे बरेच रझाकार मारले गेले. १४ तारखेला रात्री साडेआठ वाजता औरंगाबादने शरणागती पत्करली. वऱ्हाडातून निघालेल्या ब्रिगेडियर शिवदत्तसिंहाच्या तुकडीने एव्हाना जालना ताब्यात घेऊन शहागडपर्यंत मजल मारली होती. शहागडचा गोदावरीवरील पूल ताब्यात घेण्यात आला व तेथेच औरंगाबादचे सुभेदार (विभागीय आयुक्त) एका खासगी मोटारीतून जात असताना त्यांना अटक करण्यात आली.

हैदराबादवरील भूदलाच्या चढाईला मदत करण्यासाठी हवाईदलाचा एक छोटा विभाग पुण्यात तयार करण्यात आला होता. 'पोलो एअर टास्क फोर्स' असे त्याचे नाव होते. टेम्पेस्ट विमानांच्या दोन स्क्वाड्रन्स, बाँब फेकण्यासाठी काही बदल करण्यात आलेली दोन डाकोटा विमाने व एक-दोन अगदी छोटी विमाने एवढीच विमाने त्यात होती. १३ सप्टेंबरला सकाळी यातील काही विमानांनी संस्थानातील अनेक शहरात दक्षिण विभाग प्रमुख जनरल राजेंद्रसिंहजी यांची विविध भाषांतील मुद्रित निवेदने टाकली. त्यात भारत सरकार व भारतातील जनता यांच्या सदिच्छा व कायद्याचे राज्य प्रस्थापित करून हैदराबादेत सर्वांना सारखे संरक्षण देण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला होता. त्याच वेळी दोन डाकोटा विमाने विमानतळावर पाचशे पौंडी बाँब टाकून तेथली धावपट्टी नष्ट करीत होती. एका विमानाने गुलबर्ग्यात एका मैदानात कवायत करणाऱ्या रझाकार व सैन्याच्या तुकड्यांवर सरळ हल्ला करून ३०-४० लोकांना टिपले. दोन टेम्पेस्ट विमानांनी वरंगलच्या हवाई पट्टीवर हल्ला करून ती निकामी केली. हैदराबाद शहराजवळच्या बेगम पेठ विमानतळाची धावपट्टीही निकामी करण्यात आली. या सर्व हल्ल्यात भारताच्या विमानांना मशीनगनने झाडलेल्या गोळ्यांमुळे किरकोळ छिद्रे पडण्यापलिकडे काही नुकसान झाले नाही.

बीदर-जहिराबाद भागात संरक्षणाची भरपूर सिद्धता निजामी सैन्याने केली आहे, असे

सांगितले जात होते. प्रत्यक्षात काही भूसुरुंग फक्त सैन्याचा मार्ग अवरूद्ध करीत होते. ते निकामी करण्यात थोडा वेळ गेला. १७ सप्टेंबर रोजी भारतीय सैन्याचे सोलापूर येथून व विजयवाडा येथून निघालेले दोन्ही विभाग हैदराबाद शहराच्या वेशीवर पोहचले होते. पहिले दोन दिवस हैदराबाद रेडिओ काहीही थापेबाजी करीत असला, तरी संस्थानाच्या सरकारला आपले भवितव्य १७ सप्टेंबरला सकाळी कळून चुकले होते. १७ तारखेला एका छोट्या विमानातून मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी बीदरच्या विमानतळावर उतरले, तेव्हा त्यांना कळले की, संध्याकाळी पाच वाजता हैदराबादने शरणागती जाहीर केली आहे. भारतीय सैन्य हैदराबाद शहरात दाखल होण्यापूर्वीच ही शरणागती जाहीर झाली होती.

१८ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद शहराबाहेर नियोजित स्थळी मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी यांनी हैदराबाद सैन्याचे प्रमुख मेजर जनरल अल एद्रुस यांच्याकडून शरणागती स्वीकारली. या औपचारिक शरणागतीने हैदराबाद संस्थानातील पोलिस कारवाईचा यशस्वी शेवट झाला. 'ऑपरेशन पोलो' म्हणून ओळखल्या गेलेल्या चार दिवसांच्या या मोहिमेत भारतीय सैन्याचे ४२ लोक मारले गेले, ९७ जखमी झाले, तर २४ बेपत्ता म्हणून नोंदविले गेले. हैदराबादच्या सैन्यातील ४९० लोक मृत्युमुखी पडले, तर १२२ जखमी झाले. याशिवाय २७२७ रझाकार मारले गेले व १०४ जखमी झाले. ३३६४ रझाकारांना पकडण्यात आले.

सैन्याने विजय मिळवला; परंतु राजकीय आघाडीवर वेगळ्याच हालचाली चालू होत्या. अर्थात ते वेगळे प्रकरण आहे.

◆ ◆ ◆

२४
शेवटची धडपड

पहाटे पाच वाजण्याचा सुमार. हैदराबाद संस्थानचे पंतप्रधान मीर लायक अली यांच्या शयनगृहातील दूरध्वनी खणखणला. संस्थानी फौजेचे सरसेनापती मेजर जनरल अल एद्रुस फोनवर सांगत होते की, संस्थानच्या हद्दीत पाच ठिकाणी भारतीय सैन्याने प्रवेश केला आहे. आज ना उद्या अशी बातमी येणार याची लायक अलींनाही कल्पना होती. शक्य त्या साधनांनिशी भारतीय सैन्याचा प्रतिकार करण्याचा आदेश देऊन त्यांनी दूरध्वनी खाली ठेवला. नमाज आटोपला आणि सैन्याच्या मुख्यालयात जाऊन त्यांनी अधिक माहिती घेतली. हकीमपेठ हा हैदराबाद शहराजवळचा विमानतळ वगळून इतर सर्व धावपट्ट्यांवर भारतीय सैन्य बाँबवर्षाव करून त्या निरुपयोगी करीत होते. संस्थान जवळ विमानदलच नव्हते. फारच थोड्या विमानविरोधी तोफा होत्या. त्यामुळे भारतीय विमानांना मुक्तसंचार होता.

शिस्तबद्ध प्रतिकाराची फारशी तयारीच संस्थानात नव्हती. केवळ भडक प्रचार हेच प्रतिकाराचे साधन समजले गेले होते. संस्थानच्या उत्तरपूर्व सरहद्दीवर वर्धा नदीवर एक पूल होता. भारतीय सैन्य घुसले की, हा पूल उडवून टाकावा व त्याची आगेकूच रोखावी, असे ठरले होते. पूल उडवण्याची कामगिरी एका रेल्वे इंजिनियरवर सोपवण्यात आली होती. भारतीय सैन्य जेव्हा या पुलाजवळ आले तेव्हा हा इंजिनिअर पुलापासून सहा किलोमीटर अंतरावर एका घरात शांत झोपलेला होता. भारतीय सैन्य पुलावरून सुरक्षितपणे ऐलतीरावर आले व त्यांनी अलिकडे चौकी कायम केली. भारतीय सैन्याच्या आगेकुचीच्या अशा बातम्या दर मिनिटाला येत होत्या.

संस्थानी सैन्य आपल्या मुख्यालयाशी बिनतारी संदेशवहनासाठी जे गुप्त कोड वापरत होते ते अनेक वर्षापासून बदललेले नव्हते. भारतीय सैन्याला हे सर्व ज्ञात असणार व त्यांनाही हे संदेश समजत असणार हे उघड होते; परंतु आता संदेशाचे कोड बदलण्याला वेळच नव्हता. निजामी सैन्याजवळचे नकाशेसुद्धा कालबाह्य होते. बीदर हे शहर हैदराबाद जवळचे मोठे व महत्त्वाचे शहर. या शहराकडे येणारे जे रस्ते नकाशात होते त्यावर शिबंदी ठेवून प्रतिकाराची व्यवस्था करण्यात आली होती; परंतु भारतीय सैन्य कोणताही प्रतिकार न होता बीदरला पोहचले. ते एका उत्तम स्थितीतील रस्त्यावरूनच आले. तो रस्ता निजामी सैन्याजवळ उपलब्ध असलेल्या नकाशात दाखवलेलाच नव्हता. त्यामुळे त्यावर कोणतीही प्रतिकाराची तयारी नव्हती.

पंधरा सप्टेंबरला औरंगाबाद पडल्याची बातमी लायक अलींनी निजामाला सांगितली,

तेव्हा निजामाच्या डोळ्यातून अश्रू ओघळले. आसफजाही राजवटीच्या प्रारंभ कालात औरंगाबादच संस्थानची राजधानी होती. निजाम दिवसातून तीनचार वेळा पंतप्रधान लायकअलींना बोलावून युद्ध आघाडीवरील ताज्या घडामोडींची माहिती घेत होता. त्याची अस्वस्थता वाढत होती. सोळा तारखेला दुपारी निजामाने लायक अलींना बोलावून घेतले व सांगितले की, 'तुमचे सर्व अंदाज चुकलेले आहेत. पाकिस्तानने केवळ बघ्याची भूमिका स्वीकारली आहे. हैदराबादच्या सैन्याची कामगिरी पूर्णतः निराशाजनक आहे. सुरक्षा समितीची बैठक अजून व्हावयाची आहे आणि भारताचे सैन्य मात्र सर्व बाजूंनी राजधानीकडे येत आहे.' निजाम पुढे असेही म्हणाला, 'स्पष्ट बोलणे भाग आहे. तुम्ही व तुमच्या मंत्रिमंडळाने त्वरित राजीनामा देऊन सर्व कारभार माझ्या स्वाधीन करावा म्हणजे मी जी काही राजकीय तडजोड होऊ शकेल ती पदरात पाडून घेईन. जर हे मान्य नसेल, तर मी सार्वजनिकरीत्या जाहीर करीन, की माझा (निजामाचा) संस्थानच्या सरकारी कारभाराशी कोणताही संबंध उरला नाही.' या दोन पर्यायांपैकी लायक अलींना काय मान्य आहे ते त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजेपर्यंत कळवावयाचे होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी मंत्रिमंडळाची बैठक शहा मंजिलमध्ये भरली, त्या वेळी भारतीय सैन्य हैदराबादचे उपनगर समजता येईल अशा बिबिनगर रेल्वे स्टेशनवर पोहोचले होते. अशा परिस्थितीत मंत्रिमंडळाने राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. या बैठकीत मंत्रिमंडळातील उपपंतप्रधान एक हिंदू जमीनदार पिंगल व्यंकटरामा रेड्डी यांनी भावनाप्रधान भाषण करून निजामी राज्याच्या रक्षणार्थ देहसुद्धा अर्पण करण्याची तयारी दर्शविली. अर्थात हे सर्व निरुपयोगी होते. मंत्रिमंडळाची बैठक आटोपताच मंत्रिमंडळाचा राजीनामा लायक अलींनी निजामाला सुपूर्द केला.

हैदराबादेत भारतीय सैन्य घुसताच भारताचे एजंट जनरल म्हणून हैदराबादेत असलेले कन्हय्यालाल मुन्शी यांना त्यांच्या निवासस्थानातून हलवून 'लेक व्ह्यू' गेस्ट हाऊसमध्ये आणण्यात आले होते. शरणागती पत्करण्याशिवाय अन्य मार्ग नाही हे निजामाला उमगले तेव्हा त्याने मुन्शींचा सल्ला घेण्यास प्रारंभ केला. मुन्शींनी सल्ला दिला की, लायक अली मंत्रिमंडळाचा राजीनामा स्वीकारून नवे मंत्रिमंडळ बनवावे व रेडिओवर तसे जाहीर करावे. या मंत्रिमंडळात वऱ्हाडच्या युवराजाबरोबर लायक अली मंत्रिमंडळातून राजीनामा देऊन बाहेर पडलेले मवाळ नेते जी. रामाचारीसुद्धा होते. असे केल्याने आपली सत्ता वाचेल असे निजामाला वाटले. हे सर्व दिल्लीला मान्य नव्हते. लायक अली,कासिम रझवी व स्वतः निजाम यांची हैदराबाद रेडिओवरून भाषणे झाली. निजामाचे भाषण मुन्शींनीच लिहून दिले होते.

सतरा सप्टेंबरला निजामी सैन्याने शरणागती स्वीकारताच प्रथम स्वामी रामानंद तीर्थ

यांची हैदराबादच्या चंचलगुडा तुरुंगातून सुटका करण्यात आली. ते मुन्शींना भेटावयास गेले तेव्हा मुन्शी नभोवाणी केंद्रावर गेले होते. ते परत आल्यानंतर मुन्शींशी बोलत असतानाच दिल्लीहून नेहरूंचा बिनतारी यंत्रणेवर दूरध्वनी आला. स्वामीजींच्या प्रकृतीची चौकशी त्यांनी केली व मुन्शींना पुन्हा फोन देण्यास सांगितले. नेहरूंनी दिल्लीच्या कोणत्याही सूचना नसताना काही गोष्टी करण्याबाबत मुन्शींना खडसावले. 'शरणागती हा केवळ लष्करी समारंभ आहे. तुम्ही त्यात उपस्थित राहू नका,' असे सांगून नेहरूंनी 'तुम्ही कोणालाही शब्द देऊ नका व नभोवाणीवर भाषण करू नका,' असे त्यांना बजावले. नेहरूंच्या या कडक बोलण्यामुळे मुन्शी अस्वस्थ झाले; परंतु निजामाला वाचवण्याचा प्रयत्न हा पोलिस कारवाईवर बोळा फिरवणारा ठरला असता. त्यामुळे भारत सरकार तो सहन करणे शक्यच नव्हते.

भारतीय सैन्य शहरात आल्यानंतर काय होणार याचा अंदाज कुणालाच नव्हता. मंत्रिमंडळातले एक रझाकार मंत्री रहीम यांनी कासीम रझवीला पाकिस्तानात विमानाने पाठवावे, अशी विनंती केली होती; परंतु असे कोणते विमानच उपलब्ध नव्हते व असते, तर ते निश्चित पाडण्यात आले असते. अनेक गुप्त स्वरूपाची सरकारी कागदपत्रे जाळून नष्ट करण्यात आली. भारतीय सैन्याने निजामी सैन्याची शरणागती हैदराबाद शहराबाहेर एका साध्या समारंभात स्वीकारली. रझवी व लायक अली मंत्रिमंडळाच्या सदस्यांना अटक करण्यात आली. १७ सप्टेंबरला हैदराबादने प्रत्यक्षात शरणागती पत्करली; परंतु औपचारिकरीत्या ती १८ तारखेस स्वीकारण्यात आली. १९ तारखेस मे. ज. जयंतीनाथ चौधरी यांनी हैदराबादचे लष्करी प्रशासक म्हणून कारभार हाती घेतला. त्यांनी निजामाने मुन्शींच्या सल्ल्याने नेमलेले मंत्रिमंडळ मोडीत काढले. आपली सत्ता कायम राहील ही निजामाची आशा विरून गेली. तो काही वर्षे फक्त नामधारी राजप्रमुख म्हणून राहिला. आजारी मुन्शींना विमानाने मुंबईस नेण्यात आले.

एका तेजस्वी स्वातंत्र्यलढ्याची यशस्वी सांगता झाली. हैदराबाद शहर व संपूर्ण संस्थानातील बहुसंख्य जनता आनंदाने बेहोश झाली होती. कालप्रवाहाला धर्मवेडाचा वापर करून रोखू पाहणारा मीर उस्मानअली खान - शेवटचा निजाम - किंग कोठीतील आपल्या खोलीत दोनशे चोवीस वर्षांची राजवट संपल्याचे कठोर वास्तव स्वीकारण्याचा प्रयत्न करीत होता.

◆ ◆ ◆

२५

राज्य नसलेल्या राजाचा राज्याभिषेक

राज्य नसताना अगर ते खालसा झाले असताना राज्याभिषेक ? कल्पनेतही अशक्य वाटणारी ही गोष्ट हैदराबादेत ६ एप्रिल १९६७ रोजी घडली. हैदराबाद संस्थानातील आसफिया राजवट या नावाने ओळखले जाणारे निजामाचे राज्य स्वतंत्र भारताच्या सैन्याने १७ सप्टेंबर १९४८ रोजीच संपुष्टात आणले होते. २६ जानेवारी १९५० ते १ नोव्हेंबर १९५६ या काळात शेवटचे निजाम मीर उस्मान अलीखान हैदराबाद राज्याचे राजप्रमुख म्हणून संवैधानिक अधिकारी होते. नाममात्र का असेना त्यांना राज्यव्यवस्थेत स्थान होते. त्यानंतर तेही राहिले नाही. आपल्या आयुष्याची अखेरची दहा - अकरा वर्षे ते विस्मृतीतच गेले होते. १९६४ मध्ये ते न्यूमोनियाने गंभीर आजारी झाले. बापाचा अंतकाळ जवळ आला असे समजून त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव वऱ्हाडचे राजपुत्र आजमजाह यांनी राष्ट्रपतींना एक अर्ज पाठविला. संस्थानिकांबरोबर विलीनीकरणाचे वेळी झालेल्या करारमदाराप्रमाणे निजामाचा वारस म्हणून ज्याला मान्यता मिळेल त्याला तनखा, काही सवलती मिळणार होत्या. खरे म्हणजे आजमजाह ज्येष्ठ पुत्र होते. त्यांना युवराज मानण्यात येत होते. त्यांच्या खर्चिक व बेजबाबदार वागणुकीमुळे त्यांचे पित्याबरोबर संबंध ठीक नव्हते. राष्ट्रपतींना हे पत्र मिळाल्यावर मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने उत्तर पाठविण्यात आले की, वारस कोणाला नेमावयाचे हा शेवटच्या निजामाचा वैयक्तिक प्रश्न आहे. त्यांनीच त्या बाबत निर्णय घ्यावयाचा आहे'. आजमजाहाचे दुर्दैव असे की, या पत्राची एक प्रत भारत सरकारने उस्मानअलींना पाठविली.

ही प्रत मिळताच आगीत तेल पडल्यासारखे झाले. आपल्या मरणाची हा मुलगा वाटच पहात आहे असे उस्मानअलींना वाटले. निजामाच्या पूर्वजांनी ज्या मोगलांची सेवा केली होती त्यांच्या इतिहासाशी हा समज सुसंगतच होता. त्यांनी राष्ट्रपतींना उत्तर पाठविले की, माझ्या मृत्युनंतर माझा नातू (आजमजाहांचा मुलगा) बरकतअली खान उर्फ मुकर्रमजाह याला माझा वारस म्हणून मान्यता देण्यात यावी. ही विनंती मान्य करण्यात आली. आता आजमजाह आणि बरकतअली या बाप-लेकांचे संबंधही कडवट झाले. या आजारातून उस्मान अली बरे झाले. मात्र तीन वर्षांनी त्यांच्या प्रकृतीने पुन्हा गंभीर वळण घेतले. १९६७ च्या १८ फेब्रुवारीपासून त्यांनी औषधे घेणेही बंद केले. त्यांचे दोन्ही नातू हैदराबादेत येऊन दाखल झाले. २४ फेब्रुवारीला दुपारी शेवटच्या निजामाचा मृत्यू झाला.

२७ फेब्रुवारी रोजी बरकतअली खानास निजामाचे वारस म्हणून मान्यता देणारा भारत सरकारचा हुकूम राजपत्रात प्रसिद्ध झाला. ही मान्यता 'राजा' म्हणून अजिबात नव्हती. परंतु

संस्थानाच्या भूतकाळात अद्याप रमणाऱ्या काहींना ही वस्तुस्थिती थोडावेळ का होईना विसरून जावयाची होती. या मंडळींनी नव्या निजामाच्या गद्दीनशीनीचा-गादीवर बसण्याचा-समारंभ करण्याचे ठरवले. संस्थानातील जहागीरदारांपैकी सर्वांत महत्वाचे समजले जाणाऱ्या पायगा जहागीरदारापैकी नवाब हबीबजंग बहादुर यांनी या बाबत विशेष पुढाकार घेतला होता. सर्फ-ई-खास या निजामाच्या खाजगी खात्याकडील कर्मचारी त्यांनी दिमतीला घेतले आणि जय्यत तयारी सुरू केली.

संपूर्ण दरबारी परंपरेप्रमाणे हा समारंभ होणार होता. राज्याचे पूर्वीचे मानकरी, जहागीरदार, संस्थानी काळातील (सध्या निवृत्त झालेले) काही अधिकारी व राजघराण्याचे जवळचे नातेवाईक अशा सुमारे एक हजार निवडक लोकांची यादी करण्यात आली. अगदी बारीकसारीक तपशील निश्चित करण्यात आले. आसफीया राजवटीच्या इतिहासात प्रथमच राजघराण्यातील प्रमुख स्त्रिया समारंभात भाग घेणार होत्या. सर्व मानकऱ्यांना दरबारी पोषाखातच येण्याची ताकीद देण्यात आली. आंध्र प्रदेशाचे सरकार किंवा लोकप्रतिनिधी या पैकी मात्र कोणीही समारंभास हजर रहाणार नव्हते.

गादीवर बसण्याचा हा समारंभ खिलवत मुबारक मध्ये होणार होता 'चौमहल्ला' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अफजल महल, आफताब महल, तहनियात महल आणि मेहताब महल अशा चार वेगवेगळ्या इमारतींचा - चार महालांचा हा समूह शहराच्या मध्यवस्तीतच आहे. या चौमहलांतच 'खिलवत मुबारक' या नावाचा एक दरबार हॉल आहे. या 'खिलवत' मध्ये निजाम व्हाईसरॉयचे स्वागत करी. १९२० मध्ये सातव्या निजामाच्या काळात हा हॉल बांधला गेलेला आहे. आसफिया राज्य इतर संस्थानिकांसारख्या भव्य व सुंदर इमारती बांधण्यासाठी प्रसिद्ध नव्हते. उत्पन्नाच्या दृष्टीने भारतातील अव्वल दर्जाचे संस्थान असूनही संस्थानाधिपतींनी स्वतःसाठी महाल बांधण्याऐवजी आपल्या कोणा सरदाराने बांधलेल्या इमारती ताब्यात घेण्याचे धोरण ठेवले होते. किंगकोठी सारखे शेवटच्या निजामाचे निवासस्थान तर एखाद्या छोट्या सरकारी कार्यालयाच्या इमारतीसारखे होते. मात्र 'खिलवत' सभागृह त्यातल्यात्यात बरे व उंचीमुळे भव्यता निर्माण करणारे आहे.

सातव्या निजामाच्या मृत्यूनंतर सुतकाचे ४० दिवस संपल्यानंतर ४१व्या दिवशी, सहा एप्रिल १९६४ रोजी राज्य नसलेल्या ८ व्या निजामाला गादीवर बसविले जाणार होते. पित्याकडून सातव्या निजामाचा तो नातू होता. तर आईकडून तो तुर्कस्तानचे शेवटचे सम्राट दुसरे अब्दुल मजिद यांचा नातू होता. ज्या राजांच्या काळात त्यांच्या राजवंशाची सत्ता संपुष्टात आली अशा दुर्दैवी राजांचा त्याला दुहेरी वारसा मिळालेला होता.

सकाळीच मुसा नदीच्या काठावर झेबा बागेत नव्या तृणांकुराना पदस्पर्श करून त्यांनी

मशीदीत 'नमाजे शुक्राना' ही परमेश्वराचे आभार मानणारी नमाज अदा केली. खिलवतच्या दाराशी जेव्हा बरकतअली उर्फ मुकर्रमजाह बहादुर आले तेव्हा पिढ्यान्पिढ्या आसफिया राजांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या मैसराम रेजिमेंटच्या सुमारे सत्तर जणांनी त्यांना मानवंदना दिली. मूळ अरबस्तानातून आलेल्या कुटुंबातील या सत्तर जवानांपैकी बरेच जण निवृत्त होऊन अनेक वर्षे झाली होती व कॉन्स्टेबल साठी वापरण्यात येणारा उर्दू प्रतिशब्द 'जवान' न शोभण्याइतके ते वृद्धही होते. या माजी सैनिकांना आणि दरबारासाठी उपस्थित झालेल्या अनेक मानकऱ्यांना आपले गणवेश, दस्तारसारखी शिरस्त्राणे शोधून काढून धूळ झटकून आणावी लागली होती. मोटारीतून हॉलच्या पायऱ्यांजवळ मुकर्रमजाह उतरताच त्यांचे स्वागत त्यांचे बंधू मुफ्फकमजाह यांनी व निजामी सैन्यातून निवृत्त झालेले ब्रिगेडीयर तौफिक यांनी केले. हॉलमध्ये त्यांच्या स्वागताला खुद्द त्यांचे पिताजी वऱ्हाडचे राजपुत्र आणि त्यांचे चुलते दोघेही हजर होते.

दरबार हॉलमध्ये उणेपुरे तीन-चारशे लोक जमलेले होते. सर्वांच्या मनात गतकाळचे वैभव वर्तमानाच्या वास्तवाने काळवंडलेले. कुराणातील काही आयाती आणि सातव्या निजामाने रचलेली ईशस्तुती करणारी एक फारशी कविता वाचून दाखवण्यात आली. पायगाचे अमीर हे निजामाचे रक्षक मानकरी. त्यांच्या वारसाने नव्या निजामाला सिंहासन म्हणून असलेल्या संगमरवरी चबुतऱ्यावरील गादीकडे नेले. गादीवर नवे निजाम विराजमान झाल्यानंतर सेवानिवृत्त राज्यसचिव जहीर अहमद यांनी राष्ट्रपतींचा वारसास मान्यता देण्याचा हुकूम वाचून दाखविला व त्यानंतर निजामाने अधिकार ग्रहण केले. थोड्याच वेळात हा समारंभ संपला.

बरकतअलीखानांचे हे निजामपण केवळ औपचारिक होते. सत्ता मिळणारच नव्हती फक्त तनखाच मिळणार होता. ज्या जनतेवर त्यांच्या वाडवडिलांनी सव्वादोनशे वर्षे राज्य केले होते, त्या जनतेच्या प्रतिनिधीपैकी कोणी या समारंभास उपस्थित नव्हते. आंध्र सरकारचे कोणी अधिकारीही नव्हते.भूतकाळात रमणाऱ्या मोजक्या मंडळींच्या उपस्थितीत झालेला हा समारंभ दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रातच लोकांना कळाला.

इतिहासाची गती थांबवता येत नाही. त्याचे चक्र उलटे फिरवण्याचा प्रयत्न केविलवाणा ठरतो. बहुसंख्य जनतेच्या आशा-आकांक्षांच्या वास्तवाकडे पाठ फिरवून चाललेल्या राजवटीच्या काही पाईकांना आजही वास्तवाचा स्वीकार करणे कठीण जात होते.

◆ ◆ ◆

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.